मराठी

# बालभारती

इयत्ता पाचवी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.


(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१४-१५/ह/भाषा/मंजुरी/ड-५०५/७२७/दिनांक : २३/२/२०१५

# मराठी
# बालभारती
## इयत्ता पाचवी

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

9XGHIX



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २०१५
सातवे पुनर्मुद्रण : २०२२

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती :**

इरगोंडा पाटील (सदस्य)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
वाहरू सोनवणे (सदस्य)
प्रा. प्रज्ञा दया पवार (सदस्य)
डॉ. सुभाष सावरकर (सदस्य)
किशोर दरक (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**मराठी भाषा समिती – कार्यगट सदस्य**

हरी गंगाधर नारलावार
प्रा. सर्जेराव रणखांब
श्रीमती रेणू दांडेकर
प्रा. जयवंत पाटील
डॉ. रोहिणी गायकवाड
डॉ. मंदा नांदूरकर
प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो
प्रा. डॉ. सुनीता सुळेकर
प्राचार्य डॉ. गोविंद गायकी
डॉ. संध्या पवार
श्रीकांत चौगुले
पद्‌माकर कुलकर्णी
शिवा कांबळे
नीलेश निमकर
एकनाथ आव्हाड
अतुल कुलकर्णी
वेच्या रूध्या गावित

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार** : राजेंद्र गिरधारी

**मुखपृष्ठ** : रेश्मा बर्वे

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
नितीन वाणी, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/15,000

**मुद्रक** : M/S. UCHITHA GRAPHICS PRINTERS PVT. LTD., MUMBAI

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९' आणि 'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा-२००५' डोळ्यांसमोर ठेवून राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-२०१२' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पाचवी 'मराठी बालभारती' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ व कवितांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे. पाठ व कविता यांच्याशी निगडित अधिकची माहिती 'माहिती मिळवूया' या शीर्षकाखाली दिली आहे. विद्यार्थ्यांना घर व परिसरातील व्यक्तींशी घटना-प्रसंगानुरूप बोलता यावे, स्वच्छता, पाणीटंचाई यांसारख्या समस्यांवर विचार करायला ते प्रवृत्त व्हावे, यासाठी पाठ्यपुस्तकांत प्रसंगचित्रे दिली आहेत. चित्रांचे निरीक्षण, त्यांवर विचार, चर्चा व त्यासंबंधी स्वतःचे अनुभवकथन यांतून विद्यार्थ्यांमध्ये जाणीव-जागृती निर्माण होईल.

भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी नावीन्यपूर्ण स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत. 'शोध घेऊया, खेळ खेळूया, हे करून पाहा, खेळूया शब्दांशी' या शीर्षकांखाली दिलेल्या मजकुरांतून विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला वाव दिला आहे. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रांतील बातम्या बारकाईने वाचून त्यांवर विचार करावा, यासाठी काही बातम्यांचे नमुने, तसेच भाषेच्या व्यवहारातील वापराचे इतर नमुने उदा., जाहिरात, सूचना फलक, निवेदन, घोषवाक्ये इत्यादींचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर सहजतेने करावा, तसेच त्यांच्यामध्ये व्याकरणविषयक जाण निर्माण व्हावी, म्हणून हे सर्व मनोरंजक व सोप्या पद्धतीने दिले आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची कल्पकता वापरून लेखन करता यावे, विचार व्यक्त करता यावे, यासाठी वैविध्यपूर्ण प्रश्न व कृती पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. पाठ्यघटक कसे हाताळावे, याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनपर सूचना अनेक ठिकाणी दिल्या आहेत.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पाठ्यपुस्तक तयार करताना मराठी भाषा समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री. इरगोंडा पाटील यांनी मराठी भाषा समितीच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारून मोलाचे मार्गदर्शन केले. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील प्राथमिक शिक्षक, भाषातज्ज्ञ, अभ्यासक्रम समिती सदस्य यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. श्री. शिवाजी तांबे व श्रीमती उमा विसुभाऊ बापट या निमंत्रित तज्ज्ञांचेही सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : ५ मार्च २०१५
भारतीय सौर १४ फाल्गुन १९३६

# इयत्ता पाचवी – मराठी अध्ययन निष्पत्ती

| अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) वैयक्तिक, गटात कार्य करण्याची संधी आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी –**<br>• विविध विषय, परिस्थिती, घटना, अनुभव, कथा, कविता इत्यादी स्वत:च्या पद्धतीने आणि आपल्या भाषेत (तोंडी/ लेखी/सांकेतिक स्वरूपात) सांगणे, प्रश्न विचारणे, टिपण करणे, आपले मत देणे यांसाठीचे स्वातंत्र्य दिले जावे.<br>• ग्रंथालय/वर्गात वेगवेगळ्या प्रकारच्या कथा, कविता, अथवा बालसाहित्य, स्तरांनुसार इतर साहित्य, जाहिरात फलक, वर्तमानपत्र यांतील कात्रणे उपलब्ध असावीत आणि यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.<br>• वेगवेगळ्या कथा, कविता, फलक इत्यादींना संदर्भानुसार वाचून समजणे-समजावणे, यांसाठी संधी दिल्या जाव्यात.<br>• ऐकलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या गोष्टी आपल्या पद्धतीने आपल्या भाषेत लिहिण्याच्या संधी दिल्या जाव्यात.<br>• आवश्यकतेनुसार आणि संदर्भानुसार आपली भाषा समजून घेण्याची (नवीन शब्द/वाक्य इत्यादी) आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• एकमेकांनी लिहिलेल्या गोष्टी ऐकणे, वाचणे आणि त्यावर आपले मत देणे, त्यात आपल्या विचारांची भर घालून विविध प्रकारे लिहिण्याची संधी दिली जावी.<br>• आजूबाजूला घडणाऱ्या क्रिया/घटना विचारात घेऊन प्रश्न विचारणे, मुलांशी चर्चा करणे, टिपण तयार करणे, मत देणे यासारख्या संधी उपलब्ध करून द्याव्या.<br>• आशयाच्या संदर्भाने वापरल्या जाणाऱ्या भाषेचे बारकावे आणि नियमबद्ध मांडणी समजून घेण्याची आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• नवीन शब्द चित्र-शब्दकोश/शब्दकोश यातून पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.<br>• इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (उदा. गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला, चिकित्सा इत्यादी) येणारे शब्द समजणे आणि त्यांचा संदर्भानुसार वापर करण्याची संधी दिली जावी.<br>• पाठ्यपुस्तक आणि त्याच्याशी संबंधित इतर साहित्यांत आलेल्या नैसर्गिक, सामाजिक आणि इतर संवेदनशील मुद्द्यांना समजून घेऊन त्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी. | **अध्ययनार्थी –**<br>05.01.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी, साहसी, सामाजिक विषयांवरील कथा, कविता इत्यादी) विषय, घटना, चित्रे, पात्रे व शीर्षक यांबाबत चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपले मत देतात, तर्क करतात व निष्कर्ष काढतात.<br>05.01.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग, घटना इत्यादींचे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यांवर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात, प्रश्न विचारतात.<br>05.01.03 भाषेच्या सूक्ष्म निरीक्षणातून स्वत:ची मौखिक भाषा तयार करतात.<br>05.01.04 विविध प्रकारच्या साहित्यातील (उदा. वर्तमानपत्रे, बालसाहित्य, पोस्टर इत्यादींमधील) संवेदनशील मुद्द्यांवर आपले मत/विचार व्यक्त करतात. उदा. 'कठीण समय येता' हा पाठ वाचून मुले म्हणतात, 'आम्ही नेहमीच इतरांना मदत करतो.'<br>05.01.05 भिन्न परिस्थिती आणि उद्देशांसाठी (फलकावरील सूचना, कार्यअहवाल, माहिती इत्यादी मिळवण्यासाठी) वाचतात, लिहितात.<br>05.01.06 आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य (वर्तमानपत्रे, बालसाहित्य, मोठे फलक इत्यादी) समजून घेऊन वाचन करतात, त्यांविषयी बोलतात.<br>05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशामधून शोधतात.<br>05.01.08 स्वत:च्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरवलेल्या कृतीअंतर्गत लेखनप्रक्रिया उत्तम तऱ्हेने समजून स्वत:चे लेखन पडताळतात. लेखनाचा उद्देश व वाचक यानुसार आवश्यक बदल करतात. उदा. एखाद्या घटनेबाबतची माहिती सांगण्यासाठी शालेय भित्तिपत्रिकेत लेखन करतात किंवा मित्रास पत्र लिहितात.<br>05.01.09 भाषेतील बारकावे, नियम इत्यादींचा विचार करून स्वत:ची भाषा तयार करतात आणि त्याचा आपल्या लेखनात/ब्रेल लिपीत समावेश करतात.<br>05.01.10 भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक (उदा. विरामचिन्हे, काळ, क्रियापद, लिंग, वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.<br>05.01.11 भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा (उदा. पूर्णविराम, स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह) जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.<br>05.01.12 स्तरांनुसार इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला, चिकित्सा इत्यादींमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.<br>05.01.13 आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांबाबत लिखित स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात.<br>05.01.14 पाठ्यपुस्तक आणि इतर लेखनप्रकारांतील संवेदनशील विषयावर लिखित स्वरूपात/ब्रेल लिपीमध्ये अभिव्यक्त होतात.<br>05.01.15 आपल्या कल्पनेने कथा, कविता, पत्र इत्यादी लिहितात. कथा, कविता यांमध्ये स्वत:च्या शब्दांची भर घालून लेखन करतात. |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | माय मराठी! (गाणे) | संजीवनी मराठे | १ |
| २. | बंडूची इजार (चित्रकथा) | — | २ |
| ३. | वल्हवा रं वल्हवा (गाणे) | वसंत बापट | ७ |
| ४. | सावरपाडा एक्स्प्रेस : कविता राऊत | संतोष साबळे | ८ |
| ५. | मुंग्यांच्या जगात | प्रकाश किसन नवाळे | १३ |
| ६. | माहेर (कविता) | सदाशिव माळी | १६ |
| ७. | अरण्यलिपी | सुरेशचंद्र वारघडे | १८ |
| ८. | प्रिय बाई... | — | २२ |
| ९. | जनाई | शंकर पाटील | २५ |
| १०. | रंग जादुचे पेटीमधले (कविता) | पद्‌मिनी बिनीवाले | २९ |
| ११. | कठीण समय येता... | मनोहर भोसले | ३२ |
| १२. | माळीण गाव : एक घटना | — | ३६ |
| १३. | सण एक दिन! (कविता) | यशवंत | ३८ |

| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १४. | राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज | सुदाम सावरकर | ४१ |
| १५. | आपल्या समस्या - आपले उपाय | — | ४३ |
| १६. | स्वच्छतेचा प्रकाश | यदुनाथ थत्ते<br>डॉ. अनिल गोडबोले | ४५ |
| १७. | पुस्तके (कविता) | सफदर हाश्मी (अनुवादित) | ४८ |
| १८. | कारागिरी | डॉ. सरोजिनी बाबर | ५१ |
| १९. | वासरू (कविता) | अनिल | ५५ |
| २०. | माझं शाळेचं नक्की झालं! | विमल मोरे | ५७ |
| | • वाचूया, समजून घेऊया. | — | ६१ |
| २१. | प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा (कविता) | गौरीशंकर गंगा | ६५ |
| २२. | अति तिथं माती | द. मा. मिरासदार | ६८ |
| २३. | छत्रपती राजर्षी शाहूमहाराज | श्रीराम पचिंद्रे | ७३ |
| २४. | कापणी (कविता) | बहिणाबाई चौधरी | ७६ |
| २५. | ढोल | संजय लोहकरे | ७९ |
| २६. | पाण्याची गोष्ट | — | ८२ |
| २७. | अभंग | संत जनाबाई<br>संत सेनामहाराज<br>संत नामदेव | ८८ |

# १. माय मराठी!

• ऐका व म्हणा.




माय मराठी! तुझिया पायी तनमनधन मी वाहियले,
तुझिया नामी, तुझिया धामी अखंड रंगुनि राहियले.

कष्टामधली तुझीच गोडी चाखायाची मज आई,
मला आवडे तुझा विसावा, तुझीच निर्भर अंगाई.

तुझे झरे अन् तुझी पाखरे, वास तुझा जनलोक तुझा,
हवाहवासा मला वाटतो राग तुझा, संतोष तुझा.

माय मराठी! तुझिया अंकी लोळण घेते, बागडते,
तसेच अलगत तव आभाळी भरारणे मज आवडते.

तुझे चालणे, तुझे बोलणे, दाखव मजला रीत तुझी,
जे ओठी ते पोटी असली शिकवी मजला प्रीत तुझी.

तुझियासाठी गुंफित बसते मोहनमाला शब्दांची,
अर्थ साजरा, गंध लाजरा, नवलपरी पण रंगांची.

माय मराठी! तुझियासाठी वात होउनी जळते मी,
क्षणाक्षणाने कणाकणाने तुझ्या स्वरूपा मिळते मी.

**– संजीवनी मराठे**



**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. एखाद्या विद्यार्थी/विद्यार्थिनीला गाणे म्हणायला सांगावे. मागून इतर विद्यार्थ्यांना म्हणायला सांगावे. एकाच गाण्याला विविध चाली लावण्याचा प्रयत्न करायला सांगावे. गटात किंवा वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात म्हणण्यास प्रोत्साहन द्यावे.

# २. बंडूची इजार

बावची गावचा बंडू शांत व कष्टाळू. आपण भलं आणि आपलं काम भलं असा त्याचा स्वभाव. सगळ्या गावात त्याच्या या स्वभावाची चर्चा. सकाळी लवकर शेतात जायचं. दिवसभराचं काम आटोपून संध्याकाळी घराकडे यायचं. घरी आल्यावर आपल्या मुलीशी खेळायचं. कट्ट्यावर चक्कर मारायची अन् जेवायच्या वेळी पुन्हा घरी यायचं, असा त्याचा दिनक्रम!

सावळा रंग, शिडशिडीत अंगकाठी, अन् नाकासमोर चालणारा बंडू. एका वर्षी पीकपाणी बरं झाल्यावर बंडूनं कुटुंबासाठी नवे कपडे अन् स्वत:साठी इजार शिवली. धोंडूमामांनी कपडे शिवले खरे, पण त्यांचा अंदाज जरा चुकला! पुढे...













आईने इजार एका कोनाड्यात फेकली. बंडू हिरमुसला होऊन शेताकडे गेला.




बंडूची बायको इजारीचे पाय कापते अन् दुमडून टाके घालते.







बंडूची बहीण इजारीचे पाय कापते. दुमडून टाके घालते.







बंडूची आई इजारीचे पाय कापते.
दुमडून टाके घालते.






बंडू इजारीचे पाय चार बोटं कापतो व
टाके घालतो.




आँऽऽऽ
सगळेजण आश्चर्याने पाहतात.
मी इजार चार बोटं कापली.
मी पण!
अगंबया, मी पण इजार चार बोटं कापली!
अन् मी पण!
चौघेही खळखळून हसतात.

## स्वाध्याय

**प्र. १. चर्चा करून उत्तरे लिहा.**

(अ) बंडूची इजार लांब झाली म्हणून कापून कमी केली. जर ती आखूड झाली असती, तर ती लांब करण्यासाठी काय करावे लागले असते? शक्य तेवढे सगळे मार्ग सुचवा.

(आ) इजारीची चड्डी झाली, यात चूक कोणाची?

(इ) बंडूच्या इजारीचे पाय चार बोटे कापले, म्हणजे 'पाय' असणारी इजार सजीव आहे, असे आपण म्हणत नाही; पण बोलताना आपण असेच बोलतो. इजारीसारख्या कितीतरी वस्तूंना वेगवेगळ्या अवयवांची नावे वापरतात. त्यांची नावे सांगा.

**प्र. २. खालील वाक्यांमध्ये कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा. त्या वाक्यांचा अर्थ लिहा.**

(कान, नाक, पाय, हात, डोळा, केस, पाठ, पोट, गळा, तोंड)

(अ) चुलीवरच्या तव्याची ............... काळीभोर झाली होती.

(आ) कपाचा .............. तुटला होता, म्हणून दिलावरने चहा ग्लासात ओतला.

(इ) 'हा नारळ नासका निघणार,' नारळाचा ............... बघून धनव्वा म्हणाली.

(ई) मुसळधार पाऊस पडल्यामुळे नदीचे .............. फुगले होते.

(उ) कितीही जोर लावला तरी बाटलीचे .............. उघडेना.

(ऊ) चरवीतले दूध गंजात ओतले, तर ते गंजाच्या ................ पर्यंत आले.

(ए) सुईच्या ............... दोरा ओवून धोंडूमामांनी शिलाई मशीन सुरू केली.

(ऐ) आंब्याच्या कोईचे .............. पांढरे होईपर्यंत गणू कोय चोखत राहिला.

(ओ) आपले शेकडो .............. पसरून उभे असलेले वडाचे झाड वर्षांनुवर्षे सगळ्यांना सावली देते.

(औ) खोलीतल्या एकमेव खुर्चीचा ............ मोडला होता, म्हणून मी जमिनीवर बसलो.

• 'भिंतीलाही कान असतात.' ही म्हण आपण वापरतो. 'भिंतीला' कपांप्रमाणे कान नसतात. भिंतीला 'कान' असतात, हे कोणत्या अर्थाने वापरले आहे, ते शिक्षक, पालक यांच्याशी चर्चा करून सांगा.

वरीलप्रमाणे 'त्याच्या पैशाला पाय फुटले,' असेही बोलताना आपण म्हणतो. यासारखी उदाहरणे शोधा. त्यांचा अर्थ माहीत करून घ्या. बोलण्यात त्यांचा वापर करा.

**शिक्षकांसाठी :** या चित्रकथेचे नाट्यीकरण विद्यार्थ्यांकडून वर्गात सादर करून घ्यावे. या पाठाचे अभिवाचन घ्यावे.

• या पाठ्यपुस्तकातील ज्या शब्दांचे अर्थ समजणार नाहीत, त्या शब्दांची यादी विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगावी. त्या शब्दांचे अर्थ शब्दकोशात शोधून त्यांचा संग्रह 'माझा शब्दसंग्रह' या वहीत करायला सांगावे.

# ३. वल्हवा रं वल्हवा

• **ऐका व म्हणा.**


वल्हवा रं, वल्हवा रं, वल्हवा रं नाव वल्हवली,
वल्हवा रं नाव वल्हवली, वल्हवा रं नाव वल्हवली ।।

नौका चाले कशी जलावरी-जलावरी-जलावरी,
आहे सारा भार मुलांवरी-मुलांवरी-मुलांवरी
लहान वीर-महान धीर,
रोखील वादळ वल्हवा रं - वल्हवली ।।१।।

मोकाट पिसाट वारा आला - येऊ द्या रं, येऊ द्या रं,
डोंगरमापाच्या लाटा आल्या - येऊ द्या रं, येऊ द्या रं,
छाती अफाट - झेलेल लाट,
रोखील वादळ वल्हवा रं - वल्हवली ।।२।।

झेंडा माथ्यावर तीन रंगी - तीन रंगी - तीन रंगी,
संचारवी जोम नव अंगी - नव अंगी - नव अंगी
डोले कसा - बोले कसा,
धैर्यानं नाव तुम्ही वल्हवा रं - वल्हवली ।।३।।

स्वातंत्र्य दौलत मोलाची रे - मोलाची रे - मोलाची रे,
सर्वांच्या जिवाच्या तोलाची रे - तोलाची रे - तोलाची रे,
ती एक आस - तो एक ध्यास,
जोसानं नाव आता वल्हवा रं - वल्हवली ।।४।।



**- वसंत बापट**

**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. एखाद्या विद्यार्थी/विद्यार्थिनीला गाणे म्हणायला सांगावे. इतर विद्यार्थ्यांना मागे म्हणायला सांगावे. एकाच गाण्याला विविध चाली लावण्याचा प्रयत्न करायला सांगावे. गटात किंवा वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात म्हणण्यास प्रोत्साहन द्यावे.

# ४. सावरपाडा एक्सप्रेस : कविता राऊत



दुर्गम भागातील रस्ते म्हणजे मातीचा धुराळा. पाण्यासाठी वणवण करणे, हा रोजचा दिवस. अशा प्रतिकूल परिस्थितीत कुरकुर न करता, हार न मानता जीवन जगणे म्हणजे एक दिव्यच! अशा खेड्या-पाड्यांमध्ये गुणवत्ता असते पण ती शोधावी लागते.

असाच एक डोंगरदऱ्यांनी वेढलेला आदिवासी पाडा. पाण्याच्या शोधासाठी तिथे मैलोन्मैल भटकंती करावी लागे. त्याच आदिवासी पाड्यावर अनवाणी पायांनी चालणारी, लाकूडफाटा गोळा करणारी एक मुलगी. तिने राष्ट्रकुल आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा दबदबा निर्माण केला आणि ऑलिंपिक स्तरावर झेप घेतली. या आंतरराष्ट्रीय धावपटूचे नाव आहे, कविता राऊत आणि त्या पाड्याचे नाव आहे, सावरपाडा. हा पाडा नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यात आहे. कविताचे बालपण निसर्गाच्या सान्निध्यात गेले. तिची आजवरची वाटचाल एक दीर्घ साधना बनली आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत कांस्य आणि आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य व कांस्य अशी पदके कविताने पटकावली. लागोपाठच्या या दोन्ही स्पर्धांमध्ये भारताचे नाव उंच करणारी धावपटू म्हणजेच 'सावरपाडा एक्स्प्रेस' - कविता राऊत. चीनमधील गुआँगजऊ येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत दहा हजार मीटर धावण्यात कविताचे सुवर्णपदक अवघ्या सेकंदाने हुकले; पण त्या प्रसंगी कविताची समजूत तिच्या आईने काढली. आईच्या शब्दांनी कविताला दिलासा मिळाला.

अवघ्या चौथी शिकलेल्या आईच्या समंजस शब्दांनी कविताला आजवर अनेक कठीण प्रसंगी आधार दिला आहे. कष्टप्रद अनुभवांमुळे कविताचे पाय कणखर बनले. नाशिक जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत कविताने धावण्यात प्रथम क्रमांक मिळवला; पण कविताचे वेगळेपण तिचे वडील रामदास आणि आई सुमित्रा यांना फारशा तीव्रतेने त्या वेळी जाणवले नाही. कविताच्या पायांमधील चमकदार दौड हेरली ती प्रशिक्षक विजेंद्र सिंग यांनी. त्यांनी कविताच्या आईवडिलांची मानसिकता तयार केली आणि तिला नाशिकच्या भोसला मिलिटरी स्कूलच्या मैदानावर तंत्रशुद्ध पद्धतीने धावण्याचे धडे देण्यास सुरुवात केली. बूट घालून धावणे कविताला अवघड वाटायचे, कारण लहानपणापासून अनवाणी धावण्याचीच तिला सवय होती. विजेंद्र सिंग यांनी तिच्याकडून बूट घालून धावण्याचा सराव नियमितपणे करून घेतला.

हिऱ्याला पैलू पाडल्यावर त्याचे तेज अधिकच फैलावते, तसे तिच्या बाबतीत झाले. गुजरातमधील गांधीनगर येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील शालेय स्पर्धेत धावण्यात रौप्यपदक मिळवून तिने यशाचा आरंभ केला. पुढे मग नाशिक येथे सराव आणि हरसूल येथे शिक्षण अशी कसरत कविता करत होती. कविताची ही ओढाताण पाहून विजेंद्र सिंग यांनी तिला अकरावीसाठी भोसला मिलिटरी कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला. ती राहणार कुठे? हा कविताच्या आईवडिलांना पडलेला प्रश्नही विजेंद्र सिंग यांनी सोडवला. २४ ऑक्टोबर २००२ पासून पुढील पाच वर्षे ती त्यांच्याच घरी राहिली. स्वतःचा एक




मुलगा आणि एक मुलगी असलेल्या सिंग दांपत्याने आपली दुसरी मुलगी म्हणून कविताचा सांभाळ केला. तिच्या धावण्याच्या गतीकडे विजेंद्र सिंग यांनी लक्ष पुरवले आणि त्याची प्रचीती म्हणजेच कविताचे यश. एकापाठोपाठ एक विक्रम तिच्या नावावर झळकू लागले.

कविताच्या यशामुळे हरसूल, सावरपाडा या भागास नवी ओळख मिळाली. आज केवळ राऊत कुटुंबालाच कविताचा अभिमान वाटतो असे नाही, तर संपूर्ण हरसूल परिसराची हीच भावना आहे.

नवी दिल्लीतील राष्ट्रकुल स्पर्धेत कविता जिंकल्याचे जाहीर होताच हरसूल, सावरपाडा येथे जणूकाही दिवाळीच साजरी झाली होती. स्पर्धेत विजयी झाल्यानंतर कविता आपल्या गावी येणार, म्हणून सकाळपासून जो तो स्वागताच्या कामात गुंतला होता. कविताचे कौतुक करण्यासाठी गावोगावचे लोक हजारोंच्या संख्येने उपस्थित झाले होते. लेकीभोवती निर्माण झालेले वलय, तिला सत्कारासाठी घेऊन जाण्यास येणाऱ्या आलिशान गाड्या, पत्रकारांचा गराडा यामुळे आपली लेक 'लई मोठ्ठी झालीय' याचे समाधान तिच्या आईच्या डोळ्यांमध्ये सहज वाचता येत होते. कविता बंगळुरू येथे विशेष प्रशिक्षणासाठी गेली असताना रोज किमान एकदा तरी आईशी फोनवरून बोले. यावरून त्या मायलेकीचे गहिरे नाते दिसून येते.

कविता सांगते, 'आईशी बोलल्यावर मनाला वेगळंच समाधान वाटतं. दिवसभरात जे झालं, ते सर्व मी आईला सांगते. माझ्या त्रासाबद्दल मात्र तिला काही सांगत नाही, कारण ते ऐकून आईला उगीच वाईट वाटत राहतं.'

कविता हळवी आहे. प्रसिद्धीच्या वलयाने तिच्या स्वभावात काही फरक पडलेला नाही.

बापलेकीच्या नात्यातील वीणही तितकीच गहिरी. 'लहानपणी आपले बोट धरून चालणाऱ्या कविताच्या पायांमध्ये मोठेपणी इतके बळ येईल,' असे तिच्या आईवडिलांना कधी वाटलेच नव्हते. कविताच्या यशाचे सर्व श्रेय ते प्रशिक्षक विजेंद्र सिंग यांना देतात. जेव्हा कविता प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी झगडत होती, तेव्हा तिला आर्थिक मदत मिळावी म्हणून जो जो भेटेल, त्या प्रत्येकास विनंती करण्यात विजेंद्र सिंग यांनी कोणताही कमीपणा वाटू दिला नाही. तेव्हा त्यांनी कमीपणा वाटू दिला असता, तर कदाचित आज कविता या स्थानापर्यंत पोहचू शकली नसती.

गेल्या काही वर्षांपासून कविता कुटुंबापासून दूर राहत असली, तरी तिने सर्वांचे प्रेम जपले आहे. घरचे सण-समारंभ, उत्सव यांमध्ये प्रत्यक्ष सहभागी होता येत नसल्याची खंत कविताला वाटते. बंगळुरूच्या क्रीडा केंद्रात कविताला तिच्या आवडीच्या अजून एका गोष्टीपासून दूर राहावे लागे, ती म्हणजे वांग्याची भाजी आणि नागलीची भाकरी.

कवितामुळे सावरपाड्याचे नाव आज सर्वदूर पसरले आहे. कविता तिथल्या मुलामुलींसाठी आदर्श ठरली आहे.

आज कविता भारतातील अव्वल धावपटू आहे. पी. टी. उषा या धावपटूला ती आपला आदर्श मानते. ती खूप मेहनती आहे. धावण्याचा सराव ती मनापासून करते. आपल्या प्रशिक्षकांनी दिलेल्या छोट्या-मोठ्या सूचनांचे कटाक्षाने पालन करते. कविताचे म्हणणे आहे, 'मेहनत करणे आपल्या हातात असते. मेहनत हाच उद्दिष्टाकडे, ध्येयाकडे नेणारा महामार्ग आहे. हा महामार्ग आपल्याला यशाकडे नेतो. आपले जीवन

आपणच घडवतो.'

कोणत्याही खेळाडूसाठी शारीरिक तसेच मानसिक तंदुरुस्तीही महत्त्वाची असते. कविता सरावात कधीच कसूर करत नाही. कविताचे इतर झगमगाटी गोष्टींकडे लक्षही नसते. खेळाचा सराव चालू असतानाच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामुळे तिच्या शिक्षणातही खंड पडला नाही.

कविता ही तिच्या जीवनप्रवासाची नायिका आहे.

**– संतोष साबळे**

**शब्दार्थ :** **दुर्गम –** जाण्यास कठीण. **प्रतिकूल –** कठीण. **पाडा –** आदिवासी वस्ती. **अनवाणी –** पायात चपला/वहाणा नसणे. **दबदबा –** दरारा. **दिलासा** – धीर. **कणखर –** काटक, मजबूत. **दौड** – पळण्याचे कसब. **फैलावणे** – पसरणे. **दांपत्य** – पति-पत्नी. **प्रचीती –** अनुभव. **गहिरे नाते –** दृढ, घट्ट नाते. **नागली** – नाचणी, एक प्रकारचे धान्य. **कसूर** – चूक.

## स्वाध्याय

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) कविताने कोणत्या स्पर्धेत भारताचा दबदबा निर्माण केला?
(आ) कविताला कशामुळे दिलासा मिळाला?
(इ) कविताचे पाय कशामुळे कणखर बनले?
(ई) कविताचे वेगळेपण विजेंद्र सिंग यांनी केव्हा ओळखले?
(उ) कविता आपल्या त्रासाबद्दल आईला का सांगत नाही?
(ऊ) कविता कोणत्या धावपटूला आदर्श मानते?
(ए) कोणत्याही खेळाडूसाठी कोणती गोष्ट महत्त्वाची असते?

### प्र. २. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) कविता राऊतला 'सावरपाडा एक्स्प्रेस' का म्हणतात?
(आ) कविता विजेंद्र सिंग यांच्या घरी का राहू लागली?
(इ) हरसूल, सावरपाडा परिसराला कविताचा अभिमान का वाटतो?
(ई) आपली लेक खूप मोठी झाली आहे, असे सुमित्राबाईंना का वाटते?
(उ) कविताचे आईवडील कविताच्या यशाचे श्रेय विजेंद्र सिंग यांना का देतात?
(ऊ) कविताकडून तुम्ही कोणती प्रेरणा घ्याल?

### प्र. ३. खालीलप्रमाणे प्रत्यय लावून नवीन शब्द लिहा.

**उदा.,** (अ) पण – वेगळेपण (इ) पणा – कमीपणा (उ) इक – आर्थिक
(आ) दार – चमकदार (ई) पणी – लहानपणी (ऊ) इत – अखंडित

### प्र. ४. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.

(अ) दिलासा मिळणे. (इ) कणखर बनणे. (उ) नात्यातील वीण गहिरी असणे.
(आ) गराडा पडणे. (ई) ओढाताण होणे. (ऊ) वणवण सहन करणे.

### प्र. ५. समान अर्थाचे शब्द लिहा.

(अ) माय – (इ) बळ – (उ) क्रीडा –
(आ) लेक – (ई) गहिरे – (ऊ) वडील –

प्र. ६. तुम्हांला वैयक्तिक खेळातील कोणता खेळ अधिक आवडतो? तो का आवडतो?

प्र. ७. तुम्हांला मैदानी खेळ आवडतात, की बैठे खेळ? की दोन्ही? ते खेळ का आवडतात ते थोडक्यात लिहा.

प्र. ८. खालील वाक्यांतील अधोरेखित केलेल्या शब्दसमूहांचे नेमके अर्थ काय होतात ते तुमच्या शब्दांत सांगा.

(अ) तुमची गल्ली/गाव कशाने वेढलेले आहे?

(आ) आपल्या राज्यातली अनेक शहरे धुराने वेढलेली आहेत.

(इ) अनेक मोठी शहरे सिमेंटच्या जंगलांनी वेढलेली आहेत.

(ई) कार्यालयात अनिताबाई नेहमी फायलींनी वेढलेल्या असतात.

प्र. ९. शरीर या शब्दापासून 'शारीरिक' हा शब्द तयार झाला आहे. खालील शब्द वाचा व समजून घ्या.

उद्योग- औद्योगिक, शिक्षण- शैक्षणिक, बुद्धी- बौद्धिक, नीती- नैतिक, संस्कृती- सांस्कृतिक, भूगोल- भौगोलिक, इतिहास- ऐतिहासिक, विज्ञान- वैज्ञानिक.

प्र. १०. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'क्रीडामहोत्सव ' या विषयावर आठ ते दहा वाक्ये लिहा.

महोत्सवाचा दिवस, महिना, काळ, स्थळ, तालुका/जिल्हा/राज्य पातळी, खेळांचे प्रकार, सर्वात जास्त आवडलेला खेळ, आवडण्याची कारणे, स्पर्धा कशा पार पडल्या, बक्षीस वितरण समारंभ पाहताना मनात आलेले विचार.

उपक्रम : १. तुम्हांला माहीत असलेल्या धावपटूंची नावे लिहा. त्यांनी जिंकलेल्या स्पर्धा व पदके यांची माहिती घ्या. त्यांची चित्रे जमवा.

२. खालील प्रकारे सारणी तयार करून वहीत जास्तीत जास्त नावे लिहा.

| बैठे खेळ | मैदानी खेळ |
|---|---|
| | |

३. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा व ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा यांची खालील मुद्द्यांच्या आधारे शिक्षकांकडून माहिती मिळवा. मिळवलेल्या माहितीवर मित्रांशी चर्चा करा.

(अ) स्पर्धा भरवण्याचा कालावधी.

(आ) समाविष्ट क्रीडा प्रकार.

(इ) विजेत्या खेळाडूस किंवा संघास दिली जाणारी पारितोषिके.

४. या स्पर्धांमधील काही खेळाडूंची चित्रे, वर्तमानपत्रांतील स्पर्धांसंदर्भातील बातम्या, कात्रणे, खेळांची क्षणचित्रे मिळवून त्यांचा संग्रह तयार करा.

५. वाचा. चर्चा करा. माहिती मिळवा.

पाण्यासाठी वणवण भटकावे लागणे ही चांगली बाब नाही. ही एक नैसर्गिक आपत्ती आहे. मित्र, शिक्षक, कुटुंबातील व्यक्ती, गावातील लोक यांच्याशी पुढील मुद्द्यांवर चर्चा करा.

(अ) तुमच्या गावातील पाण्याच्या साठ्यांचे प्रकार.

(आ) तुमच्या गावात पाणीटंचाई असल्यास त्याची कारणे. पाणीटंचाई नसल्यास त्याची कारणे.

(इ) कविता राऊतप्रमाणे प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन घडलेल्या एखाद्या व्यक्तीविषयी माहिती मिळवा व लिहा.

## आपण समजून घेऊया.

### नाम

माधव आणि सरिता शाळेत निघाले. सरिताने पाण्याची बाटली दप्तरात ठेवली अन् मांजराला टाटा करून ती निघाली.

वरील उदाहरणात माधव, सरिता ही व्यक्तींची नावे आली आहेत. पाणी हे द्रवाचे नाव आहे, तर बाटली, दप्तर ही वस्तूंची नावे आहेत. मांजर हे प्राण्याचे नाव आहे. या नावांना नाम म्हणतात.

आपण वस्तू हा शब्द डोळ्याने दिसणाऱ्या, कल्पनेने जाणणाऱ्या पदार्थाला किंवा त्यांच्या गुणधर्मांना उद्देशून वापरतो. वस्तू या शब्दाच्या अर्थामध्ये सर्व प्रकारचे पदार्थ, प्राणी व त्याच्या अंगी असणारे गुणधर्म, भाव-भावना यांचा अंतर्भाव होतो.

- **खालील वाक्यांतील अधोरेखित केलेली नामे वाचा व समजून घ्या.**

(अ) शब्बीर खाली बसला.

(आ) पाऊस कमी झाला.

(इ) तो शाळेत येऊन सुरवाडेगुरुजींना म्हणाला.

(ई) पाकिटात पैसे नव्हते.

(उ) मुले बागेतील फुलेफळे जपू लागली.

(ऊ) कविता राऊतमुळे हरसूलपाड्याला आनंद झाला.

(शब्बीर, पाऊस, शाळा, सुरवाडेगुरुजी, पाकीट, पैसे, मुले, बाग, फुलेफळे, कविता, राऊत, हरसूलपाडा, आनंद ही नामे आहेत.)

- **वरीलप्रमाणे नामे वापरून पाच वाक्ये लिहा.**
- **या पाठातील नामांची यादी करा.**
- **व्यक्ती, प्राणी, पक्षी, कीटक, वस्तू, पदार्थ, फळे, फुले, गावे, नद्या, गुण या प्रत्येक प्रकाराची दहा नावे गटात चर्चा करून लिहा.**

## खेळ खेळूया.

वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करावे. एका गटाने नाव सांगावे. सांगितलेल्या नावाच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणारे नाव दुसऱ्या गटाने सांगावे. अशा पद्धतीने नावांच्या भेंड्यांचा खेळ खेळावा.

**उदा.**, माधव → वजन → नमिता → तारीख → खाऊ → ऊस → सर्कस....

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना नामांची विविध उदाहरणे द्यावी. विद्यार्थ्यांना नामे सांगायला लावावी. त्यांच्याकडून नामाची व्याख्या करून घ्यावी. विविध नामांचा उपयोग करून विद्यार्थ्यांकडून वाक्ये तयार करून घ्यावी. नावांच्या भेंड्यांचा खेळ घ्यावा.

9Y5256

# ५. मुंग्यांच्या जगात



'मुंगी' हा शब्द उच्चारताच आपल्या डोळ्यांसमोर येतात, त्या साखरेवर ताव मारणाऱ्या मुंग्या, नाहीतर कडकडून चावणाऱ्या लाल मुंग्या. भारतात मुंग्यांच्या सुमारे एक हजार जाती आढळतात.

कीटकवर्गात सर्वांत जास्त उद्योगी, कष्टाळू, शिस्तप्रिय व हुशार म्हणून मुंग्यांचे नाव सर्वप्रथम घेतले जाते. मुंगी हा समाजप्रिय कीटक वसाहत करून राहतो. एका वसाहतीमध्ये लाखोंच्या संख्येने मुंग्या राहतात.


प्रत्येक वसाहतीत अनेक कामकरी मुंग्या, एक किंवा काही राणी मुंग्या आणि काही नर मुंग्या असतात.

मुंग्या एकमेकांशी बोलत असतील का? कशा प्रकारे बोलत असतील? एका मुंगीला सापडलेला अन्नाचा साठा इतर मुंग्यांना कशा प्रकारे माहीत होतो? असे नाना प्रश्न आपल्याला पडतात. आपण एकमेकांशी संवाद साधतो. माणसाप्रमाणे मुंग्या नक्कीच बोलत नाहीत. निसर्गाने प्रत्येक सजीवाला संवादाकरिता विशिष्ट सोय करून दिली आहे. मुंग्यांनासुद्धा एकमेकांशी संवाद साधण्यासाठी निसर्गाने अशीच सोय केली आहे. मुंग्या वेगवेगळ्या कारणांसाठी वेगवेगळ्या रासायनिक गंधकणांचा उपयोग करतात.

एखाद्या मुंगीला अन्नाचा साठा सापडला, की ती आपल्या वसाहतीकडे परत येताना त्या मार्गात



आपल्या शरीरातून विशिष्ट प्रकारचे गंधकण सोडत येते. मुंग्या हे गंधकण फक्त अन्नाचा साठा मिळाल्यावरच सोडतात. इतर वेळेस नाही. मग इतर मुंग्या मिश्यांच्या साहाय्याने या गंधकणांचा माग काढत अन्नसाठ्यापर्यंत पोहोचतात; म्हणून आपल्याला मुंग्या नेहमी रांगेने चाललेल्या दिसतात.



आपल्याला सगळ्या मुंग्या सारख्याच दिसतात; पण एखादी मुंगी आपल्याच वसाहतीमधील आहे, की दुसऱ्या वसाहतीमधील आहे, हे मुंग्यांनाच ओळखता येते. वेगवेगळ्या वसाहतींच्या मुंग्यांना विशिष्ट असा गंध असतो. मुंग्या मिश्यांच्या साहाय्याने तो गंध ओळखतात. रांगेत जाणाऱ्या दोन मुंग्या एकमेकांना कधीकधी भेटताना दिसतात त्यामागे हेच कारण आहे.

एखादे संकट आल्यावर मुंग्या लगेच एकमेकांना सावध करतात. यासाठी मुंग्या वेगळ्या प्रकारचे गंधकण बाहेर सोडतात. या गंधकणांचा सुगावा लागताच इतर मुंग्या त्या मुंगीच्या मदतीसाठी ताबडतोब धावत येतात. त्याबरोबर सावधानतेचा इशारा देणारे गंधकणसुद्धा हवेत सोडतात. त्यात एखाद्या मुंगीला चिरडले, तर या गंधकणांचा परिणाम अधिक तीव्र होतो. अशा वेळी अधिक प्रमाणात हे गंधकण सोडले जातात.

संदेश पोहोचवण्याच्या दृष्टीने मुंग्या आपल्या शरीराचा पृष्ठभागदेखील घासतात. त्यातून येणाऱ्या आवाजाच्या साहाय्याने त्या आपल्या वसाहतीमधील इतरांना संदेश देत असतात. निरनिराळ्या प्रकाराने मुंग्या एकमेकांशी संवाद साधतात.

स्वतःचे आणि वसाहतीचे संरक्षण करण्यासाठी मुंग्या नेहमी तत्पर असतात. स्वतःच्या किंवा वसाहतीच्या संरक्षणासाठी काही मुंग्या कडकडून चावा घेतात. काही मुंग्या विषारी दंश करतात, तर काही विशिष्ट आम्लाचा फवारा शत्रूवर सोडतात. नकळत एखाद्या वेळेला लाल मुंग्यांच्या वसाहतीवर पाय पडल्यास काय होते ते तुम्हांला सांगण्याची गरज नाही. वसाहतीवर संकट आणणाऱ्या मोठ्या शत्रूला सगळ्या मुंग्यांनी मिळून चावा घेतला, की त्याला तेथून पळ काढावाच लागतो. काही जातींच्या मुंग्यांना दंश करण्यासाठी सुईसारखी योजना केलेली असते. दंश करताच प्राण्याच्या शरीरात विष सोडले जाते. या विषाचा मोठ्या प्राण्यांवर फारसा प्रभाव जाणवत नाही; परंतु अशा अनेक दंशांपासून होणारा दाह त्या प्राण्याला वसाहतीपासून दूर करण्यात यशस्वी ठरतो. या मुंग्यांचा प्रभाव हाणून पाडणारे त्यांचे बरेच शत्रूदेखील आहेत. अर्थातच निसर्गाने निर्माण केलेल्या अन्नसाखळीचा हा एक भागच आहे, हे आपल्याला कसे विसरून चालेल!

अशा या उद्यमशील, शिस्तबद्ध, सामाजिक जीवन जगणाऱ्या मुंग्यांकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे.

**– प्रकाश किसन नवाळे**

**शब्दार्थ :** **वसाहत** – राहण्याचे ठिकाण, वस्ती. **गंध** – वास. **माग काढणे** – शोध घेणे. **सुगावा लागणे** – शोध लागणे. **तत्पर असणे** – तयार असणे. **पळ काढणे** – निघून जाणे. **दाह होणे** –आग होणे. **हाणून पाडणे** – निष्फळ करणे, खोडून काढणे. **उद्यमशील** – उद्योगप्रिय.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कीटकांमध्ये मुंगीचे नाव सर्वप्रथम का घेतले जाते?

(आ) मुंग्या गंधकण केव्हा सोडतात?

(इ) मुंग्या नेहमी कशासाठी तत्पर असतात?

**प्र. २. मुंग्या स्वतःचे व वसाहतीचे संरक्षण कसे करतात?**

**प्र. ३. वाक्यात उपयोग करा.**

माग काढणे, सावध करणे, फवारा सोडणे, तत्पर असणे, पळ काढणे, दाह होणे, हाणून पाडणे.

**प्र. ४. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) माणसांना दंश करणारे मुंग्यांप्रमाणे दुसरे कीटक कोणते? त्यांच्या दंशाचा माणसांवर काय परिणाम होतो?

(आ) ‘अन्नसाखळी’ म्हणजे काय? शिक्षकांकडून माहिती मिळवा व तुमच्या शब्दांत लिहा.

(इ) मुंग्यांप्रमाणे अन्नसाठा करणारे आणि अन्नसाठा न करणारे कीटक व प्राणी यांची नावे लिहा. ग्रंथालयात जाऊन पुस्तकांतून माहिती मिळवा.

**प्र. ५. या पाठात आलेले मुंग्यांचे कोणते गुण तुम्हांला आवडले ते सांगा.**

**प्र. ६. मुंग्यांवरील कविता शोधा व वर्गात म्हणून दाखवा.**

**प्र. ७. ‘मुंगी’ या शब्दाची वेगवेगळी रूपे या पाठात आलेली आहेत. ती शोधा व लिहा. याप्रमाणे एखाद्या शब्दाची वेगवेगळी रूपे लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून पाठाचे प्रकट वाचन व मूकवाचन करून घ्यावे.

**उपक्रम :** १. वेगवेगळे प्राणी, पक्षी वेगवेगळ्या कारणांसाठी एकमेकांशी संवाद साधतात. संवाद साधण्यासाठी ते काय काय करतात याचे परिसरात निरीक्षण करा. तुम्ही केलेले निरीक्षण वर्गात सांगा.

२. पाच कीटकांची चित्रे मिळवा. ती वहीत चिकटवा. प्रत्येक कीटकाविषयी चार-पाच वाक्यांत माहिती लिहा.

३. माणसे एकमेकांना संदेश पाठवण्यासाठी कोणकोणती माध्यमे वापरतात, याविषयी माहिती मिळवा. गटात एकमेकांना सांगा.

- **खालील वाक्यांतील नामे ओळखा व सांगा.**

(अ) बंडूची इजार चार बोटे लांब झाली.
(आ) आईने इजार एका कोनाड्यात फेकली.
(इ) माणसांप्रमाणे मुंग्या नक्कीच बोलत नाहीत.
(ई) आज कविता भारतातील अव्वल धावपटू आहे.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य नामे घाला.**

(अ) .......... माधवला म्हणाली.
(आ) आंब्याच्या झाडावर .......... लटकत होत्या.
(इ) घसरगुंडी खेळायला आम्ही .......... गेलो.
(ई) .......... विषय मला खूप आवडतो.
(उ) राष्ट्रपतींचे भाषण ऐकून .......... मंत्रमुग्ध झाला.
(ऊ) महागाई वाढल्याने .......... महागल्या.

## खेळ खेळूया.

एकमेकांशी बोलताना आपण शब्दांचा वापर करतो. कधीकधी शब्दांचा वापर न करता एकमेकांशी बोलतो, तेव्हा आपण शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांचा उपयोग करतो. कधी एकाच अवयवाचा उपयोग करतो, तर कधी दोन-तीन अवयवांचा उपयोग करतो.

**उदा.**, मला खूप भूक लागली आहे, हे सांगताना आपण आपल्या हाताची बोटे एकत्र करून तोंडाजवळ नेतो व दुसरा हात आपल्या पोटावर ठेवतो, असा आपण मूक अभिनय करतो.

खालील वाक्ये वाचा व त्यांतील आशय न बोलता व्यक्त करा.

| | |
|---|---|
| १. गप्प बस. | ६. आई झोपली. |
| २. लिही. | ७. लंगडी घाल. |
| ३. चुकलो. | ८. मला लाडू आवडत नाही. |
| ४. नको. | ९. होय. |
| ५. फेक. | १०. पाणी हवंय. |

शिक्षकांनी वर्गातील विद्यार्थ्यांचे दोन गट करावे. एका गटातील मुलाने वाक्य सांगावे व दुसऱ्या गटातील मुलाने त्या वाक्याच्या आशयानुसार कृती करावी. हा मूकाभिनयाचा खेळ घ्यावा.

# ६. माहेर

• ऐका. म्हणा. वाचा.

तापीकाठची चिकण माती,
ओटा तरी बांधू ग बाई.

असा ओटा चांगला तर,
जातं तरी मांडू ग बाई.

असं जातं चांगलं तर,
सोजी तरी दळू ग बाई.

अशी सोजी चांगली तर,
लाडू तरी बांधू ग बाई.

असे लाडू चांगले तर,
शेल्याच्या पदरी बांधू ग बाई.

असा शेला चांगला तर,
भाऊराया भेटू ग बाई.

असा भाऊ चांगला तर,
दारी रथ आणील ग बाई.

असा रथ चांगला तर,
नंदी तरी जुंपिन ग बाई.

असा नंदी चांगला तर,
माहेराला जाऊ ग बाई.

असं माहेर चांगलं तर,
धिंगामस्ती करू ग बाई!

– **सदाशिव माळी**



**शब्दार्थ :** **चिकण माती** – चिकटपणा असलेली माती. **जातं** – धान्य दळण्याचे दगडाचे साधन. **सोजी** – ओलसर गहू दळून चाळलेले पीठ/रवा. **शेला** – अंगावर पांघरायचे भरजरी वस्त्र. **नंदी** – सजवलेला थोराड बैल.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवितेत कोणत्या नदीचा उल्लेख केलेला आहे?

(आ) या नदीकाठच्या मातीचा प्रकार कोणता?

(इ) कवितेतील स्त्री सोजीचे लाडू कशात बांधणार आहे?

(ई) कवितेतील स्त्री सोजीचे लाडू घेऊन कोठे जाणार आहे?

**प्र. २. काय ते लिहा.**

(अ) ओटा बांधण्यासाठी उपयुक्त माती .............

(आ) लाडू बांधण्यासाठी उपयुक्त पीठ .............

(इ) बहिणीसाठी भाऊ आणणार असलेले वाहन .............

**प्र. ३. चिकणमाती बघून कवितेतील माहेरवाशिणीला एकातून एक कल्पना सुचत गेल्या. त्या कल्पना तुमच्या शब्दांत क्रमाने सांगा.**

**उपक्रम :** १. तुमच्या परिसरातील मातीचे वेगवेगळे नमुने गोळा करा. प्रत्येक नमुन्याचे वैशिष्ट्य व उपयोग माहीत करून घ्या. वर्गात सांगा.

२. नागपंचमीची गाणी, नवरात्रीतील भोंडल्याची गाणी अशा गाण्यांचा संग्रह करा.

### खेळूया शब्दांशी.

'नंदी' या शब्दातील 'न' या अक्षरावरील अनुस्वार लिहिताना, वाचताना विसरला, तर 'नदी' हा वेगळा शब्द तयार होतो. या शब्दाचा अर्थ मूळ शब्दापेक्षा वेगळा होतो.

नंदी – नदी अशा प्रकारच्या शब्दांच्या पाच जोड्या लिहा. त्यांतील शब्दांचे अर्थ सांगा.

### हे करून पाहा.

चिकणमातीपासून तुमच्या आवडीची खेळणी, किल्ला बनवा. यासाठी तुम्ही केलेल्या कृती क्रमाने सांगा.

### आपण समजून घेऊया.

### सर्वनाम

सुधीर हुशार मुलगा आहे. सुधीरच्या बहिणीचे नाव सुमन आहे. सुधीर सुमनला 'सुमा' म्हणतो. सुमन सुधीरला 'दादा' म्हणते. सुधीर आणि सुमन एकाच शाळेत शिकतात. सुधीर आणि सुमन यांच्यात कधीच भांडणे होत नाहीत. सुधीर मोठा असल्याने सुधीर सुमनची काळजी घेतो.

वरील परिच्छेदात सुधीर आणि सुमन या भावंडांचे वर्णन आलेले आहे. सुधीर व सुमन या शब्दांऐवजी दुसरे शब्द वापरून तयार केलेला पुढील परिच्छेद वाचा.

सुधीर हुशार मुलगा आहे. त्याच्या बहिणीचे नाव सुमन आहे. तो तिला 'सुमा' म्हणतो. ती त्याला 'दादा' म्हणते. ते एकाच शाळेत शिकतात. त्यांच्यात कधीच भांडणे होत नाहीत. तो मोठा असल्याने तो तिची काळजी घेतो.

सुधीर आणि सुमन या नामांऐवजी आपण येथे 'त्याच्या, तो, तिला, ती, त्याला, ते, त्यांच्यात, तो, तिची' असे शब्द वापरले आहेत. या शब्दांना सर्वनाम म्हणतात.

# ७. अरण्यलिपी





प्राणी पाहण्यासाठी आपण कधीकधी जंगलात खूप भटकतो; पण एखाद्या वेळी एकही प्राणी आपल्याला दिसत नाही आणि आपण नाराज होतो, निराश होतो. जंगलात जरी प्राणी दिसले नाहीत, तरी त्यांच्या खाणाखुणा सर्वत्र विखुरलेल्या असतात. त्या खाणाखुणा म्हणजे वन्य प्राण्यांची अरण्यलिपी होय.

वन्य जीव जंगलात ठरलेल्या पाऊलवाटेवरून ये-जा करतात. त्या पाऊलवाटांचे निरीक्षण करावे. त्यात तुम्हांला वन्य जीवांच्या पावलांचे ठसे उमटलेले दिसतील. पाणवठ्यावर गेलात, तर तेथील ओल्या मातीतही अनेक वन्य जीवांच्या पावलांचे ठसे तुम्हांस पाहायला मिळतील. ठसे ताजे व स्पष्ट असतील, तर कोणता प्राणी पाऊलवाटेवरून गेला अथवा किती वेळापूर्वी पाण्यावर येऊन गेला याची माहिती मिळते. प्रत्येक जातीच्या प्राण्यांच्या पायांचे ठसे वेगवेगळे असतात. अगदी सकाळी नरम जमिनीवरील धुळीत त्यांच्या पायांचे ठसे स्पष्ट दिसतात. दिवस जसजसा पुढे सरकतो, तसतसे इतर प्राण्यांच्या वर्दळीने, वाहणाऱ्या वाऱ्याने असे ठसे पुसट होत जातात. पाणवठ्यावरील ओल्या मातीत अनेक पक्ष्यांच्या पाऊलखुणा आढळतात. ह्या साऱ्या पाऊलखुणा रांगोळी घातल्यासारख्या सुंदर दिसतात. त्या पाहताना मनाला आनंद होतो.

वाघ वा बिबट्याच्या पावलांचा ठसा पाहायला मिळाल्यानंतर अधिक आनंद होतो. वाघाच्या पावलांचे ठसे इतर प्राण्यांपेक्षा वेगळे असतात. वाघ पायांचा आवाज होऊ नये, यासाठी पालापाचोळ्यातून चालणे टाळतो. तो पाऊलवाटेवरून, नदीनाल्यांच्या पात्रांतून, वाळूवरून चालतो. अशा पाऊलवाटा तपासाव्या. नदीनाल्यांतल्या ओल्या वाळूत, मातीत वाघाचे ठसे आढळतात, त्यावरून ते वाघाचे क्षेत्र आहे हे आपल्याला कळते. प्रत्येक वाघाच्या पायांच्या ठशांत फरक आढळतो. वाघाच्या पायाचा अंगठा पंजाच्या वरच्या बाजूस असतो. त्यामुळे अंगठ्याचा ठसा मातीत उमटत नाही. फक्त त्याचा तळवा व चार बोटांचा ठसा मातीत उमटतो. त्याचे करंगळीकडून तिसरे बोट मोठे असते. वाघाच्या पावलांच्या ठशांवरून वाघांची गणती केली जाते. चालताना तो मागचा पाय बरोबर पुढच्या पावलाच्या ठशावर टाकतो. त्यामुळे पुढच्या पावलाचा ठसा पुसला जातो; म्हणून शिरगणती करताना वाघ व बिबट्याच्या मागच्या पायांचे ठसे घेतात.

वाघाच्या ठशावरून तो वाघाचा आहे का वाघिणीचा आहे, हेही ओळखता येते. वाघ-वाघिणीचे पुढचे पाय चौकोनी असतात; परंतु त्यांच्या मागच्या पंजांत फरक असतो. वाघाचा पंजा चौकोनी असतो. त्याची लांबी-रुंदी सारखी असते; परंतु वाघिणीच्या मागच्या पायाचा तळवा आयताकृती असतो. रुंदीपेक्षा त्याची लांबी जास्त असते.

नर-मादीच्या पावलांचे ठसे जवळजवळ दिसल्यास ते दोघे बरोबर होते, असे समजायला हरकत नाही. ज्या प्राण्यांच्या पायांच्या नख्या बाहेर आलेल्या असतात, त्यांच्या पंजाच्या ठशात बोटांबरोबर नख्याही उमटलेल्या दिसतात.

तरसाचा ठसा तीन इंच लांब असतो. जंगली कुत्र्याचा ठसा सुबक दिसतो. त्याच्या पंजाचा तळवा व चार बोटे नख्यांसह मातीत उमटलेली दिसतात. चारही बोटांत अंतर असते. तळवा व बोटे यातही अंतर असते.

अस्वलाच्या पायाचा ठसा माणसाच्या पायाच्या ठशासारखा दिसतो. बोटाबरोबर त्याच्या पाचही लांब नख्या ठशात उमटलेल्या असतात.

खूर असलेल्या प्राण्यांचे ठसेही पाणवठ्यावर, मातीत पाहायला मिळतात. ओलसर मातीत वा कोरड्या मातीत ठसे चांगले दिसतात. चिखलात खोल पाय रुतत असल्याने ठसे पूर्णपणे दिसत नाहीत.

गव्याच्या खुरांचा ठसा मोठा असतो. तो सहा इंच भरतो. पाळीव गुरांच्या खुरासारखा दिसतो.

हरणाच्या खुरांचा ठसा लहान असतो. त्याच्या खुरांच्या दोन अर्धवर्तुळाकार भागाच्या खुणा जवळ जवळ दिसतात. सांबर, बाराशिंगा, बौशिंगा, चिंकारा व काळवीट यांच्या खुरांचे ठसे कमी-जास्त आकारांचे असतात. भेकराच्या खुराचा ठसा अवघा एक ते सव्वा इंच असतो.

एकंदरीत वन्य प्राण्यांच्या ठशांवरून आपल्याला प्राण्यांची बरीच माहिती मिळते. त्यावरून प्राणी कोणत्या दिशेला गेला ते कळते. काही प्राण्यांच्या ठशांवरून तो नर होता की मादी होती, ते समजते. चालताना त्यांचा मागचा पाय पुढच्या पायाच्या ठशावर पडत असतो. त्यामुळे एकच ठसा उमटलेला दिसतो; परंतु पळताना मागील व पुढील दोन्ही पायांचे ठसे दिसतात. त्यावरून तो चालत गेला, की पळत गेला ते कळते. दोन्ही पायांच्या ठशांमधील अंतर जेवढे कमी तेवढा तो वेगात पळत गेला असे समजावे. वन्य प्राण्यांच्या ठशांचे निरीक्षण करणे मजेशीर असते त्यात वेळ कसा जातो ते समजत नाही.

काही प्राणी ठरावीक ठिकाणीच विष्ठा टाकतात. विष्ठेचा आकार, रंग यांवरून ते प्राणी चटकन ओळखता येतात.

काही प्राण्यांच्या विष्ठेत शिकार केलेल्या प्राण्यांचे न पचलेले भाग- जसे केस, नखे व हाडे आढळून येतात. त्या निरीक्षणावरून ती शिकार कोणत्या प्राण्याची असेल हे ओळखता येते.

जंगलातून फिरताना आपल्याला अनेक आवाज ऐकू येतात. उंच उंच गवतातून पाण्याकडे येणारे हिंस्र प्राणी पाहून पक्षी मोठ्याने आवाज करत उंच उडतात, तर शिकार होणारे प्राणी- जसे हरिण, सांबर व काळवीट मोठ्या आवाजात ओरडत धोक्याची सूचना देतात.

वन्य प्राण्यांच्या पावलांचे ठसे, शिकार करण्याची पद्धत, विष्ठा व झाडा-झुडपांवरील त्यांच्या नख्यांच्या खुणा, दातांच्या खुणा, त्यांचे विविध आवाज यांवरून त्यांची आपल्याला ओळख होते. ही एक प्रकारची अरण्यलिपीच होय.

जंगलवाचनाचा आपल्याला छंद लागला, की डोळ्यांनी, कानांनी, नाकाने आपण प्राण्यांच्या अनेक गोष्टी जाणतो. प्राण्यांचे आवाज, पायांचे ठसे, वास आपल्याला प्राण्यांच्या जगाशी एकरूप करतात. ओढा, नदीकाठ, माळरान, डोंगरदऱ्या, ओहळ, झाडेझुडपे या सगळ्यांशी जवळीक निर्माण होते. कुठलेही जंगल आपल्याला कंटाळवाणे वाटत नाही, कारण जंगलवाचनाचा अनुभव आपल्याला नवीनवी माहिती आणि वेगळ्याच स्वरूपाचा आनंद मिळवून देतो.

**- सुरेशचंद्र वारघडे**

**शब्दार्थ :** **पाणवठा** – जंगलातील प्राणी पाणी पिण्यासाठी जेथे येतात ते ठिकाण, पाणी भरण्याचे सार्वजनिक ठिकाण. **शिरगणती** – मोजदाद.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अरण्यलिपी म्हणजे काय?

(आ) वाघांची गणती कशावरून केली जाते?

(इ) जंगलात कोणते प्राणी धोक्याची सूचना देतात?

**प्र. २. खालील प्रश्नांची तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) 'वाघाचे क्षेत्र' कशावरून ओळखता येते?

(आ) वाघ-वाघिणीच्या ठशांमध्ये काय फरक असतो?

(इ) शिकार झालेला प्राणी कोणता होता, हे कशावरून ओळखता येते?

**प्र. ३. तुमच्या शब्दांत लिहा.**

तुमच्या घरी, शेजारी कोणकोणते प्राणी आहेत, ते कसे चालतात, ते काय खातात तसेच वेगवेगळ्या प्रसंगी त्यांनी केलेल्या कृतींचे व आवाजांचे निरीक्षण करा. तुमचे अनुभव लिहा.

**उपक्रम :** १. तुमच्या परिसरातील पाच प्राण्यांच्या पावलांचे किंवा पावलांच्या ठशांचे निरीक्षण करा. ठशांवरून हे प्राणी तुम्ही कसे ओळखले ते मित्रांना सांगा.

२. खालील प्रकारचे ठसे घ्या. त्यांचे निरीक्षण करा. ठशांतील सारखेपणा, वेगळेपणा सांगा.

(अ) तुमच्या दोन्ही हातांच्या बोटांचे ठसे कागदावर घ्या. त्यांचे निरीक्षण करा. पाच-पाच मुलांचे गट करा. प्रत्येकाच्या हाताच्या व पायाच्या बोटांचे ठसे कागदावर घ्या. निरीक्षण करा व फरक सांगा.

(आ) भेंडी व कांदा यांचे काप घ्या. ते रंगात बुडवा. त्यांचे कागदावर ठसे घ्या. त्यांपासून चित्रे बनवा.

३. पक्षी निरीक्षणावरील पुस्तके मिळवा व वाचा.

४. निरक्षर व्यक्तींना सही करता येत नाही. अशा वेळी त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा घेतला जातो; पण कधीकधी साक्षर व्यक्तींच्याही बोटांचे ठसे घेतले जातात. कोणकोणत्या कामांसाठी व्यक्तींच्या बोटांचे ठसे घेतले जातात याची शिक्षक, आईवडील यांच्याकडून माहिती घ्या.

- **पायांना रंग लावून, पायांचे ठसे कसे काढलेले आहेत ते पाहा.**





## खेळूया शब्दांशी.

- मूळ शब्द ठसा. या शब्दाचे सामान्यरूप होताना 'स' चा 'श' होतो. उदा., ठशावरून, ठशात, ठशांचा इत्यादी. याप्रमाणे पैसा, म्हैस या शब्दांची सामान्यरूपे लिहा.
- या पाठात पालापाचोळा, झाडेझुडपे, नदीनाले हे जोडशब्द आले आहेत. यासारखे तुम्हांला माहीत असलेले आणखी जोडशब्द लिहा.
- 'मजा' या शब्दाला 'शीर' शब्द लागून 'मजेशीर' हा शब्द तयार झाला आहे. यासारखे आणखी शब्द शोधा. त्यांचा संग्रह करा.
- **वाचा.**

सुभाष शाळेत आला. समोरच त्याला त्याचा मित्र समीर दिसला. सुभाषला खूप आनंद झाला. तो म्हणाला, ''मित्रा, काय रे, कसा आहेस? बरं वाटतंय ना तुला? तू नव्हतास तर मला करमत नव्हतं..... .'' सुभाष बोलत होता. बोलताना तो अगदी रडवेला झाला होता. समीरने त्याच्या खांद्यावर हात ठेवला व त्याने सांगायला सुरुवात केली.

**वरील परिच्छेदात अधोरेखित केलेली सर्वनामे कोणासाठी वापरली आहेत, ते त्या शब्दांसमोर लिहा.**

**उदा.,** त्याला – सुभाषसाठी.

(अ) त्याचा – (इ) तुला – (उ) मला – (ए) त्याच्या –

(आ) तो – (ई) तू – (ऊ) तो – (ऐ) त्याने –

- **खाली काही वाक्ये दिली आहेत. त्यांतील नामे ओळखून त्यांसाठी योग्य ती सर्वनामे वापरा.**

(अ) हसीना खूप हुशार आहे. ........... रोज शाळेत जाते.

(आ) पक्षी उडत उडत लांब गेले. ........... दिसेनासे झाले.

(इ) बाई मुलांना खाऊ वाटत होत्या. ........... मुलांशी गप्पा मारत होत्या.

(ई) भाऊ घरात गेला. ........... काही सुचेना.

- **खालील वाक्यांतील सर्वनामे अधोरेखित करा.**

(अ) ते बाजारात गेले.

(आ) तुला त्यांनी हाका मारल्या.

(इ) आम्ही जेवत होतो.

(ई) त्याचा आवाज गोड आहे.

(उ) मी स्वतः झाडून घेतले.

(ऊ) आपण प्रकल्प पूर्ण करूया.

- **या पाठातील सर्वनामे शोधा व लिहा.**

9ZJPX4

# ८. प्रिय बाई...





दि. ५/९/२०२२

प्रिय बाई,

मला टीव्हीवर आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाची बातमी दिसली आणि त्यात चक्क तुम्ही दिसलात! मी तर आनंदानं उडालेच. हाका मारून आई, बाबा, आजोबांना बोलावलं; पण तेवढ्यात बातमी संपली. जवळपास दीड वर्षांनी तुम्ही मला दिसलात. खूप मस्त वाटलं. तुमची, शाळेची, तिसरीतल्या मित्रमैत्रिणींची खूप आठवण आली. मी तुम्हांला मोबाईल लावू लागले, तर 'कव्हरेज क्षेत्राच्या बाहेर' ची टेप वाजू लागली. आजोबा म्हणाले, ''अगं, या मोबाईलचं काही खरं नाही, त्यापेक्षा पत्र लिही बाईंना. कायम आठवणीत राहील त्यांच्या.'' मग काय, लगेच हे पत्र लिहायला बसले.

पुरस्काराची बातमी पाहून खूप आनंद झाला. तुम्ही आम्हांला पहिल्यापासून आवडायच्या हे नक्की. तुम्ही शिकवलेल्या कविता, स्नेहसंमेलनामध्ये बसवलेलं नाटक हे सगळं आठवलं. सहलीच्या वेळी तुम्ही घेतलेले भन्नाट खेळ तर मी इकडच्या शाळेतल्या मुलांना सांगितले. त्यांना एकदम भारी वाटलं. मला तिसरीत होते तेव्हाची आठवण येत राहतेच.

पाचवीत आल्यापासून मी शाळेत एकटी चालत जाऊ लागलेय. मला एकदम मोठ्ठी झाल्यासारखं वाटतं. अभ्यासही भरपूर करते आणि तुम्ही म्हणायच्या त्याप्रमाणे खेळतेही भरपूर. रोज संध्याकाळी खेळण्यासाठी जवळपास दोन तास मैदानावरच असते.

टीव्हीवरील बातमीमध्ये तुम्ही एकदम छानच वाटत होतात. तुम्ही कशा आहात? तुमच्या घराबाहेरचा गुलमोहर आता किती मोठा झालाय? त्याला फुलं येऊ लागली का? 'आठवण काढली' म्हणून शाळेत सगळ्यांना सांगा. स्वाती, जय आणि सलमाला सांगा, की मी या शाळेतपण फुली-गोळ्यांचा खेळ सगळ्यांना शिकवलाय. तो खेळ आम्ही मधल्या सुट्टीत खेळत असतो.

तुमच्या पत्राची वाट पाहीन. तुमचे पत्र मिळाल्यावर मी शाळेत सगळ्यांना दाखवीन.

तुमची,
ऊर्मिला

माझा पत्ता :
ऊर्मिला माने
मु. पो. ता. दापोली,
जि. रत्नागिरी.
पिन - ४१५७१२.



**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पत्र लिहिणाऱ्या मुलीचे नाव काय आहे?
(आ) पत्र लिहिणाऱ्या मुलीचे नाव तुम्ही कशावरून ओळखले?
(इ) ऊर्मिला आनंदाने का उडाली?
(ई) ऊर्मिला सध्या कोणत्या वर्गात शिकत आहे?
(उ) ऊर्मिलाने कोणत्या वर्गाच्या आठवणी पत्रातून कळवल्या आहेत?
(ऊ) ऊर्मिलाचे बाईंच्या घरी येणे-जाणे होते, हे कोणत्या वाक्यावरून कळते?

**प्र. २. खालील प्रश्नांची चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) ऊर्मिलाच्या आजोबांनी कोणता सल्ला दिला? का दिला?
(आ) पाचवीत आल्यापासून ऊर्मिलाच्या कोणकोणत्या गोष्टींत बदल झाला?
(इ) ऊर्मिलाने पत्रात कोणकोणत्या गोष्टींचा उल्लेख केला आहे?

**प्र. ३. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) तुम्ही टीव्हीवरचे कोणकोणते कार्यक्रम बघता?
(आ) टीव्हीवरचे कोणते कार्यक्रम तुम्हांला बघायला आवडतात? का आवडतात?
(इ) तुमच्या घरातील मोठी माणसे तुम्हांला कोणते कार्यक्रम बघायला सांगतात? त्यामागील कारणे सांगा.
(ई) दूर राहत असलेल्या व्यक्तींना तुमचे विचार, भावना, मत कळवायचे असेल, त्यांना काही विचारायचे असेल, तर तुम्ही कोणकोणती माध्यमे वापरता?

**उपक्रम :** १. बाईंनी ऊर्मिलाचे पत्र वाचून काय उत्तर पाठवले असेल, याची कल्पना करा व तसे पत्र लिहा.
२. तिसरी शिकलेल्या शाळेतील कोणकोणत्या गोष्टी खूप आवडल्या, हे ऊर्मिलाने पत्रातून कळवले. तसे तुमच्या शाळेतील कोणकोणत्या गोष्टी तुम्हांला खूप आवडतात, हे तुमच्या मामाला पत्र लिहून कळवा.
३. बाई आणि ऊर्मिला एकमेकींशी फोनवर बोलत आहेत, अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद वर्गात सादर करा.

**खेळूया शब्दांशी.**

मी तर आनंदाने उडालेच. यशाने त्याच्या डोक्यात हवा गेली. गर्वाचा फुगा फुटला असे आपण बोलतो. ‘उडणे’, ‘हवा जाणे’, ‘फुगा फुटणे’ या क्रियांचा शब्दशः अर्थ येथे अभिप्रेत नाही. तशा क्रिया प्रत्यक्ष घडतही नाहीत, पण मनातला भाव व्यक्त होतो. असे अनेक शब्दप्रयोग रोजच्या बोलण्यात आपण सहज करतो. अशा शब्दप्रयोगांची यादी करा. मित्रमैत्रिणींशी गप्पा मारताना त्यातील गंमत अनुभवा.

**शोध घेऊया.**

माहिती घेण्यासाठी किंवा देण्यासाठी अनेक साधने आहेत. पुढील पानावरील चौकटीत काही साधने दिली आहेत. त्यांतील काही साधने एकतर्फी व काही साधने दुतर्फी माहितीची देवाणघेवाण करतात. त्यांची माहिती मिळवा. एकतर्फी माहितीची देवाणघेवाण करणाऱ्या साधनांपुढे ⟶ अशी खूण करा. तर दुतर्फी माहितीची देवाणघेवाण करणाऱ्या साधनांपुढे ⟷ अशी खूण करा. या साधनांचे एकतर्फी व दुतर्फी साधने असे वर्गीकरण करा.

| | | | |
|---|---|---|---|
| **उदा.,** चिठ्ठी ⟶ | | | |
| फॅक्स | मोबाईल | वर्तमानपत्र | मुलाखत |
| पत्र | आंतरजाल | मोबाईल संदेश | जाहिरात |
| फोन | रेडिओ | संभाषण | |
| चर्चा | दूरचित्रवाणी | भाषण | |

- **खालील संवाद वाचा. सर्वनामांना अधोरेखित करा.**

नीता : आज आपण झोका खेळूया.
मंदार : दादा, तू पण चल ना!
दादा : मी नाही येणार. मुग्धाला ने.
मंदार : ती आणि आत्या बाजारात गेल्या आहेत.
दादा : त्या आल्या की तुम्ही खेळा.
नीता : आम्ही नाही खेळणार तू आल्याशिवाय!

- **खालील वाक्य वाचा. त्याखालील वाक्यांत 'पिशवी' ऐवजी योग्य सर्वनामे वापरून वाक्ये लिहा.**

पिशवी खूप सुंदर होती.

(अ) पिशवीचा रंग गुलाबी होता.
(आ) पिशवीत खूप वस्तू ठेवता येत होत्या.
(इ) पिशवीला काचा, मणी लावलेले होते.
(ई) पिशवी माझ्या मैत्रिणींना खूप आवडली.

- **खालील वाक्यांतील गाळलेल्या जागी कंसातील योग्य सर्वनामे लिहा.**

(अ) .......... बाजारातून भाजी आणूया.
(तुम्ही, आपण, आम्ही)

(आ) आईने जेवायला .......... केले आहे?
(कोणी, कोण, काय)

(इ) कर्ण दानशूर होता. .......... दररोज दान द्यायचा.
(तो, ती, त्या)


(ई) ताईने .......... मैत्रिणींसाठी स्वयंपाक केला.
(तिच्या, त्याच्या, त्यांच्या)

(उ) आज .......... खूप मजा केली.
(आपण, स्वतः, आम्ही)

(ऊ) रमेशने .......... मित्रांना वाढदिवसाला बोलवले.
(त्याच्या, तिच्या, त्यांच्या)

# ९. जनाई





दुपारची मोट थांबली तशी जनाई उसाच्या फडातून बाहेर आली. पाण्याची दारं मोडून कंबर धरली होती. पाल्यानं कापलेलं अंग सारं भगभगत होतं. केव्हा घरात जाऊन पडीन, असं तिला झालं होतं; पण थेट वस्तीवर न जाता वाट वाकडी करून ती शेंगांच्या वावरात शिरली. आज सोमवार. दोन वेल उपटून घ्यावेत. पोरंही चार शेंगा खातील आणि आपल्याही पोटाला जरा आधार होईल, म्हणून लगालगा ती शेंगांच्या वावरात आली नि भुलल्यागत बघत उभी राहिली.

गॅसबत्तीच्या प्रकाशात हिरवागार शालू झागमाग करावा तसं ते वावर चमकत होतं. वर ऊन असलं तरी खाली गार वाटत होतं. शेंगांना आलेली पिवळी फुलं वेलबुट्टीगत दिसत होती. हिरव्या-पिवळ्या रेशमी धाग्यांचा एक रुमालच खाली विणला होता. रात्रंदिवस घाम गाळून आपल्या हातांनी काढलेल्या त्या कशिद्याकडे बघत जनाई थोडा वेळ उभी राहिली आणि एकाएकी एक विमान चालल्याचा आवाज कानावर येऊ लागला. भर दुपारची वेळ आणि रौं रौं रौं करून आवाज कानावर येऊ लागला. 'अगंबाई, विमान!' म्हणून तिनं वर बघितलं, पण वर काहीच नव्हतं! नुसतं कोरडं आभाळ पसरलं होतं.

निळंभोर आभाळ. चिटपाखरूसुद्धा नव्हतं आणि रौं रौं रौं असा आवाज तेवढा कानावर येत होता. कुठून आवाज येतोय हे कळेना आणि झेंडू फुटल्यागत झाला. उभं राहायला नको म्हणून गडबडीनं वेल उपटायला खाली वाकली आणि विमान समोरून अंगावर आल्याचा भास झाला! खाली केलेली मान वर करून बघती, तर समोरच्या चार काकरीचे वेल उलथेपालथे होत होते. भुईमुगाच्या आऱ्या वर उचलत होत्या आणि पायाखालची जमीन हादरा देत होती. रौं रौं रौं असा आवाज जवळ येत होता आणि डोळ्यांनी बघितलं तर काळ्या ठिपक्यांची एक चार वाव तुळी अंगावर धावून येत होती! 'अगंबाई, साप!' म्हणून जनाई झटक्यानं मागे फिरली आणि जमिनीला पाय न टेकता वारं सुटावं तशी पळत सुटली. मागे न बघता थेट वस्तीवर येऊन थडकली. धाबं दणाणून गेलं होतं. तिच्या जिवात जीव नव्हता. पोटात घाबरा

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून गटागटाने प्रकट वाचन करून घ्यावे. गटातील प्रत्येक विद्यार्थ्याला एक-एक घटना क्रमाने सांगायला लावावी. पूर्ण कथा विद्यार्थ्यांना सांगायला लावावी.

पडला होता. अंग सारं घामानं थबथबलं होतं. तोंडावाटे शब्द फुटत नव्हता. वाचाच गेल्यागत झाली होती. हातपाय थरथरत होते. ऊर धाड्धाड् करीत होता. वस्ती कशी गाठली हेच तिला समजत नव्हतं. वस्ती गाठली हे तरी खरं का, म्हणून डोळ्यांनी ती भोवती बघत होती. मनाची खात्री करून घेत होती आणि आजूबाजूचे सारे भाऊबंद गोळा होऊन येत होते.

बघता बघता सारी वस्ती गोळा होऊन आली. कालवा उडाला. 'काय झालं आये?' म्हणून पोरं पदराला धरून विचारू लागली. जमा झालेली सारी माणसं तोंडाकडे बघत राहिली. आता काय सांगायचं? ऊर अजून धडधडत होता. कानांतला आवाज जात नव्हता. काही बोलणंच सुदरत नव्हतं आणि कसं सांगायचं? तोवर चुलत सासराही उठून आला आणि विचारू लागला, ''काय झालं जना? उनाची अशी आरडत, पळत का आलीस?''

धाप लागलेला ऊर तिला धड बोलू देत नव्हता. घडला प्रसंग कसाबसा तिनं वर्णन केला आणि लोकांच्या तोंडाकडे बघत ती गप्पच बसून राहिली. ते ऐकून सारी वस्ती भ्याल्यागत झाली. भ्याच पडलं. आपल्या रानात एक भुजंग आहे. पंधरा-वीस एकर रान हिंडतोय, असं आपल्या वाडवडलांकडून भाऊबंदांनीही ऐकलं होतं. ऐकून सगळ्यांना माहीत होतं; पण गेल्या दहा वर्षांत त्याचं नाव कधी निघालं नव्हतं. कधी कुणाची गाठभेट नव्हती. एकदा, दोनदा त्याची कात तेवढी रानात आढळली होती, त्यावर त्याचा कधी दूम नव्हता. कैक वर्षे त्याचा विसर पडल्यागतच झाला होता. त्यावर आज जनाईला दर्शन दिलं होतं. वस्ती सारी चपापल्यागत झाली होती. जनाईच्या पोटात तर खड्डाच पडला. गोळा झालेले भाऊबंद निघून गेले आणि ऐकलेला आवाज कानात घुमत राहिला. एक विमान सारखं फिरत राहिलं.

तरीही घरात बसून भागणार नव्हतं. जिवाचा धडा करून जनाई शेतावर जात राहिली. एक दिवस 'तो' समोर येऊन ठाकल्यावर मात्र तिनं त्यालाच बजावलं-

'का बाबा, आमची पाठ घेतलीयस? कशापायी भ्या दावाय लागलाईस? आमच्या रानात वस्तीला ऱ्हाइलाईस, तर आमची राखन करशील का भ्या दावशील? तूच राखन कराय पायजेस. कसं कसं चाललंय ते तू बघतोस न्हवं? कशा तऱ्हेनं दिवस कंठाय लागलोय, हे काय तुला म्हाईत न्हाई? बाबा, लई जीव वैतागलाय माझा! वस्तीला हैस आमच्या. लई न्हाई थोडी तरी तुला कळकळ याय पायजे. कुणाचं पाठबळ हाय का सांग बघू आम्हांला? माझ्याशिवाय कोन फुडं होऊन करनार हाय का आमच्या घरात? मग बाईमानसाला इनाकारणी तरास देणं हे तुझं काम न्हाय! माझ्या वाटंला तू जाऊनेस. ह्येच्यापरास काय तुला मी आता ज्यास्त सांगत न्हाई. ... सांगायचं ते तुला सऽऽगळं सांगितलंय. आता निवांत जरा झाडाखाली बसून भाकरी खातो, तवर आपला कुठंतरी गपगार निघून जा कसा. माझी भाकरी खाऊन झाली म्हंजे मी जुंदळा कापायला लागनार बग! असं बसून कसं भागंल? दिवस बुडूस्तवर मला सगळं रान मोकळं कराय पायजे. हे बग, आता शेवटचं तुला हात जोडतो, मी मरायलाच आलोय ! काय करायचं ते तुझं तू ठरीव... खाऊ मी भाकर आता?'

परवानगी घेतल्यागत करून जनाई तिथनं हलली. बांधाच्या एका झाडाखाली सावलीला येऊन बसली. फडक्यातली भाकरी काढून हातावर घेतली आणि रानाकडं बघत निवांत घास मोडू लागली. तिथे दोन घटका बसून तिनं सावचित्तानं जेवण केलं. दोन्ही भाकरी तेवढ्या पोटात घातल्या. संगं आणल्यालं तांब्याभर पाणी प्याली. डर्रकन दोन ढेकर आले आणि मग ती उठली. आडवा पदर बांधून रानात शिरली. हातात विळा घेतला आणि मनगटासारखी धाटं भराभरा खाली जमिनीला लोळण घेऊ लागली.

**– शंकर पाटील**

**शब्दार्थ :** **पाण्याची दारे मोडणे** – पाटाचा प्रवाह बदलणे. **झेंडू फुटणे** – भीतीपोटी तोंडाला फेस येणे. **आरी** – भुईमुगाची जमिनीवर पसरलेली वेल. **वाव** – हाताने मोजण्याचे माप. **तुळी** – तुळई. **दूम** – पत्ता. **ह्येच्यापरास** – ह्यापेक्षा. **सावचित्तानं** – शांतपणे. **धाटं** – ज्वारी-बाजरीचे कणीस कापून राहिलेला भाग.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) जनाई उसाच्या फडात कोणते काम करत होती?

(आ) शेंगांच्या वावरातून जाताना आलेला आवाज ऐकून जनाईला काय वाटले?

(इ) जनाई का घाबरून गेली?

(ई) जनाईला शेतात का जावे लागणार होते?

**प्र. २. खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.**

रात्रंदिवस घाम गाळणे, धाबे दणाणणे, पोटात घाबरा पडणे, पायाखालची जमीन हादरणे.

**प्र. ३. पाठात आलेल्या गोष्टींचे लेखकाने विशिष्ट शब्दांत वर्णन केले आहे. त्यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) शेंगांचे वावर | (अ) काळ्या ठिपक्यांची चार वाव तुळी |
| (२) शेंगांना आलेली पिवळी फुले | (आ) हिरवागार शालू |
| (३) साप | (इ) हिरव्या-पिवळ्या रेशमी धाग्यांचा रुमाल |
| (४) जेवण करून पोट भरले | (ई) मनगटासारखी धाटं |
| (५) जाड धाटं | (उ) डर्रकन दोन ढेकर आले. |

**प्र. ४. तुमच्या निरीक्षणावरून खालील गोष्टींचे वर्णन लिहा.**

(अ) पावसाळ्यात आकाशात जमलेले ढग – ..................................

(आ) पाऊस उघडल्यानंतर तारेवर ओळीने बसलेले पक्षी – ..................................

(इ) फुलांच्या शेतातील फुललेली फुलझाडे – ..................................

(ई) गुरुजींनी फळ्यावर सुंदर अक्षरांत लिहिलेल्या ओळी – ..................................

**प्र. ५. तुम्हांला आवडलेल्या पाठातील दोन ओळी लिहा.**

**प्र. ६. दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडा व वाक्ये पूर्ण करा.**

(अ) जनाईचे अंग भगभगत होते, कारण .......

  (अ) तिने खूप काम केले होते.
  (आ) उसाच्या पाल्यानं तिचे अंग कापले होते.
  (इ) तिला झोप आली होती.

(आ) जनाई वावरातून पळत सुटली, कारण .......

  (अ) तिला आकाशात विमान दिसले.
  (आ) तिच्या अंगावर साप धावून आला.
  (इ) तिचे काम संपले.

**प्र. ७. या कथेचा सारांश तुमच्या भाषेत लिहा.**

**प्र. ८. पाठात आलेले भुजंगाचे वर्णन तुम्ही वाचले आहे. एखादी गाय किंवा बैल तुमच्या समोरून जोरात पळत येत आहे, अशी कल्पना करून त्याचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.**

- **खालील उतारा वाचा व त्यात आलेले वाक्प्रचार व म्हणी शोधा. लिहा.**

दीपा हिरमुसल्या चेहऱ्याने घरी आली. तिचा पडलेला चेहरा पाहून आई स्वतःशीच म्हणाली, 'दीपा नेहमी हसतमुख असते. आज काय झालं असेल? विचारायला पाहिजे.'

आई म्हणाली, ''अगं दीपा, तुझं कुणाशी बिनसलंय का? हल्ली तुझी मैत्रीण गीता तुझ्याबरोबर दिसत नाही.''

दीपा म्हणाली, ''आई, मी गीताच्या बोलण्याकडे कानाडोळा करायचं ठरवलं आहे. अति झालं नि हसू आलं, असंच वागते सध्या ती. अति तिथं माती, हे तिला कसं समजत नाही? ज्याला त्याला उपदेशाचे डोस पाजत असते. अति शहाणा त्याचा बैल रिकामा, असं तिच्या पाठीमागे सगळे म्हणतात. नमनाला घडाभर तेल घालायची तिची सवय तुला माहीतच आहे. आई, हल्ली सगळ्या मैत्रिणी तिच्यापासून चार हात लांबच राहतात. गीताला वेळीच सावध केलं पाहिजे. काही झालं तरी गीता माझी जीवश्च कंठश्च मैत्रीण आहे. तिच्यासाठी जीव तुटतो माझा. तिला कोणी नावं ठेवली, तर माझ्या जिवाची घालमेल होते.''

## आपण समजून घेऊया.

- **वाचा.**

एके दिवशी बाई म्हणाल्या, ''आपण शाळेत विद्यार्थी-भांडार सुरू करू. त्यात तुम्हा विद्यार्थ्यांना लागणाऱ्या वस्तू ठेवू. तुमच्यापैकी कोणत्याही दोन मुलांनी ते दररोज चालवा— यचे. शाळा सुरू होण्यापूर्वी, मध्यंतरात व शाळा सुटल्यानंतर अर्धा-अर्धा तास ते उघडे ठेवायचे. ठरलेना मग. उद्यापासून काम सुरु.

वरील उताऱ्यात '-' हे चिन्ह किती वेळा आले आहे?

'-' हे चिन्ह दोन कारणांनी वापरतात.

१. दोन शब्द जोडताना.

२. ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास.

'-' या चिन्हास संयोगचिन्ह म्हणतात.

- **वाचा.**

ती मुलगी—जिने त्या आजीला मदत केली. त्या मुलीला आज बक्षीस मिळाले. पण —

वरील उताऱ्यात — हे चिन्ह आले आहे.

वाक्यांमध्ये — हे चिन्ह दोन कारणांनी वापरतात.

१. स्पष्टीकरण द्यायचे असल्यास.

२. बोलताबोलता विचारमालिका तुटल्यास.

'—' या चिन्हास अपसरण चिन्ह म्हणतात.

**लक्षात ठेवा**

संयोग चिन्हाची लांबी अपसरण चिन्हापेक्षा कमी असते.

# १०. रंग जादुचे पेटीमधले

• ऐका. म्हणा. वाचा.

रंग जादुचे पेटीमधले इंद्रधनूचे असती,
पांढऱ्यातुनि निघती साती, पुन्हा पांढरे होती. ।।धृ।।

आकाशाला रंग निळा द्या,
छटा रुपेरी वरति असू द्या,
निळ्या अभाळी हिरवे राघू, किती पाखरे उडती. ।।१।।

अवतीभवती काढा डोंगर,
त्यावर तांबुस रंग काळसर,
डोंगरातुनी खळखळ खळखळ निर्झर स्वच्छ वाहती. ।।२।।

चार नेमक्या काढा रेषा,
विटाविटांच्या भिंती सरशा,
लहान-मोठ्या चौकोनांची खिडक्यादारे होती. ।।३।।

लाल लाल कौलारू छप्पर,
अलगत ठेवा वरती नंतर,
गारवेल जांभळ्या फुलांची डुलेल वाऱ्यावरती. ।।४।।

सजले आता तुमचे घरकुल,
पुढति त्याच्या पसरा हिरवळ,
पाऊलवाटेवरून तांबड्या सखेसोबती येती. ।।५।।

रंग जादुचे पेटीमधले इंद्रधनूचे असती,
आनंदाशी जुळवून देतील सदैव तुमची नाती.

– पद्मिनी बिनीवाले



**शब्दार्थ :** **निर्झर** – झरा. **सरशा** – नीटनेटक्या, उत्तम. **अलगत** – हळुवार. **गारवेल** – फुलांची एक वेल.

**शिक्षकांसाठी :** कवितेत आलेले पुढील शब्द विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे. जादुचे, घरकुल, पांढऱ्यातुनि, तांबुस, पुढति, अभाळी. कवितेत गेयतेसाठी हे शब्द असे लिहिले आहेत; परंतु मजकुरात लिहिताना जादूचे, घरकूल, पांढऱ्यातुनी, तांबूस, पुढती, आभाळी असे लिहावे, हे विद्यार्थ्यांना समजून सांगावे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हिरवे राघू कोठे उडत आहेत?

(आ) निर्झर कोठून व कसे वाहतात?

(इ) चित्रातील भिंती कशा तयार होतात?

(ई) पाऊलवाटेवरून कोण येते?

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) इंद्रधनुष्यातील रंगांना 'जादूच्या पेटीतील रंग' असे का म्हटले आहे?

(आ) कवितेत दिलेल्या प्रत्येक रंगाच्या प्रत्येकी पाच-पाच गोष्टींची नावे लिहा.

**प्र. ३. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

(अ) आभाळ (आ) निर्झर (इ) राघू (ई) घर (उ) वेल

**प्र. ४. तुम्हांला कोणत्या रंगाचे कपडे जास्त आवडतात? ते का आवडतात ते सांगा.**

**प्र. ५. कवितेत सांगितलेल्या चित्राप्रमाणे चित्र काढा. कवितेत सुचवल्याप्रमाणे रंगांचा वापर करून ते चित्र रंगवा.**

**प्र. ६. तुमच्या स्वत:च्या घराचे चित्र काढा. घराचे वर्णन करणारी कविता करा.**

**उपक्रम :** १. पाऊस पडून गेल्यानंतर कधीकधी आकाशात इंद्रधनुष्य दिसते. त्याचे निरीक्षण करा. त्याचे चित्र काढा व रंगवा.

२. सकाळी, दुपारी व सायंकाळी आकाशाचे निरीक्षण करा. त्यावेळी आकाशात दिसणाऱ्या ढगांचे रंग व आकार लक्षात ठेवा. पाहिलेल्या दृश्याचे वर्णन वर्गात करा.

३. परिसरातील घरे, वनस्पती, पाखरे, प्राणी यांचे निरीक्षण करा. तेथे कोणकोणते रंग वापरले आहेत ते पाहा. जास्त प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या दोन-तीन रंगांची नावे लिहा.

४. परिसरातील घरांच्या खिडक्या, दारे यांचे निरीक्षण करा. त्या तयार करण्यासाठी कोणकोणत्या वस्तू वापरल्या आहेत, त्यांना कोणकोणते रंग दिलेले आहेत याची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

### खेळूया शब्दांशी.

- कवितेत 'खिडक्यादारे' हा शब्द आला आहे. याचा अर्थ 'खिडक्या व दारे' असा होतो. यासारखे आणखी शब्द शोधा व लिहा.
- कवितेत 'सखेसोबती' हा जोडशब्द आला आहे. सखे आणि सोबती दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. यासारखे शब्द माहीत करून घ्या.

**हे करून पाहा.**

१. तुमच्या आवडीच्या वस्तू वापरून घराची प्रतिकृती तयार करा. घराच्या वेगवेगळ्या भागांना तुमच्या आवडीचे रंग द्या.


२. वाचा व कृती करून पाहा.

**रंग जादुचे पेटीमधले इंद्रधनूचे असती,**
**पांढऱ्यातुनि निघती साती, पुन्हा पांढरे होती.**

कवितेतील या ओळी तुम्ही वाचल्या. त्याचा पडताळा घेण्यासाठी एक छोटासा प्रयोग करा.

एक पुठ्ठा घ्या. त्या पुठ्ठ्यावर दहा सेमी त्रिज्येचा गोल कापा. त्याच्या मध्यभागी छिद्र पाडा. त्या छिद्रात एक लांबट आकाराचा खिळा किंवा सरळ तार घाला. जेणेकरून हा गोल त्याभोवती गोलाकार फिरू शकेल. गोलाच्या केंद्रापासून परिघापर्यंत समान अंतरावर सात रेषा काढा, म्हणजे गोलावर सात सारखे भाग दिसतील. प्रत्येक भागाला एक रंग याप्रमाणे तांबडा, नारिंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा आणि जांभळा असे रंग द्या.

आता खिळा किंवा तार हातात धरून पुठ्ठा गोल फिरवा. गोलाची गती कमी असते, तेव्हा विविध रंग ओळखू येतात. जास्त गती दिल्यावर काय होते, याचे निरीक्षण करा व सांगा.







**माहिती मिळवूया.**




प्रथम श्रेणीचे कोणतेही दोन रंग योग्य प्रमाणात मिसळल्याने द्वितीय श्रेणीचा रंग तयार होतो. द्वितीय श्रेणीचे कोणतेही दोन रंग योग्य प्रमाणात मिसळल्याने तृतीय श्रेणीचा रंग तयार होतो.

A1CD32

# ११. कठीण समय येता...



कृष्णाकाठी वसलेले राजापूर हे एक गाव. साखर कारखान्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात ऊस पिकवला जातो. उसाची वाहतूक बैलगाडीतून केली जाते. कारखान्यापर्यंत कच्चे-पक्के रस्ते आहेत. एकामागून एक उसाच्या गाड्या कारखान्याकडे जातात.



एकेदिवशी बैल थकल्यामुळे एक बैलगाडी इतर बैलगाड्यांच्या बरीच मागे राहिली होती. मुंडासे गुंडाळलेला गाडीवान गाडी हाकत होता. गाडीवर त्याची सात-आठ वर्षांची मुलगी व बाजूलाच त्याची बायको बसलेली होती.

ती बैलगाडी बंधाऱ्यालगतच्या उताराला लागली. रस्त्याच्या बाजूला खोदलेल्या मोठ्या खड्ड्याजवळ येताच आवाज झाला. बैलगाडीचे एक चाक निखळून बाजूला पडले. उसाने भरलेली गाडी एका बाजूला कलल्यामुळे गाडीवानाची बायको त्या खड्ड्यात पडली. वरून उसाचे बांधे तिच्या अंगावर पडू लागले. गाडीवर बसलेली मुलगी एकीकडे फेकली गेली. गाडीवान बैलांचा कासरा धरून धडपडत कसाबसा जमिनीवर आला; पण गाडी उलटली आणि बैलांच्या गळ्याला एकाएकी फास बसला. तो खड्डा तर उसाने पूर्णतः झाकला गेला.

नेमके याच वेळी दोन स्थानिक तरुण बाइकवरून कारखान्याकडे जाण्यास निघाले होते. त्यांनी हा सारा प्रकार पाहिला आणि मोटरसायकल रस्त्याच्या कडेला लावून ते गाडीकडे धावले. पहिल्यांदा बैलांचा गळफास सोडवून ते गाडीवानाकडे वळले. गाडीवान जखमी मुलीला उचलून घेऊन 'सकू...सकू...' म्हणत गाडीभोवती व्याकूळ होऊन फिरत राहिला; पण त्याच्या बायकोचा ठावठिकाणा लागत नव्हता.

मोटरसायकलवरून आलेल्या एका तरुण मुलाने प्रसंगावधान साधून बाइकला किक मारली आणि शाळकरी मुलांचे पाढे ऐकू येत होते त्या दिशेला बाइक पळवली. शाळेच्या पायरीशी बाइक लावून थेट वर्गात गुरुजींच्या समोर हात जोडून उभा राहिला व म्हणाला, ''सर... रस्त्यावर उसाची गाडी पलटी झाली अन् खड्ड्यात पडली आहे आणि एक बाई खाली दबून गेली आहे. त्या बाईचा जीव वाचवायला हवा. मुलांनी तिच्या अंगावरील उसाचे बांधे उचलले तरी ती बाई वाचेल. लवकर चला! प्लीज...''

शिक्षकांनी लगेच सूचना केली, ''मुलांनो, आपल्या शाळेच्या बाहेर अपघात झाला आहे. तिकडे लवकर चला. शाळेच्या बाहेर पडा.'' तुफान आल्याप्रमाणे वर्गातले सारे विद्यार्थी भराभरा वर्गाबाहेर आले. सर्व विद्यार्थ्यांना घेऊन शिक्षक घटनास्थळाकडे गेले.

पलटी झालेल्या गाडीजवळ येताच दोन्हीकडील वाहने अडवण्यासाठी चार-चार मुलांनी रस्त्यावर आडवी साखळी केली आणि बाकीच्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाने दोरखंड बांधून गाडी सरळ केली. काही मुले भराभरा ऊस उपसू लागली. उसाच्या ढिगाऱ्याखाली गाडीवानाची बायको निपचीत पडली होती. सर्वांच्या काळजात धस्स झाले, कारण तिचा श्वासही गुदमरला होता.

ते दोन तरुण, शिक्षक आणि गाडीवान यांनी मोठ्या कष्टाने तिला खड्ड्यातून बाहेर काढले

आणि रस्त्याच्या कडेला एका झाडाखाली आणले. गाडीवानाची मुलगी शॉक बसल्यासारखी भेदरलेल्या नजरेने आईकडे पाहतच राहिली. विद्यार्थिनींपैकी काहींनी त्या बाईच्या हातापायांचे तळवे घासले, तर एका मुलीने तोंडाद्वारे कृत्रिम श्वासोच्छ्वास सुरू करण्याचा प्रयत्न चालवला. बऱ्याच प्रयत्नांनंतर ती थोडी हालचाल करताना दिसली, तशी 'ए... आयोऽऽ!' म्हणून तिच्या मुलीने तिला मिठी मारली. सगळ्यांना हायसे वाटले. मुलांचेही डोळे पाणावले. त्या सर्वांना त्या बाईमध्ये आपापली आई दिसली असावी.



इतक्यात शाळेतून आणखी काही मुलांना घेऊन मुख्याध्यापक स्वतः त्या ठिकाणी आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एका विद्यार्थ्याने कापसाच्या बोळ्यांनी आयोडीन लावून त्या बाईच्या जखमा स्वच्छ केल्या. जखमी मुलीच्या कपाळावर आलेले रक्त पुसून जखमेवर पट्टी बांधली. गाडीवानाची बायको वेदनांनी विव्हळत होती. कदाचित त्या बाईच्या हाताचे हाड फ्रॅक्चर झाले असावे.

इतक्यात एक सुमोगाडी रस्त्याने आली. विद्यार्थ्यांनी ती थांबवली. तिच्यातले प्रवासी खाली उतरले आणि प्रसंगाचे गांभीर्य जाणून त्यांनी आपली गाडी अँब्युलन्सप्रमाणे वापरायला दिली. त्या तरुणाच्या मोटरसायकलवर एक विद्यार्थी मागे बसला आणि त्या सुमोगाडीच्या पुढे लाल रंगाचा रुमाल झेंड्यासारखा हालवत पुढे निघाला. समोरून येणारी वाहने बाजूला होत होती. जखमी मायलेकी, गाडीवान, एक तरुण, शिक्षक आणि चार विद्यार्थी घेऊन ती गाडी ग्रामीण रुग्णालयाकडे निघाली.

इकडे अपघात झाल्याची बातमी कळताच पुढे गेलेल्या बैलगाड्यांवरचे काही गाडीवान मागे आले. त्यांनी ती पलटी झालेली गाडी बैलांसह हळूहळू मार्गी लावली. काही गाडीवान रुग्णालयात पोहोचले.

त्या दोन तरुणांनी कारखान्याच्या अधिकाऱ्यांना फोन करून कळवल्याने तेही रुग्णालयात पोहोचले. कर्ज, उसनवारीने अगोदरच खचलेल्या गाडीवानाला काळजी वाटत होती. कारखान्याचे अधिकारी त्याच्या जखमी कुटुंबाला धीर देऊन म्हणाले, ''घाबरू नका.... तुमच्या मदतीला किती लोक आलेत पाहा.'' गाडीवान गोंधळला होता. त्याच्या पाठीवर हात ठेवत शिक्षक म्हणाले, ''तुमची बायको जिवंत आहे हीच लाख मोलाची गोष्ट. काळजी करू नका, त्या लवकर बऱ्या होतील.'' कारखान्याचे अधिकारी म्हणाले, ''दवाखान्याच्या खर्चाचे आम्ही पाहू. तुझ्या कामाचेही पाहू. तुला आणखी काही हवे असल्यास सांग.'' धक्का बसलेल्या त्या गाडीवानाला हुंदके आवरता आवरेनात. अधिकाऱ्याच्या आश्वासनाने भारावून जाऊन त्याने अधिकाऱ्याचे, गुरुजींचे पाय धरून अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

ज्या दोन तरुणांनी मदत केली, ते पत्रकार होते. त्यांनी अपघाताची सविस्तर बातमी फोटोसह वृत्तपत्रातून प्रसिद्ध केली. विद्यार्थ्यांनी केलेल्या आपत्ती व्यवस्थापनाबद्दल सगळ्यांनी त्यांचे कौतुक केले. अनेक मान्यवरांनी शाळेला अभिनंदनाची पत्रे पाठवली.

**– मनोहर भोसले**

**शब्दार्थ :** **मुंडासे** – डोक्याला बांधायचे पागोटे. **व्याकूळ होणे** – कासावीस होणे. **उसाचे बांधे** – उसाच्या मोळ्या. **पलटी होणे** – उलटणे. **दोरखंड** – जाड दोर. **निपचीत पडणे** – हालचाल न होता पडून राहणे. **काळजात धस्स होणे** – खूप घाबरणे. **भेदरणे** – भीतीने घाबरणे. **हायसे वाटणे** – समाधान वाटणे, संकटातून सुटल्यासारखे वाटणे.

## स्वाध्याय

**प्र. १. का ते सांगा.**

(अ) पहिल्यांदा बैलांचा गळफास सोडवून मग ते तरुण गाडीवानाकडे वळले.

(आ) गाडीवान व्याकूळ होऊन गाडीभोवती फिरत होता.

(इ) मोटरसायकलवरून आलेला एक तरुण शाळेत जाऊन गुरुजींना भेटला.

(ई) गाडीवानाची मुलगी आईकडे भेदरलेल्या नजरेने पाहत होती.

**प्र. २. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) गाडीवानाची बायको उसाच्या ढिगाऱ्याखाली दबली गेली, हे त्या दोन तरुणांनी कसे ओळखले असेल?

(आ) शिक्षक विद्यार्थ्यांना घेऊन लगेच घटनास्थळाकडे का निघाले?

(इ) गाडीवानाला हुंदके का आवरत नव्हते?

**प्र. ३. या पाठातील खालीलपैकी कोणाची भूमिका तुम्हांला सर्वांत जास्त महत्त्वाची वाटली? का ते सांगा.**

(अ) पत्रकार (आ) शिक्षक आणि त्यांचे विद्यार्थी (इ) मुख्याध्यापक (ई) कारखान्याचे अधिकारी.

**प्र. ४. वाक्यात उपयोग करा.**

प्रसंगावधान राखणे, काळजात धस्स होणे, भेदरलेल्या नजरेने पाहणे, हायसे वाटणे, डोळे पाणावणे, प्रसंगाचे गांभीर्य जाणणे, मार्गी लावणे, निपचीत पडणे.

**प्र. ५. पाठातील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

**प्र. ६. या पाठातील घटनेसारखी एखादी घटना तुम्ही पाहिली असेल किंवा ऐकली असेल, तर त्या घटनेचे वर्णन करा.**

**प्र. ७. खालील शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा.**

बाइक, प्लीज, शॉक बसणे, फ्रॅक्चर, अँब्युलन्स.

**उपक्रम :** तुमच्या गावाजवळच्या साखर कारखान्यास शिक्षकांसोबत भेट द्या. तेथील परिसर फिरून खालील गोष्टींचे निरीक्षण करा. माहिती मिळवा.

(अ) शेतातील ऊसतोडणी.

(आ) उसाच्या मोळ्या किंवा बांधे बांधणे.

(इ) उसाच्या मोळ्या गाडीत भरणे.

(ई) कारखान्यापर्यंत उसाची वाहतूक करणे.

(उ) उसाचे गाळप करणे व कारखान्यातील इतर कामे.

(ऊ) कारखान्याच्या परिसरातील ऊसतोड व वाहतूक करणाऱ्या मजुरांची वस्ती.

- **खालील संवाद वाचा. अधोरेखित केलेल्या शब्दांकडे विशेष लक्ष द्या.**

बंडू : सुट्टीत मी मामाकडे गेलो होतो.
लता : आम्ही नाही गेलो कुठेही!
बंडू : मग तू सुट्टीत काय केलंस?
लता : माझ्याकडे खूप पुस्तकं आहेत.
मिनू : तिला वाचायला आवडतं.
लता : तुला नाही का आवडत?
मिनू : मला पण आवडतं ना!
बंडू : गुरुजींनी आपल्याला वाचनाचं महत्त्व सांगितलंय.
लता : ते पटलंय आम्हांला.
मिनू : आपण सारे वाचूया.
लता : चांगले वाचक बनूया.

(१) कोणते सर्वनाम कोणत्या नामासाठी आले आहे ते ओळखा. लिहा.
जसे : मी – बंडू स्वतःसाठी वापरतो.
(२) या पाठातील सर्वनामे शोधा व लिहा.

**शोध घेऊया.**

- खालील सूचना फलक वाचा. खालील सूचना कोठे-कोठे असतात ते सांगा. तुमच्या शाळेच्या परिसरात कोणकोणत्या सूचनांचे फलक लावता येतील, ते मित्रांशी चर्चा करून ठरवा. तसे सूचना फलक तयार करा.

हा खासगी रस्ता आहे.
येथे कचरा टाकू नये.
येथे जाहिराती लावू नयेत.
येथे थुंकू नये.
येथे वाहने लावू नयेत.
हे पिण्याचे पाणी आहे.
झाडांची पाने, फुले तोडू नयेत.

# १२. माळीण गाव : एक घटना



पुणे जिल्ह्यातील डोंगरामध्ये वसलेले माळीण गाव. ३० जुलै २०१४ या दिवशी प्रचंड पावसामुळे दरड कोसळून हे गाव गाडले गेले. त्यात मनुष्यहानी झाली. या बातमीने महाराष्ट्रच नव्हे, तर सगळा देश हळहळला. या घटनेसंदर्भातील वर्तमानपत्रांतील बातम्यांच्या शीर्षकांची ही कात्रणे.




**वरील बातम्यांच्या शीर्षकांची कात्रणे वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. वरील बातम्यांची शीर्षके कोणत्या घटनेसंबंधी आहेत?
२. माळीण गावात साधारण किती कुटुंबे राहत होती?
३. कोणत्या संस्थेने या दुर्घटनेचा इशारा दिला होता?
४. मदतीची घोषणा कोणी केली? कशा स्वरूपात?
५. ढिगाऱ्याखालून किती लोकांना जिवंत काढण्यात आले?
६. ढिगाऱ्याखालचे मृतदेह काढण्यासाठी कोणी प्रयत्नांची पराकाष्ठा केली?
७. माळीण गावाबाबतची दुर्घटना कोणत्या ऋतूत आणि कोणत्या दिवशी घडली?
८. शोधकार्यात कोणकोणत्या गोष्टींमुळे अडथळे आले?
९. माळीण गावातील लोकांना कोणी कोणी मदत केली?

**शिक्षकांसाठी :** बातम्यांची शीर्षके विद्यार्थ्यांकडून बारकाईने वाचून घ्यावी. त्याबाबतची अधिक माहिती वर्गात सांगावी. त्यावर वर्गात चर्चा आयोजित करावी.

**विचार करा. शोध घ्या.**

१. या घटनेमागे कोणकोणती कारणे असतील, असे तुम्हांला वाटते?
२. नासा ही संस्था कोठे आहे, ती काय काम करते, याची शिक्षकांच्या मदतीने माहिती मिळवा.
३. अशा प्रकारची दुर्घटना घडल्यावर त्या ठिकाणी कोणकोणत्या अडचणी निर्माण होत असतील? विचार करा व लिहा.
४. दुर्घटनाग्रस्तांना कोणकोणत्या स्वरूपात मदत करता येईल ते लिहा.

**उपक्रम :** १. तुमच्या परिसरातील, गावातील घडून गेलेल्या आपत्कालीन घटनांविषयी माहिती मिळवा.
२. शिक्षकांच्या मदतीने ऐतिहासिक काळातील एखाद्या घटनेची माहिती मिळवा.
**उदा.**, मोहेंजोदडो, हडप्पा संस्कृती, किल्लारीचा भूकंप.
३. आपत्कालीन प्रसंगी तुमच्या गावातून मदत गोळा केली जात असेल, तर त्याविषयी माहिती मिळवा.
४. नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्ती यांविषयी शिक्षकांच्या मदतीने माहिती मिळवा.
५. झाडे, प्राणी, व्यक्ती यांच्या नावांवरून गावांची नावे पडतात. मित्रमैत्रिणींशी चर्चा करून अशा नावांची यादी करा.
६. नैसर्गिक आपत्तींसंबंधित बातम्यांची कात्रणे वर्तमानपत्रांतून काढून वहीत चिकटवा.

## आपण समजून घेऊया.

### विशेषण

- **खालील शब्दसमूह वाचा.**

हसरे बाळ, जंगली हत्ती, सुंदर फुले, गोड पेरू, उंच डोंगर, लांब नदी, लालभडक जास्वंद, तेजस्वी सूर्य, ताजे फूल.

वरील शब्दसमूहांतील बाळ, हत्ती, फुले, पेरू, डोंगर, नदी, जास्वंद, सूर्य, फूल ही नामे आहेत; तर हसरे, जंगली, सुंदर, गोड, उंच, लांब, लालभडक, तेजस्वी, ताजे हे शब्द त्या नामांबद्दल विशेष माहिती सांगणारे शब्द आहेत. अशा शब्दांना विशेषण म्हणतात.

- खालील चित्राचे निरीक्षण करा. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पुढील चौकटींत लिहा.



१. कलिंगडाचा आकार कसा? [ ]
२. कलिंगडाचा रंग कोणता? [ ]
३. कलिंगडाची चव कशी? [ ]

तुम्ही उत्तरांमध्ये लिहिलेले शब्द कलिंगडाची विशेषणे आहेत.

**शिक्षकांसाठी :** विशेषण ओळखण्यासंदर्भात कलिंगडाचे उदाहरण दिलेले आहे. अशाच प्रकारे विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून विशेषणाचा सराव करून घ्यावा.

ACZHK9

# १३. सण एक दिन!



• ऐका. म्हणा. वाचा.

शिंगे रंगविली, बाशिंगे बांधली,
चढविल्या झूली ऐनेदार.

राजा, परधान्या, रतन, दिवाण,
वजीर, पठाण, तुस्त मस्त.

वाजंत्री वाजती, लेजीम खेळती,
मिरवीत नेती, बैलांलागी.

दुलदुलतात कुणाची वशिंडे,
काही बांड खोंडे अवखळ.

कुणाच्या शिंगांना बांधियले गोंडे,
हिरवे, तांबडे शोभिवंत.

वाजती गळ्यांत घुंगरांच्या माळा,
सण बैलपोळा ऐसा चाले.

झुलींच्या खालती काय नसतील
आसूडांचे वळ उठलेले?

आणि फुटतील उद्याही कडाड्
ऐसेच आसूड पाठीवर!



जरी मिरविती परि धन्याहाती
वेसणी असती घट्ट पाहा.

जरी झटकली जराशीही मान,
तरी हे वेसण खेचतील.

सण एक दिन! बाकी वर्षभर
ओझे मरमर ओढायाचे!

**– यशवंत**

**शब्दार्थ :** **बाशिंग** – बैलाच्या कपाळावर बांधण्याचे कागदाचे किंवा बेगडाचे आभूषण, काही ठिकाणी लग्नात नवरा-नवरीच्या कपाळाला बांधतात. **ऐनेदार** – लहान लहान आरसे लावून केलेली शोभिवंत सजावट. **दुलदुलणे** – हालणे. **वशिंड** – बैलांच्या पाठीवरील उंच भाग. **खोंड** – तरुण बैल, गोऱ्हा. **अवखळ** – चपळ. **आसूड** – चाबूक. **धनी** – मालक. **वेसण** – बैलाच्या नाकातून घातलेली दोरी.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) बैलांच्या कपाळावर काय बांधले आहे?

(आ) अवखळ कोण आहे?

(इ) बैलांच्या गळ्यात काय आहे?

(ई) झुलीखाली काय असेल असे कवीला वाटते?

(उ) वर्षभर बैल काय करतात?

**प्र. २. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) या सणाला बैलांना कसे सजवतात?

(आ) बैलपोळ्याच्या दिवशी बैलांना कसे मिरवत नेतात?

(इ) बैलाला वेसण का घातलेली असते?

(ई) 'सण एक दिन' असे कवी का म्हणतो?

**प्र. ३. खालील सणांच्या सजावटीला कोणकोणत्या वस्तू वापरतात?**

(अ) गणेशोत्सव (आ) दिवाळी (इ) ख्रिसमस

**प्र. ४. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) रंगवलेली | (१) गोंडे |
| (आ) शोभिवंत | (२) खोंडे |
| (इ) दुलदुलणारी | (३) शिंगे |
| (ई) अवखळ | (४) वशिंडे |

**प्र. ५. बैलपोळ्याच्या सणाचा दिवस संपल्यावर बैलाला काय वाटत असेल, याविषयी कल्पना करून थोडक्यात लिहा.**

**उपक्रम :** १. तुमच्या आजोबांशी, वडिलांशी बैलपोळ्याविषयी गप्पा मारा. त्यांच्या लहानपणी हा सण ते कसा साजरा करायचे त्याची माहिती घ्या.

२. तुमच्या गावात, परिसरात बैलांना, पाळलेल्या कुत्र्यांना व मांजरांना प्रेमाने नावे देतात. अशा नावांची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

३. बैलांचे वेगवेगळे प्रकार असतात. उदा., लाल कंधारी बैल, खिल्लारी बैल. या प्रकारांविषयी माहिती मिळवा.

४. सण, प्राणी, पक्षी यांच्यावर आधारित कविता मिळवा. मिळवलेल्या कविता एकत्र करा. त्या कवितांचा काव्यगुच्छ तयार करा आणि त्याचे वर्गात वाचन करा.

**हे करून पाहा.**

मातीचे बैल बनवून त्यांना रंग द्या व सजवा.

**माहिती मिळवूया.**

आपला देश शेतीप्रधान आहे. आपली संस्कृती कृषी संस्कृती आहे. आपले सण-समारंभही कृषीशी निगडित आहेत. शेतकरी ऊन-पाऊस, वारा यांची पर्वा न करता शेतात काबाडकष्ट करतो, तेव्हा कुठे शेतात पीक येते. त्याला शेतात अनेक प्रकारची कामे असतात. उदा., नांगरणी, पेरणी, कोळपणी वगैरे.

अलीकडच्या काळात विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे शेतीतील कामात नवनवीन यंत्रांचा वापर सुरू झाला आहे. बैलांची कामे यंत्रे करू लागली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाने शेतीतील कामे झटपट होऊ लागली आहेत. त्यामुळे बैल करत असलेली शेतीतील कामेही कमी झाली आहेत. गावा-गावांतील बैलांची संख्या रोडावली आहे. गोबरगॅस, जैविक खतांचा वापर यांचे प्रमाणही कमी झाले आहे.

गावोगावी उत्साहात बैलपोळ्याचा सण साजरा होत होता; पण आता त्याचे प्रमाण कमी होत चालले आहे. पूर्वी प्रत्येक शेतकऱ्याकडे गोठा असायचा. त्यात अनेक जनावरे असायची; पण आता कितीतरी शेतकरी केवळ मातीचे बैल आणून बैलपोळा साजरा करतात. हा सण वेगवेगळ्या भागांत वेगवेगळ्या महिन्यांत साजरा केला जातो. बैलपोळा सणास काही भागात 'बेंदूर' असे म्हणतात.

- **पऱ्या काय बोलल्या?**

दूर थंड प्रदेशातील पर्वताच्या पायथ्याशी एका गुहेत सात पऱ्या राहायच्या. डिसेंबरच्या महिन्यात तिथे बर्फ पडायचा. बर्फात भटकून, खेळून झालं, की रात्री पऱ्या त्यांच्या गुहेतल्या दुलईत शिरून गुडूप झोपी जायच्या. अशाच एका रात्री त्या झोपल्या अन् सकाळी उठून बाहेर आल्या. गुहेतल्या पऱ्या बोलण्यात एकाहून एक पटाईत होत्या.

**पहिली परी** : सकाळ झाली. मी दुलईतून बाहेर पडले.
**दुसरी परी** : सकाळ झाली. मी उबदार दुलईतून बाहेर पडले.
**तिसरी परी** : सकाळ झाली. मी मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.
**चौथी परी** : सकाळ झाली. मी स्वच्छ, मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.
**पाचवी परी** : सकाळ झाली. मी...., स्वच्छ, मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.
**सहावी परी** : सकाळ झाली. मी ...., ...., स्वच्छ, मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.
**सातवी परी** : सकाळ झाली. मी ...., ...., ...., स्वच्छ, मऊमऊ, उबदार दुलईतून बाहेर पडले.

पाचवी, सहावी आणि सातवी परी नेमकं काय म्हणाली असेल? त्यांना त्यांच्या दुलईबद्दल काय विशेष माहिती सांगायची असेल? कंसातील शब्दांमधून योग्य शब्द वापरून त्यांची वाक्ये पूर्ण करा.


(गुबगुबीत, खरखरीत, मखमली, हलक्या फुलक्या, रंगीबेरंगी, सुगंधी, जुनाट, झिरमिरीत)

- **खालील मुलांना काय काय आवडतं ते दिलंय. त्या वस्तू/पदार्थांविषयी विशेष माहिती देण्यासाठी कोणकोणते शब्द वापरता येतील, याची चर्चा करून तक्ता पूर्ण करा.**

| नाव | आवडणारी गोष्ट/पदार्थ | विशेष माहिती देणारे शब्द |
|---|---|---|
| अमिता | पेरू | गोड, हिरवा, पिकलेला, ........ |
| रजनी | पाऊस | बुरबुर, ..... |
| जिया | आइस्क्रीम | थंडगार, ...... |
| राजसी | शेंगदाणे | .................. |
| दिनेश | नदीकाठ | .................. |

# १४. राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज





सुमारे नव्वद वर्षांपूर्वीची ही गोष्ट. जयपूरकडचा एक राजा चंद्रपूरजवळच्या ताडोबा अरण्यात शिकारीसाठी आला होता. तेथील एका गुहेच्या तोंडाशी एक मुलगा ध्यान लावून बसला होता. राजा त्या मुलाला जंगलातील प्राण्यांविषयी विचारू लागला. तो चुणचुणीत मुलगा राजाला म्हणाला, ''हे सुखी जीव आनंदानं जंगलात नांदत आहेत. तुम्ही त्यांना का हो ठार करता?''

त्यावर राजा निरुत्तर झाला. तो विचार करू लागला. त्याला स्वतःची चूक कळून आली. त्याने शपथ घेतली– 'यापुढे मी कोणत्याही प्राण्याची शिकार करणार नाही.'

आपण शिकार करतो याचा अभिमान बाळगणाऱ्या राजाला ज्या उमद्या मुलाने अहिंसेची शपथ घ्यायला लावली त्या मुलाचे नाव होते, 'माणिक.' पुढे तो 'राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज' या नावाने प्रसिद्धीस आला.

माणिकच्या वडिलांचे नाव बंडोजी इंगळे ठाकूर व त्याच्या आईचे नाव मंजुळा. तो लहान असताना त्याच्या आईने त्याला आपल्या अजोळी वरखेडला नेले. तिने त्याला आडकोजीमहाराजांच्या सान्निध्यात ठेवले. महाराजांनी त्याला 'तुकड्या' हे नवे नाव दिले. तुकडोजीने त्यांना गुरू मानले.

तुकडोजी चौदा वर्षांचे असतानाच त्यांनी घर सोडले व ते रामटेकच्या जंगलात भटकू लागले. तेथे कंदमुळांवर गुजराण करत त्यांनी हठयोगाचा अभ्यास केला. त्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासींचे पाडे व भटक्यांची पाले धुंडाळत ते फिरले व तेथील गरीब माणसांमध्ये रमले. खेळ, शर्यतींमध्ये पोहणे, धावणे, घोड्यावर-बैलगाड्यावर नियंत्रण साधणे, गाणे रचणे, वाद्य वाजवणे, मोठ्या ढोलांच्या तालावर नाचणे अशी विविध कौशल्ये त्यांनी आत्मसात केली. हिंदी, उर्दू व मराठीतील स्वतःचीच कवने ते खंजिरीच्या तालावर बेभान होऊन गात असत. ऐकणारे तल्लीन होऊन तासन्तास डोलत असत. त्यांच्या या आगळ्या गुणसंपदेमुळे लोक त्यांना 'देवबाबा' म्हणू लागले.

आपला देश पारतंत्र्यात होता. त्या वेळच्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत १९३० सालचा जंगल सत्याग्रह प्रसिद्ध आहे. त्या वेळी या देवबाबांनी सत्याग्रही तरुणांच्या शिबिरांमध्ये जाऊन खंजिरी भजनांद्वारे त्यांच्या मनात स्वराज्य मिळवण्याची प्रेरणा जागवली. झाडीमंडळातील 'तेजस्वी तरुण संघटना' व विदर्भातील 'आरती मंडळे' या सेवाभावी संघटनांद्वारे स्वदेशी व ग्रामोद्योग यांचा प्रचार केला. गांधीजींनी 'छोडो भारत'ची घोषणा केली. गांधीजींच्या या चळवळीत तुकडोजी अनुयायांसह सहभागी झाले. त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला.

सन १९४७ च्या स्वराज्यप्राप्तीनंतर भारतीय प्रजासत्ताकात विविध संस्थाने विलीन करण्याचे कार्य सर्वांत महत्त्वाचे होते. 'स्वतंत्र भारत' उभारण्याच्या या कार्यात तुकडोजींच्या श्री गुरुदेव सेवामंडळाने हैदराबाद स्टेट व कोल्हापूर संस्थान विलीन करण्यात सहभाग घेतला.

श्री गुरुदेव सेवामंडळ वेगवेगळ्या गावी सप्ताह,

चातुर्मास कार्यक्रम आयोजित करत असे. त्याद्वारे त्यांनी स्वच्छता, व्यसनमुक्ती, आरोग्य संरक्षण, ग्रामोद्योग संवर्धन, संत संमेलन असे उपक्रम राबवले. महाराजांनी सामुदायिक सहभोजनात सर्वांना सहभागी करून धर्म, जात, पंथ यातील विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला.

पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून सानेगुरुजींनी उपोषण केले. राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी अनेक लोकांच्या सह्या मिळवून त्या उपोषणाला समर्थन मिळवून दिले.

आचार्य विनोबा भावे यांनी भूदान चळवळ सुरू केली. महाराजांनी त्या चळवळीत भाग घेतला आणि भूदानासाठी जमीन मिळवून दिली. त्यांचे हे महान कार्य पाहून भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी संत तुकडोजीमहाराजांना राष्ट्रपती भवनात आमंत्रित केले आणि 'राष्ट्रसंत' या पदवीने त्यांचा गौरव केला.

पुढे जपानमध्ये 'विश्वशांती परिषद' व 'जागतिक धर्मपरिषद' आयोजित करण्यात आली होती. त्यांच्या उद्घाटनाकरिता राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांना निमंत्रित करण्यात आले. या परिषदांमध्ये भगवान बुद्धांच्या पंचशील तत्त्वांची माहिती देऊन राष्ट्रसंतांनी परिषदेच्या अधिवेशनाचे उद्घाटन केले. तेथे अठरा देशांची जागतिक धर्मसंघटना गठित करण्यात आली. तिचे सल्लागार म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. अशा साऱ्या उपक्रमांमध्ये गुंतले असतानाच त्यांनी हिंदी व मराठीत अनेक गद्य-पद्य पुस्तके लिहून प्रकाशित केली. 'ग्रामगीता' हा त्या साऱ्या पुस्तकांचा मुकुटमणी होय.

तुकडोजीमहाराजांचे कार्य पुढे अनेक सेवामंडळांनी चालू ठेवले आहे.

**– सुदाम सावरकर**

**शब्दार्थ :** **निरुत्तर होणे** – उत्तर न सुचणे. **अहिंसा** – कोणालाही इजा न करणे. **हठयोग** – योगाचा एक प्रकार. **पाले** – फिरस्ती लोकांची तंबूप्रमाणे उभारलेली कापडाची घरे. **धुंडाळणे** – शोधणे. **कवन** – पद्य रचनेचा प्रकार. **खंजिरी** – एक प्रकारचे वाद्य. **समर्थन** – पाठबळ, पाठिंबा.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शिकारीला गेलेल्या राजाने कोणती शपथ घेतली?

(आ) तुकडोजीमहाराज कोणकोणत्या भाषांतील कवने बेभान होऊन गात असत?

(इ) तुकडोजीमहाराज यांनी कोणता ग्रंथ लिहिला?

**प्र. २. का ते लिहा.**

(अ) राजाने शिकार करण्याचे सोडले.

(आ) चंद्रपूर जिल्ह्यातील लोक तुकडोजीमहाराजांना 'देवबाबा' म्हणत.

(इ) राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजीमहाराजांचा 'राष्ट्रसंत' पदवीने गौरव केला.

**प्र. ३. तुमच्या शब्दांत उत्तरे सांगा.**


(अ) श्री गुरुदेव सेवामंडळाने कोणकोणते उपक्रम राबवले?

(आ) सानेगुरुजींच्या उपोषणाला समर्थन देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी काय केले?

(इ) राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांनी जपान देशात जाऊन कोणते कार्य केले?

**उपक्रम :** 'ग्रामगीता' हा ग्रंथ मिळवून वाचा. त्यातील तुम्हांला आवडलेल्या ओव्या परिपाठात वाचून दाखवा. त्या ओव्या शाळेच्या 'सामान्यज्ञान' फलकावर लिहा.

# १५. आपल्या समस्या – आपले उपाय



- चित्र पाहा. संवाद वाचा.



**केशव** : बापरे! किती ही गर्दी आणि किती ह्या गाड्या!

**बाबा** : तू आज पाहतोस होय ही गर्दी! रोजच अशी गर्दी असते इथे.

**केशव** : एवढी सगळी माणसं कुठं चालली असतील बरं ! ह्या सगळ्या गाड्यांना किती पेट्रोल, डिझेल लागत असेल ?

**बाबा** : आणि वाहनातून निघणाऱ्या धुराचं काय ?

**केशव** : गर्दी, धूर, वाहनांचे आवाज, कर्कश हॉर्न... कधी एकदाचं इथून लांब जातोय, असं झालं आहे मला.

- तुमच्या शब्दांत उत्तरे सांगा.

(अ) तुम्ही कधी गर्दी असणाऱ्या रस्त्यावर गेला आहात का ?

(आ) रस्त्यावर कोणत्या वेळेला जास्त गर्दी असते ?

(इ) नेमक्या त्या वेळेलाच जास्त गर्दी का होते असे तुम्हांला वाटते ?

(ई) वाहतूक कोंडीमुळे कोणत्या समस्या निर्माण होतात ?

(उ) वाहतूक कोंडी होऊ नये, म्हणून काय काय केले पाहिजे असे तुम्हांला वाटते ?

(ऊ) वाहतूक कोंडीमुळे कोणकोणत्या प्रकारचे प्रदूषण वाढते ?

(ए) हे प्रदूषण कमी व्हावे, म्हणून काय काय करता येईल? आईवडिलांशी, मित्रांशी, शिक्षकांशी चर्चा करा व सांगा.

- चौकाचौकांत वाहतूक नियंत्रण करण्यासाठी वाहतूक पोलीस उभे असतात. प्रदूषणाचा त्यांना किती त्रास होत असेल, याचा विचार करा. चौकाचौकांतील ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण कमी करण्यासाठी उपाय सुचवा.

- खालील वाक्ये वाचा. तुम्हांला योग्य वाटत असेल, तर ✓ अशी खूण करा आणि अयोग्य वाटत असेल, तर ✕ अशी खूण करा.

१. एखाद्या गाडीचा छोटासा अपघात झालेला आहे. तो पाहण्यासाठी तेथे गर्दी करणे. ☐

२. ओळखीची व्यक्ती रस्त्यात भेटल्यास, भर रस्त्यात वाहन उभे करून गप्पा मारणे. ☐

३. दुकानात वस्तू आणायला गेल्यावर, आपले वाहन पार्किंगच्या ठिकाणी लावणे. ☐

४. गर्दीमधून जाताना जोरजोराने हॉर्न वाजवणे. ☐

**प्रदूषण ही एक मोठी समस्या आहे.**

- **चित्र पाहा. संवाद वाचा.**



आई : केवढा हा कचरा!

मिनू : एवढा कचरा येतो कुठून?

आई : कुठून म्हणजे? आपणच करतो कचरा.

मिनू : पण या कचऱ्याला एवढी दुर्गंधी कशी?

आई : ओला कचरा सडल्यानं ही दुर्गंधी येते.

मिनू : बापरे! मला श्वास घेणं अवघड झालं आहे. आई, या कचऱ्याचं काय करत असतील?

- **तुमच्या मनाने उत्तरे सांगा.**

(अ) आपण कचरा कशाला म्हणतो?

(आ) घरातील कचऱ्यात कोणकोणत्या वस्तू असतात?

(इ) तुमच्या घरातील ओला व सुका कचरा कोणता ते सांगा.

(ई) तुमच्या घरातील कचऱ्याची विल्हेवाट तुम्ही कशी लावता ते सांगा.

(उ) कचऱ्यातील कोणकोणत्या गोष्टींवर प्रक्रिया करून त्यातून नवीन गोष्टी तयार होऊ शकतात?

(ऊ) तुमच्या वर्गातील कचऱ्यामध्ये कोणकोणत्या वस्तू असतात?

(ए) वर्गात कचरा होऊ नये, म्हणून तुम्ही कोणती काळजी घ्याल?

(ऐ) कचराकुंडीतला कचरा उचलून नेलाच नाही, तर आपल्याला कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागेल याचा विचार करा. आईवडिलांशी, मित्रांशी चर्चा करून सांगा.

**कचऱ्याची विल्हेवाट लावणे, ही एक समस्या आहे.**

- **चित्र पाहा. संवाद वाचा.**



राहुल : आजी, त्या रस्त्यानं नको जायला.

आजी : का रे बाबा?

राहुल : बघ, तिथे किती कुत्री आहेत!

आजी : हो रे बाबा. कधी कधी सगळी एकदम अंगावर धावून येतात.

राहुल : अगं आजी, या कुत्र्यांमुळे रस्त्यावरून एकट्यानं जायला मला खूप भीती वाटते.

आजी : अरे, कुत्री जोरजोरानं भुंकू लागली, तर आमच्यासारख्यांच्या हृदयाची धडधड वाढते.

- वरील विषयावर चर्चा करा. याविषयी तुम्हांला पडणारे प्रश्न लिहा.

# १६. स्वच्छतेचा प्रकाश



एकदा मी एका शाळेत गेलो होतो. मुले प्रार्थना म्हणत होती. प्रार्थना संपल्यावर त्यांनी प्रतिज्ञा म्हटली. त्यांना मी विचारले, ''प्रतिज्ञेत पहिलं वाक्य काय आहे, 'भारत माझा देश आहे.' होय ना?'' मुले 'हो' म्हणाली. ''भारत 'आपला' देश आहे, असं न म्हणता 'माझा' का बरं म्हटलं असेल?'' मुले विचारात पडली.

मग मी सांगितले, ''वस्तू 'माझी' असं वाटतं, तेव्हा आपण तिची जितकी काळजी घेतो, तितकी 'आपली' म्हटल्यावर घेतोच असं नाही, म्हणून 'माझा' असा शब्द इथे वापरला, असं वाटतं का?''

मुले म्हणाली, ''बरोबर आहे. माझं घर-अंगण म्हटलं, की ते मी स्वच्छ ठेवतो. रस्ता मात्र आपला, म्हणून त्याच्यावर आपण घरातील घाण टाकतो.''

मी सांगितले, ''माणसाचं मन जसजसं मोठं होतं तसतसं 'माझी' ही कल्पनाही विस्तारत जाते. 'हे विश्वचि माझे घर' असं म्हणण्याइतकं संतांचं मन मोठं होतं आणि त्यामुळे सगळीकडे जीवन स्वच्छ, निर्मळ व्हावं म्हणून त्यांनी प्रयत्न केले. महात्मा गांधी, विनोबा भावे, सेनापती बापट, सानेगुरुजी व संत गाडगेमहाराज हातात झाडू घेत व इतरांनाही घ्यायला शिकवत.''

मी मुलांना प्रश्न केला, ''तुम्ही कोणी कधी रेल्वेनं प्रवास केला आहे का?'' बऱ्याच मुलांनी हात वर केले. तेव्हा मी विचारले, ''खिडकीजवळ काय लिहिलेलं असतं?'' एक मुलगा म्हणाला, ''येथे थुंकू नका, असं लिहिलेलं असतं.''

मी सांगितले, ''एकदा एक मनुष्य डब्यातच




थुंकला, तेव्हा मी त्याचं लक्ष त्या 'थुंकू नका' कडे वेधलं. त्याला राग आला. तो म्हणाला, ''गाडी काय तुमच्या बापाची आहे?'' मी म्हणालो, ''माझ्या बापाची नाही, तुमच्या बापाची नाही, म्हणून काय घाण करायची?''

देश 'माझा' म्हणण्यामागे अशी भूमिका आहे. हा देश जर आपला, तर हे डोंगर उघडेबोडके का? आपण वंदे मातरम् म्हणताना 'सस्यश्यामला' असे म्हणून मातेला वंदन करतो, तर ती सस्यश्यामला व्हावी, म्हणून आपण खटपट करायला नको का? 'भारत माझा देश आहे' असं नुसतं पोपटासारखं तोंडानं म्हणण्याऐवजी तुमच्या सर्व इंद्रियांतून ही भावना व्यक्त व्हायला हवी.''

मुलांनी उत्साहाने माना डोलवल्या.

**– यदुनाथ थत्ते**

## थोर समाजसेवक



सेनापती बापट हे थोर समाजसेवक होते. त्यांनी देशसेवेची प्रतिज्ञा घेतली होती. त्यांचा दिनक्रम ठरलेला असे. पहाटे लवकर उठायचे. दैनंदिन कामे उरकली, की हातात झाडू घ्यायचा आणि सफाईला सुरुवात करायची. सफाई करणे सोपे असते, पण लोकांच्या वृत्तीत बदल घडवून आणणे अवघड असते, असे त्यांना वाटे.

गावातील लोक सेनापती बापट यांना 'तात्या' म्हणून ओळखत. त्यांचे सफाईचे काम पाहून गावकऱ्यांमध्ये कुजबूज सुरू झाली. काहीजणांनी त्यांना विचारले, ''तात्या, हे कसलं काम काढलं?'' तात्या म्हणाले. ''स्वच्छतेचं.'' त्यावर गावकरी म्हणाले, ''तुमच्यासारख्या शिकल्या-सवरलेल्यांना हे असलं वंगाळ काम करणं बरं दिसत नाही.''

''सफाईच्या कामात वाईट काय आहे?'' तात्यांनी विचारले. ''पण असलं हलकं काम?'' गावकऱ्यांनी प्रश्न विचारला. ''जगामध्ये कोणतंही काम हलकं नाही. तुम्हीही या स्वच्छता मोहिमेत सामील व्हा.'' तात्या म्हणाले.

गावकऱ्यांनी तात्यांच्या वडिलांची म्हणजे दादांची भेट घेतली. तात्या करत असलेल्या स्वच्छता मोहिमेची माहिती दिली. वडिलांनी मुलाला समजावून सांगावे, असे सुचवले. एके दिवशी दादा तात्यांना म्हणाले, ''तात्या, तू विलायतेहून शिकून आलास आणि आता हे काय सुरू केलंस?'' ''काय झालं दादा? माझं काही चुकलं का?'' तात्यांनी विचारले.

''इतके दिवस सशस्त्र क्रांतीचं वेड तुझ्या डोक्यात होतं. त्यासाठी तू उच्च शिक्षण घेतलंस अन् आता तू हातात झाडू घेऊन सफाईला सुरुवात केलीस! आयुष्यात काय करायचं हे तू ठरवलंस की नाही?'' दादांनी विचारले.

''सारं आयुष्य देशसेवेसाठी घालवायचं, अशी मी प्रतिज्ञा केली आहे. विलायतेला जाऊन जे शिक्षण घेतलं, ती एक देशसेवाच होती आणि आता त्याच हातात झाडू घेतला, तोही देशसेवेचाच एक भाग म्हणून.'' तात्या म्हणाले. ''सफाई करण्यात कसली देशसेवा?'' दादांनी विचारले.

''दादा, तुम्ही रोज देवाची पूजा करता. पूजा करण्याआधी देवाची बैठक झाडून स्वच्छ करता ना? मग देश हाच माझा देव. मी माझ्या देवाची बैठक झाडून स्वच्छ करतो.

''तुम्ही पूजक देवाचे । देशाचा मीही पूजक ।।
सर्वव्यापी देव माझा । त्याची मी झाडी बैठक ।।''

यावर दादा तरी काय बोलणार? सेनापती बापट यांनी हे सफाईचे व्रत अबोलपणे आयुष्यभर राबवले. लोकांच्या वृत्तीत हळूहळू नकळत बदल होत गेला.

**- डॉ. अनिल गोडबोले**

## स्वाध्याय

**प्र. १. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सेनापती बापट यांनी गावकऱ्यांना स्वच्छता मोहिमेत सामील व्हायला का सांगितले?
(आ) 'भारत माझा देश आहे' या वाक्यात 'माझा' हा शब्द का वापरला आहे?
(इ) तात्यांच्या कृतीमुळे लोकांच्या कोणत्या वृत्तीत बदल होत गेला?
(ई) थोर व्यक्ती आपल्याला कशा प्रकारे शिकवण घालून देतात?

**प्र. २. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) तुम्ही शाळेत स्वच्छता मोहीम केव्हा केव्हा राबवता?
(आ) जेव्हा तुम्ही शाळेत स्वच्छता मोहीम राबवता, तेव्हा कशाकशाची सफाई करता? का?

(इ) तुमच्या मित्राला स्वच्छता करायला आवडत नाही. तुम्ही त्याला स्वच्छतेचे महत्त्व कसे पटवून द्याल? ते आठ-दहा ओळींत लिहा.

(ई) आपल्या देशातील तुम्हांला 'स्वतःच्या' वाटणाऱ्या गोष्टींची यादी करा.

**उपक्रम :** सार्वजनिक ठिकाणे, दवाखाने, बसस्थानके, वाचनालये, कार्यालये येथे असणाऱ्या स्वच्छतेच्या सूचनांचा वहीत संग्रह करा. तिथे आणखी कोणत्या सूचना असाव्या, याविषयी मित्रांशी चर्चा करून सूचना तयार करा.

## माहिती मिळवूया.

आपण सुंदर दिसावे, नीटनेटके राहावे, असे प्रत्येकाला वाटते, म्हणून आपण दररोज अंघोळ करतो. त्यामुळे आपले शरीर स्वच्छ होते. त्याप्रमाणे कपडेही स्वच्छ हवेत. शरीर व कपडे स्वच्छ असतील, तर मनही प्रसन्न राहते, म्हणूनच म्हटले जाते- 'ज्याचे शरीर निरोगी, त्याचे मन निरोगी.'


आपण आपले घर स्वच्छ, टापटीप ठेवतो. जशी घराची काळजी घेतो, तशीच आपण आपल्या परिसराची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे. परिसर अस्वच्छ ठेवला, तर त्याचा परिणाम शेवटी आपल्यावरच होणार आहे.

अस्वच्छतेमुळे परिसरात दुर्गंधीचे, कचऱ्याचे साम्राज्य पसरते. नाले-गटारे तुंबतात. डास, माश्या, चिलटं अशा अनेक कीटकांची पैदास होते. रोगराईला खतपाणी मिळते. कष्टाने कमावलेला पैसा दवाखाना, औषधपाणी यांवर खर्च होतो. रोगामुळे शरीर क्षीण होत जाते. मन दुबळे होते. आपण करत असलेल्या कामावर त्याचा विपरीत परिणाम होतो. आर्थिक स्थिती कोलमडते, म्हणूनच म्हटले जाते — 'स्वच्छता' हा समृद्धीचा पाया आहे. परिसर घाण होणार नाही, यासाठी स्वतःला तशा सवयी, शिस्त लावणे गरजेचे आहे.

आपण उद्याने, सिनेमागृहे, नाट्यगृहे, बसस्थानके, रेल्वेस्थानके इत्यादी सार्वजनिक ठिकाणी जातो. बसने, रेल्वेने प्रवासही करतो. त्या वाहनांमध्ये लिहिलेल्या 'येथे थुंकू नका', 'कचरा टाकू नका' अशा सूचना आपण वाचतो; परंतु तसे वागत नाही. अशी सार्वजनिक ठिकाणे आपण स्वच्छ ठेवली पाहिजेत.

आपण बागेत जाऊन तिथे खाऊ खातो; परंतु केलेला कचरा आपण कचराकुंडीत टाकत नाही. आपण नेहमी कचराकुंडीतच कचरा टाकला पाहिजे. आपण स्वतःच्या शरीराची, घराची जशी काळजी घेतो, तशीच काळजी या सार्वजनिक गोष्टींची घ्यायला हवी. अशी भावना, वृत्ती सर्वांची तयार व्हायला हवी; पण त्यासाठी आपण आपल्यापासून सुरुवात करायला पाहिजे. वेळ लागेल. एकदा का आपण स्वच्छतेचे उपासक झालो, म्हणजे 'स्वच्छतादूत' झालो, की आपल्याला अभिमानाने म्हणता येईल - 'माझा भारत-स्वच्छ भारत, सुंदर भारत.'

- **स्वच्छतेविषयीच्या खालील पाट्या वाचा व अशा प्रकारची घोषवाक्ये तयार करा.**




**शिक्षकांसाठी :** पाठातील परिच्छेदांचे व वाचनासाठी दिलेल्या उताऱ्याचे विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन, मूकवाचन करून घ्यावे.

# १७. पुस्तके

• ऐका. म्हणा. वाचा.

पुस्तकं सांगतात गोष्टी
युगायुगांच्या.
माणसांच्या जगाच्या,
वर्तमानाच्या-भूतकाळाच्या.
एकेका क्षणाच्या!
जिंकल्याच्या-हरल्याच्या,
प्रेमाच्या-कटुतेच्या!
तुम्ही नाही का ऐकणार
गोष्टी पुस्तकांच्या?
पुस्तके काही करू इच्छितात,
तुमच्याजवळ राहू इच्छितात.
पुस्तकांत पाखरं चिवचिवतात.
पुस्तकांत आखरं सळसळतात.
पुस्तकांत निर्झर गुणगुणतात.
पुस्तकं परीकथा ऐकवतात.
पुस्तकात रॉकेटचे तंत्र आहे,
पुस्तकात विज्ञानाचा मंत्र आहे.
पुस्तकांची दुनिया न्यारी आहे,
ज्ञानाची उत्तुंग भरारी आहे!
तुम्हांला नाही का जायचं?
पुस्तकांच्या विश्वात?
पुस्तकं काही सांगू इच्छितात,
तुमच्या जवळ राहू इच्छितात.



**मूळ कवी – सफदर हाश्मी**
(अनुवादित)

शब्दार्थ : **युगायुगांच्या** – खूप काळापासूनच्या, वेगवेगळ्या काळांतील. **कटुता** – कडवटपणा. **आखरं** – अक्षरं. **निर्झर** – झरा. **न्यारी** – वेगळी. **उत्तुंग** – खूपच उंच, भव्य.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) पुस्तके कोणाकोणाच्या गोष्टी सांगतात, असे कवितेत म्हटले आहे?

(आ) पुस्तके तुमच्याजवळ का राहू इच्छितात?

(इ) आपण पुस्तकांच्या विश्वात जायला हवे, असे कवीला का वाटते?

**प्र. २. 'पुस्तके' या कवितेतील खालील गोष्टी काय करतात, ते लिहा.**

**उदा., पाखरं – चिवचिवतात.**

(अ) आखरं (आ) निर्झर

**प्र. ३. कवितेच्या ओळी पूर्ण करा.**

(अ) पुस्तकं सांगतात ................
..................................
..................................
.................. भूतकाळाच्या.

(आ) तुम्ही नाही का ......................
..................................
..................................
.................. इच्छितात.

(इ) पुस्तकांत पाखरं ..................
..................................
..................................
........................ ऐकवतात.

(ई) पुस्तकात रॉकेटचे ..................
..................................
..................................
.................. भरारी आहे!

**प्र. ४. पुस्तकांचे जग वेगळे असते, याबद्दल शिक्षक, पालक, मित्रांशी चर्चा करा. लिहा.**

**प्र. ५. तुमचे पाठ्यपुस्तक चांगल्या अवस्थेत राहावे, यासाठी तुम्ही कोणती काळजी घ्याल?**

**प्र. ६. पुस्तक तुमच्याशी बोलते आहे, अशी कल्पना करा. आठ ते दहा वाक्ये लिहा.**

**प्र. ७. तुम्हांला कोणत्या प्रकारच्या गोष्टींची पुस्तके वाचायला आवडतात त्यांची यादी करा.**

**प्र. ८. तुम्ही वाचलेल्या किमान पाच पुस्तकांसंबंधी खालील मुद्द्यांच्या आधारे थोडक्यात माहिती लिहा.**

| पुस्तकाचे नाव | लेखक/कवी | विषय | आवडलेली वाक्ये | नवे शब्द |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

- **विचार करा. तुमचे मत सांगा.**

१. छापलेले पुस्तक व ई-पुस्तक यांपैकी तुम्हांला कोणते पुस्तक वाचायला आवडेल? का?

२. तुम्हांला शिक्षकांच्या मदतीने शिकायला आवडेल, की ई-पुस्तकांच्या मदतीने? का?

३. तुमचे पुस्तक वाचून झाल्यावर ते इतरांना वाचायला द्यावे की नाही? का?

**उपक्रम :** १. तुमच्या वर्गातील मित्रांच्या दप्तरातील पुस्तके पाहा. कोणाची कोणती पुस्तके चांगल्या अवस्थेत आहेत व कोणाची खराब झालेली आहेत ते पाहा. पुस्तके चांगल्या अवस्थेत का राहिली व खराब का झाली याविषयी त्या मित्रांशी चर्चा करा.

२. शाळेतील व गावातील वाचनालय, पुस्तकांचे दुकान, पदपथावरील पुस्तकांचे दुकान, गावातील एखाद्या पुस्तकप्रेमी व्यक्तीच्या घरातील पुस्तकांचा संग्रह यांपैकी तुम्हांला शक्य असेल त्या ठिकाणी जा आणि तेथे कोणकोणत्या प्रकारची पुस्तके आहेत याची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

**माहिती मिळवूया.**


## पूर्वी, आज आणि उद्या (पुढे)

पुस्तके म्हणजे माहितीचा खजिना. पुस्तके नवनवीन गोष्टींची माहिती देतात, आपले ज्ञान वाढवतात, नवीन शब्दांची ओळख करून देतात. पुस्तके आपणांस विचार करायला लावतात. आपल्या विचारांना दिशा देतात. ज्ञानाबरोबरच आपले मनोरंजन करतात. पुस्तके आपल्याला सोबत करतात. घरात एकटे आहात, वेळ जात नाही, कंटाळा आलाय, आपल्यासोबत बोलायला कोणी नाही, तर काढा पुस्तके अन् करा सुरुवात वाचायला. बघा, वेळ कसा मजेत जाईल. केवळ गोष्टींचीच पुस्तके असतात असे नाही. थोर व्यक्तींची चरित्रे, प्रवासवर्णने, कथासंग्रह, काव्यसंग्रह, नाटके, कादंबऱ्या, ऐतिहासिक, वैज्ञानिक व निसर्गाशी संबंधित असणारी अनेक पुस्तके असतात.

पूर्वी पुस्तके नव्हती. छपाईयंत्राचा शोध लागलेला नव्हता. तेव्हाही माणसे एकमेकांना संदेश, निरोप पाठवतच असत. आपले विचार, आठवणी लिहून ठेवत असत. ते निरोप, संदेश, विचार, आठवणी भूर्जपत्रांवर, झाडांच्या सालींवर लिहीत असत. कापडाचा, धातूचादेखील लिहिण्यासाठी उपयोग करत असत. काही ठिकाणी दगडावरही कोरून लिहिलेले आहे. त्याला शिलालेख म्हणतात. त्यानंतर कागदाचा शोध लागला. आपण कागदावर लिहू लागलो. छपाईयंत्राच्या मदतीने लिहिलेले छापू लागलो. त्यांना पुस्तके म्हणू लागलो. लिखित संग्रहांना फक्त पुस्तके म्हणतात असे नाही तर काहींना ग्रंथ, पोथी असेही म्हणतात.

आता आपण संगणकावरही पुस्तक पाहतो. संगणकावरील पुस्तकाला 'ई-पुस्तक' म्हणतात. पूर्वीची छापील पुस्तके व आजची 'ई- पुस्तके' हा पुस्तकांच्या स्वरूपात होत चाललेला बदल आहे.

- **खालील चित्रांना दोन-दोन विशेषणे लावा.**







| | | | | |
|---|---|---|---|---|
| ------- | ------- | ------- | ------- | ------- |
| ------- | ------- | ------- | ------- | ------- |

**शिक्षकांसाठी :** वरील उताऱ्याचे विद्यार्थ्यांकडून श्रुतलेखन व अनुलेखन करून घ्यावे.


# १८. कारागिरी

मला आठवतं, लहानपणी मी नेहमी आमच्या अजोळघराच्या शेजारच्या कुंभारवाड्यात जायची. तिथं एका फिरत्या चाकावर मातीचा गोळा ठेवला, की कुंभाराच्या हाताच्या चपळाईनं लहान-मोठी मातीची भांडी तयार व्हायची! फार गंमत वाटायची बघताना.

आमच्या घरी त्या वेळी मातीचीच भांडी असायची सैंपाकाला. मोगा, डेरा, घट, तरळ, टिंगाणी, गाडगी असलं हरघडी लागणारं काय काय असायचं. शेगड्या, चुलीपण मातीच्याच बनायच्या. खेळायला बुंडूकली, पुजायला बैल अन् गणपती, मुखवटे, नक्षीची कमान असलं बरंचसं तिथं तयार व्हायचं.



कुंभार हा निर्मितीचा धनी. त्याची ही कलाकुसर पिढ्यान्‌पिढ्यांची. हरघडी लागणारी. धार्मिक कार्यासाठी उपयोगी पडणारी. आमच्या घरी आजी-आजोबांचा हात या कामी थोडाफार बसलेला. नागपंचमीला ते चिखलाचा नाग तयार करून ताटलीत मांडायचे. बेंदराला बैल तयार करून फळकुटावर ठेवायचे. लई गंमत!



वडीलमाणसांच्या हाताखाली असल्यावर मग कधीमधी आमचापण हात कोणतं तरी एक काम करायला वळवळायचा.

आमच्या शेजारी जिनगराचं घर. तिथं पातळ गुलाबी रंगीत चुरमुऱ्या कागदात गुंडाळलेला, सोनेरी नक्षीतला अन् जिगानं चकचकतेल्या शेंडीचा नारळ तयार झाला, की बघताना तहानभूक हरपून जायची. लाकडी चौकोनातल्या काड्यांनी जुळवलेली दारावरची झगमगती तोरणं अन् लग्नाच्या वरातीतल्या नक्षत्रमाला पाहिल्या म्हणजे तासन्‌तास बघत राहावंसं वाटायचं. जिनगरांचा मामा लई कसबी माणूस. पाळण्यावरच्या खेळण्यांसाठी राघूमैना तर अशा करायचा, की खऱ्या-खोट्यातली फसगत व्हावी! खेळण्यावर चमचमणाऱ्या चंद्रचांदण्यांची शोभा तर अशी भुलवणारी, की काय सांगावं!





खेळणी तयार करायला बुरडाघरच्या कांबट्या आणाव्या लागायच्या. त्या निमित्तानं बुरूड गल्लीला गेलं, की तिथल्या रवळ्या, सुपं, करंड्या, चाळण्या, परड्या, टोपल्या, पेट्या, पाळणे, चटया, खुर्च्या, टेबलं बघण्याजोगी असायची. कारागिरीची लई किमया. एकेकाचा हात या कामी असा सरावलेला असायचा, की पाहणारानं वाहवा मांडलीच पाहिजे. सगळं कसं मजबूत अन् देखणं, जडभारपण नाही. फुलं वेचण्यासाठी बुरडाघरची परडी आमच्या हातात अशी नखऱ्यानं तोरा मारायची, की गावातल्यांनी विचारावं, ''कुठनं आणलीय



गाऽऽही परडी? आमच्या पोरींलापण मिळंल काय?'' अशा वेळी तोंडावर हसू फुटायचंन् ऐटी मिरवावी वाटायची.



ऐटीवरून निघालं म्हणून सांगते हं! आमच्या थोरल्या काकूला रांगोळी काढायचा दांडगा नाद. ठिपक्यांच्या तऱ्हेतऱ्हेच्या रांगोळ्या अंगणात ती अशी काढायची, की त्या भुईफुलांना बघून उभ्या गावानं हेवा करावा!

आम्ही मुली तिच्या हाताखाली. शेणानं सारवायचं काम आमच्याकडं. ती सांगेल त्या रीतीनं आम्ही ठिपक्या मांडायचो आणि मग तिच्या चिमटीतली शिरगोळ्याच्या पिठाची धार अशी गिरवायची तिच्या हाताबरहुकूम, की पाहणारानं तोंडात बोट घातलंच पाहिजे!

आमच्या शाळेत रांगोळीत हात बसलेली एक चिमा नावाची मुलगी होती. आमच्याच वयाची. एकदा आम्ही गावाबाहेरच्या तिच्या घरी भोंडला खेळायला गेलो, तर तिथं वाखाच्या निरनिराळ्या सुंदर जिनसा इथं तिथं पसरलेल्या आणि घरासमोर लांबच लांब कासरा तयार करण्यासाठी दोन्ही हात भरारा हालवत एकजण उभी. लाकडाच्या मुठींना अडकवलेला वाखाचा कच्चा धागा, हिच्या हातांच्या अस्सल गिरक्यांसरशी पीळ धारण करायचा अन् मग त्या टोकाला बसलेला माणूस हा पीळ एकात एक गुंफीत झक्कासपैकी दोरखंड तयार करायचा. फार सुंदर होती ही हातचलाखी! कितीतरी वेळ मी ते पाहत उभी असायची.

शिंकी, मुस्की, गोफण, चापत्या, दोर, कासरे, पिशव्या असलं काय काय शेतकऱ्याच्या घरात लागणारं तिथं मस्तपैकी तयार व्हायचं. घेऊसं वाटायचं. कांदे, बटाटे ठेवायला सैल चौकोनातल्या वाखाच्या पिशव्या आमच्या घरी तिथून यायच्या. ताकाचा डेरा घुसळण्यासाठी रवीला लागणारी लहान धाटणीची दोरी यायची.

तसं पाहिलं तर आमच्या शेतकरी घरात अशी कारागिरीची एकेक वस्तू लागायचीच. पिढ्यान्पिढ्या आपली कोणती एक कला जोपासणारी अन् त्यावर आपला उदरनिर्वाह करणारी ही मंडळी आमच्याकडे नेहमी येरझारायची.

सुतारानं यावं अन् लाकडी खेळणी देऊन जावं. पालख-पाळणा आणून द्यावा. डाव, रवी घेऊन यावं. घरातले खांब त्याच्याच हातचे. दरवाजे तोच करायचा.





तीच गोष्ट शिंप्याची. आमचे कपडे तर तो शिवून आणायचाच, पण रंगीबेरंगी तुकडेपण घेऊन यायचा. आमची आजी त्यांतून भावल्या करायची. अंगडी, टोपडी, नऊ खणांची चोळी, पायघोळ परकर, मुलांसाठी पांघरुणं, मोठ्यांसाठी वाकळ घरातच तयार व्हायची.

लहानग्यांसाठी नक्षीदार दुपटी ती अशी शिवायची, की घरोघरची मागणी आलीच पाहिजेल बारशाच्या







वेळी! कुंची तर अशी फैनाबाज शिवायची ती, की माहेरवाशिणीचा रुबाब सासरी जोकला गेलाच पाहिजेल, गुणगानांसह ज्याच्या त्याच्याजवळ!

**– डॉ. सरोजिनी बाबर**







**शब्दार्थ :** **मोगा, डेरा, घट, तरळ, टिंगाणी, गाडगी** – मातीची विविध आकारांची भांडी. **बेंदूर** – बैलपोळा. **फळकूट** – लाकडी फळीचा तुकडा. **तहानभूक हरपणे** – तहानभूक विसरून जाणे. **फसगत** – फसणे. **भुलवणे** – विसरणे. **कांबट्या** – बांबूच्या बारीक काड्या. **सरावणे** – सराव होणे. **वाहवा होणे** – स्तुती होणे. **तोंडावर हसू फुटणे** – खूप हसू येणे. **ऐटी मिरवणे** – तोरा गाजवणे. **हेवा करणे** – मत्सर वाटणे. **तोंडात बोट घालणे** – नवल करणे. **येरझारणे** – येणे-जाणे. **वाकळ** – गोधडी. **फैनाबाज** – सुबक, सुरेख. **जोकला जाणे** – तुलना होणे, गुणांची कदर होणे.

## स्वाध्याय

**प्र. १. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) लेखिकेला लहानपणी कशाची गंमत वाटायची?
(आ) लेखिकेच्या घरी मातीची कोणकोणती भांडी असायची?
(इ) लेखिकेचे आजी-आजोबा मातीपासून काय काय बनवायचे?
(ई) लेखिकेला तासन्‌तास काय बघत राहावेसे वाटायचे?
(उ) जिनगरांच्या मामाला लेखिकेने कसबी माणूस का म्हटले आहे?
(ऊ) कांबट्यांपासून काय काय बनवता येते?
(ए) चिमाच्या घरी काय काय बनवलेले असायचे?
(ऐ) शिंप्याने आणून दिलेल्या रंगीबेरंगी कापडाच्या तुकड्यांपासून आजी काय काय शिवायची?
(ओ) माहेरवाशिणीचा रुबाब सासरी कशामुळे वाढायचा?

**प्र. २. कोणाला व का म्हटले आहे ते लिहा.**

(१) निर्मितीचा धनी (२) भुईफुले

**प्र. ३. खालील शब्दसमूहांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

(अ) तहानभूक हरपणे. (ई) ऐटी मिरवणे.
(आ) वाहवा मांडणे. (उ) हेवा करणे.
(इ) तोंडावर हसू फुटणे. (ऊ) तोंडात बोट घालणे.

**प्र. ४. दोरखंड तयार केले जातात, त्या ठिकाणी जाऊन निरीक्षण करा. दोरखंड तयार करण्याची कृती लिहा.**

- **वाचा.**

या पाठात 'तोंड' या अवयवावर दोन शब्दसमूह आले आहेत.
जसे - तोंडावर हसू फुटणे, तोंडात बोट घालणे. 'तोंड' या अवयवावर आणखी बरेच वाक्प्रचार, शब्दसमूह आहेत. **उदा.,** तोंड देणे, तोंड फिरवणे, तोंडघशी पडणे, तोंडदेखले बोलणे, तोंड चुकवणे, तोंडचे पाणी पळणे, तोंडात मारल्यासारखे होणे, तोंडी लागणे.

- **खालील अवयवांशी संबंधित शब्दसमूह वा वाक्प्रचार संग्रहित करा.**

१. कान २. डोळे ३. नाक ४. डोके.

**उपक्रम :** १. तुमच्या परिसरातील वेगवेगळ्या वस्तू बनवणाऱ्या एखाद्या कारागिराच्या ठिकाणाला भेट द्या. तेथे कशाप्रकारे काम चालते, कोणती हत्यारे, यंत्रे वापरली जातात याचे निरीक्षण करा. कारागिराला प्रश्न विचारून माहिती मिळवा. वर्गात सांगा.

२. आपण बोलताना ‘लई गंमत!’ ‘लई भारी!’ असे अनेक उद्‌गार सहजपणे काढतो, त्यांतून आपला भाव व्यक्त करतो. असे उद्‌गार संकलित करा.

**हे करून पाहा.**

जुन्या, फाटक्या कपड्यांपासून दोरी, पायपुसणी तयार करा. त्यांचे वर्गात प्रदर्शन भरवा.

**माहिती मिळवूया.**

पूर्वीच्या काळामध्ये म्हणजे तुमच्या आजीआजोबांच्या काळात नव्हे, तर त्यांच्या आजीआजोबांच्या काळात खेड्यांतील परिस्थिती कशी होती, त्याचे वर्णन ‘कारागिरी’ या पाठात आले आहे. तुम्हांला हा पाठ वाचून आश्चर्य वाटले असेल. आपल्याच गावात आपल्या गरजेच्या वस्तू मिळतात. त्यासाठी शहरात जावे लागत नाही; पण हे व्यवसाय करणारे लोक त्या काळी फार मोठे व्यावसायिक नसत. त्या व्यवसायाचे त्यांनी शास्त्रशुद्‌ध सर्वांगीण प्रशिक्षणही घेतलेले नसायचे, तरीही खेडी स्वयंपूर्ण होती.

ज्या घरी जो व्यवसाय केला जायचा, तो व्यवसाय घरातील सदस्यांना घरातच शिकवला जायचा. आपल्या व्यवसायातील ज्ञान, कौशल्ये पुढच्या पिढीपर्यंत पोहचवण्याचे काम घरातच केले जायचे. त्याचे शिक्षण इतरत्र कुठेही मिळत नसे.

गावातील अशा व्यवसायांना साधे, घरगुती व्यवसाय न समजता, आता त्याकडे लक्ष पुरवले जाऊ लागले आहे. तुम्हांला जे चांगले येते, ज्याची तुम्हांला आवड आहे, त्या आवडीनुसार, तुमच्या इच्छेनुसार तुम्ही व्यवसाय निवडू शकता. त्याचे शास्त्रशुद्‌ध प्रशिक्षण तज्ज्ञ व्यक्तींकडून घेऊ शकता. त्यासाठी तुम्ही तुमच्या आवडीचे क्षेत्र कोणते आहे हे निश्चित करू शकता. उदा., मातीपासून बनवल्या जाणाऱ्या विविध वस्तू, शिवणकाम व कपड्यांवरील कलाकुसर, केशकर्तन, चपला-बूट बनवणे, लाकडापासून फर्निचर, शोभेच्या वस्तू बनवणे, खाद्यपदार्थ बनवणे असे वेगवेगळे प्रशिक्षण घेऊन आपण व्यवसाय करू शकतो.

यंत्रे, कुशल कारागीर आणि भरपूर मेहनत यांमुळे आपला व्यवसाय आपण भरभराटीला आणू शकतो. लोकांच्या गरजा, मागण्या लक्षात घेऊन आपण आपल्या व्यवसायात फेरबदल करू शकतो. आपल्याला जे काम आवडतं ते काम उत्तमरीतीने करून आपण त्यात यशस्वी होऊ शकतो.

- **खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य विशेषणे लिहा.**

(टवटवीत, निळेशार, नवा, पन्नासावा, उंच)

१. हिमालय .............. पर्वत आहे.

२. बागेत .............. फुले आहेत.

३. काल बाबांचा .............. वाढदिवस होता.

४. समुद्राचे पाणी .............. दिसत होते.

५. ताईने बाळाला .............. सदरा घातला.

# १९. वासरू



- **ऐका. म्हणा. वाचा.**

ओढाळ वासरू रानी आले फिरू,
कळपाचा घेरू सोडूनिया.

कानामध्ये वारे भरूनिया न्यारे,
फेर धरी फिरे रानोमाळ.

मोकाट मोकाट अफाट अफाट,
वाटेल ती वाट धावू लागे.

विसरूनी भान, भूक नि तहान,
पायांखाली रान घाली सारे.

थकूनिया खूप सरता हुरूप,
आठवे कळप तयालागी.

फिरू जाता मागे दूर जाऊ लागे,
आणखीच भागे भटकत.

पडता अंधारू लागले हंबरू,
माय! तू लेकरू शोधू येई.

**– अनिल**



**शब्दार्थ :** **ओढाळ** – स्वच्छंदी, मनात येईल तसे फिरणारे. **फिरू** – फिरायला. **घेरू** – घेराव. **न्यारे** – वेगळे. **फेर धरणे** – गोलगोल फिरणे. **मोकाट** – कोणतेही बंधन न पाळणे, स्वैरपणे फिरणे. **भान** – जाणीव. **हुरूप** – उत्साह, जोम, जोश. **आठवे** – आठवण येणे. **भागे** – दमून, थकून.

## स्वाध्याय

**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) रानात फिरायला मिळावे म्हणून वासरू काय करते?

(आ) तहान, भूक विसरून वासरू काय करते?

(इ) वासराला कळपाची आठवण केव्हा होते?

AEJSVS

**प्र. २. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधा व लिहा.**

(अ) भूक, तहान विसरून वासरू रानात सगळीकडे फिरते.

(आ) वासरू रानात फिरून फिरून थकले, की त्याचा उत्साह कमी होतो. मग त्याला आपला कळप आठवू लागतो.

(इ) वासरू कळपाकडे परत यायला निघते, पण त्याला रस्ता सापडत नाही. ते दूर जाऊ लागते. असे भटकल्यामुळे ते आणखीनच थकून जाते.

**प्र. ३. कळपातून निघालेले वासरू रानात कसे फिरू लागले, याचे वर्णन तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ४. खालील शब्दसमूह व वाक्प्रचार यांचा अर्थ समजून घेऊन त्यांचा वाक्यात उपयोग करा.**

कानांमध्ये वारे भरणे, हुरळून जाणे, रान पायांखाली घालणे, तहानभूक विसरणे, मग्न होणे, हुरूप येणे, मोकाट सुटणे.

**प्र. ५. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) शाळेची मधली सुट्टी झाली, की तुम्ही काय काय करता?

(आ) खेळायला गेल्यानंतर तुम्ही घरी लवकर परतला नाहीत तर तुमची आई काय करते?

(इ) तुम्ही तहानभूक केव्हा विसरता?

**प्र. ६. 'मोकाट-अफाट-वाट' याप्रमाणे शेवटचे अक्षर समान असलेले कवितेतील शब्द शोधा.**

**प्र. ७. 'रानोमाळ' सारखे पाच जोडशब्द लिहा.**


**प्र. ८. 'एखादे मूल आईपासून किंवा कुटुंबापासून गर्दीत हरवले,' असा प्रसंग तुम्ही पाहिला आहे का? असा प्रसंग तुमच्यावर कधी आला होता का ? त्या वेळी काय घडले ते सांगा.**


- **वाचा.**

सोडूनिया, थकूनिया यांसारखे शब्द कवितेत आले आहेत. ते नेहमी लिहिताना 'सोडुनिया, थकुनिया' असे लिहितात.

---

- **खालील चित्रांना विशेषणे लावा.**



---

- **ओळखा पाहू!**

बत्तीस भाऊ, एकच बहीण
सर्वांत तीच आयुष्यमान.

चार बोटांचे अंतर दोघांत असे
एकावर विश्वास, तर दुसऱ्यावर नसे.

बारा घरावर तिघे पहारा करती
सदैव फिरती, न थकती, न थांबती.

# २०. माझं शाळेचं नक्की झालं!

कोल्हापूरमधल्या कळंबा मध्यवर्ती कारागृहाजवळ रस्त्याला लागूनच एका सरळरेषेत पंधरा-वीस झोपड्या होत्या. त्यातल्याच एका झोपडीत आम्ही राहत होतो. मातीच्या कच्च्या विटांनी बांधलेल्या भिंती, त्यापण पावसाचं पाणी मुरून पडण्याच्या बेतात होत्या. फुटकीतुटकी कौलं वरती टाकली होती. आतली जमीन तर सतत ओलसरच असायची. त्यामुळे त्या झोपडीत नेहमी कुबट वास यायचा. उठून उभं राहिलं तर वरची कौलं डोक्याला धाड्कन लागायची. मोठ्या माणसांना उभं राहून कसलंच काम करता येत नव्हतं.

झोपडीत एका बाजूला चार-पाच फाटक्या वाकळा पडलेल्या. त्याच वाकळा आम्ही अंथरायला-पांघरायला वापरत असू. सात-आठ जरमनची ताटं, चिंध्यांची, फाटक्या कपड्यांची दोन-तीन गाठोडी, पाण्यासाठी दोन जरमनची पातेली, एक पत्र्याची घागर आणि अशोकदादाला नुकतीच मिळालेली पोलीसखात्याची काळी पत्र्याची पेटी, एवढाच



आमच्या घरातला एकूण संसार. शिवाय दारात एक रांजण होता.

त्या झोपडीत अशोकदादा, त्याची बायको सुमिती, लिंगाप्पा, मऱ्याप्पा, मधू आणि माझा चुलत भाऊ सिद्धू असे सहाजण राहत होते. तशातच तीन-चार दिवसांपासून माझे वडील, आई, मी आणि माझी बहीण मंगल असे आम्ही आणखी चारजणही तिथंच आलो होतो. सर्वांना झोपायलासुद्धा जागा पुरत नव्हती.

उद्या आम्हांला पुन्हा बोरगावला पालांवर जायचं होतं. आई आणि बाबा जायची तयारी करत होते. आईनं दोन-तीन ताटल्या, वेगवेगळ्या रंगाची जोडलेली दोन पातळं एका मोठ्या पिशवीत भरली. बाबाही बारीकसारीक सामान दुसऱ्या पिशवीत भरू लागले होते, तोच अशोकदादा ड्युटीवरून घरी आला. तो आईला सामान भरताना बघून म्हणाला,

''आई, कुठं जायची तयारी चाललीय?''

आई म्हणाली, ''जातू मागाला.... किती दीस हितं बसून खायाचं?''

दादानं बाबांना विचारलं, ''बाबा, कुठल्या गावाला जाणार?''

''आपल्या लोकांची बोरगावला पालं हायती. उद्या म्होरल्या गावाला जानार हायती. तवा आजच जायला पायजी.'' बाबा म्हणाले.

आई मला म्हणाली, ''इमे, बगत काय हुबी हायीस..? तुजी कापडं आन हिकडं. उशीर हुतुया निघाया.''

आईचं बोलणं ऐकून दादा म्हणाला, ''आई, इमीला घेऊन जाऊ नको... मी तिला शाळेत घालणाराय.''

शाळेत म्हटल्याबरोबर बाबांचं डोकं भडकलं.

बाबा रागानंच दादाला म्हणाले, ''तुजं डोस्कं-बिस्कं फिरलं का काय? पुरीला साळंत घालतु म्हणतूस... लय शिकलास म्हंजी शेना झालास व्हय?''

दादा शांत आवाजात म्हणाला, ''बाबा, तुम्ही उगीच चिडता. त्यात एवढं चिडण्यासारखं काय

आहे? चांगली शिकली तर कुठंतरी नोकरी करील. आजकाल शिक्षणावर सगळं चालतं.''

दादाचा शहाणपणा बाबांना पटणार होता थोडाच?

बाबा म्हणाले, ''साळा सिकून काय करायचं? घरात खायाला आन न्हाय आन् हिच्या साळंला पैकं कुटलं आनायचं? त्या परीस लगीनच कुटं ठरतंय का बगू.''

''तिच्या शाळेचा खर्च मी बघतो. तुम्ही काळजी करू नका आणि लग्न करायला काय ती मोठी बाई झालीय का? आता कुठं ती सहा वर्षांची आहे. तुम्ही तिकडं काय पण करा. मी इमीला शाळेत घालणाराय.'' दादा म्हणाला. इतका वेळ गप्प बसलेली आई म्हणाली, ''तुजा बा असाच हाय. तुज्या वक्ताला साळंत घालताना असंच केलं. तुज्या साळंसाठी म्या तुज्या बाचा लय मार खाल्ला. तुजी आजी बरी, ती तुमच्या साळंसाठी गावात ऱ्हायली भाकरी करून घालाला, तवा तुमी साळा शिकला. तुला, लिंग्याला आन् जिन्नूला म्हातारीनं संबाळलं. आमी आसं भीक मागत फिरत हुतू... तुज्यामुळंच तर मद्या, मऱ्या साळा शिकल्याती. तुज्यासारखीच ती पोरं कुटंतर काम करून खात्याली. तू म्हणतूस तर इमीला ठिव तुज्याजवळ. सिकली तर सिकंल.''

बाबा आईकडं रागानं बघत म्हणाले, ''तुमी मायलेकरं काय करायचं त्ये करा. उद्या पुरीचं लगीन झालं न्हाय म्हंजी घरात ठिवून बसाला लागील.''

बाबांचं बोलणं ऐकून वहिनी गालातल्या गालात हसली.

वहिनी शाळा शिकलेली होती. वहिनीच्या भावानं म्हणजे दाजीनं ती पायानं अधू असल्यामुळे उद्या कोणी लग्न केलं नाही तर कुठंतरी नोकरी तर करील, म्हणून शाळेत घातलं होतं.

आईबाबा मंगल आणि मधूला घेऊन बोरगावला पालांवर गेले.

मला करमत नव्हतं. सारखी आईची आठवण येत होती. पहिल्यांदाच आईला सोडून राहायची वेळ आली होती.

आई जाताना म्हणाली होती, ''माजी सय काडत बसू नगू... साळंत जात जा. वयनीबर भांडू नगू. ध्यान दिवून साळा सिक म्हंजी जालं.''

दादा आठ वाजता कामावर निघाला होता. दादाला उशीर झाला होता. दादा गडबडीनं कपडे घालत होता. कपडे घालता घालता तो वहिनीला म्हणाला, ''सुमे, आज इमीला शाळेत घेऊन जा... तिचं नाव शाळेत घालून ये. मला वेळ नाही, नाहीतर मीच गेलो असतो. पोरं कुठं गेली? घरात कोणीच नाही? पोरांना जेवायला घालून शाळेत पाठव.''

दादा कामावर गेला. वहिनीनं घरातली सर्व कामं भराभर आवरली.

आमच्या घरापासून शाळा फार जवळ होती. चार-पाच झोपड्या ओलांडल्या, की दगडी बांधकाम केलेली एक मोठी शाळा होती. तिथंच पहिलीचा वर्ग भरत होता. शाळेशेजारीच मोठं वडाचं झाड होतं.

वहिनी आणि मी शाळेत आलो. वहिनीनं बाईंना नमस्कार केला. वहिनीची बाईंबरोबर आधीची ओळख होती. माझे भाऊही त्याच शाळेत शिकत होते. फक्त त्यांचे वर्ग दुसरीकडे भरत होते. वहिनी म्हणाली, ''हिचं नाव शाळेत घालायचंय.''

बाईंनी माझ्याकडे निरखून बघितलं आणि माझी माहिती विचारायला सुरुवात केली, ''मुलीचं पूर्ण नाव काय?''

वहिनी म्हणाली, ''विमल नामदेव भोसले.''

बाईंनी नोंदवहीत लिहून घेतलं.

''हिची जन्मतारीख सांगा.''

जन्मतारीख कोणाला माहिती होती? मी जन्मलेलं वर्ष मात्र वहिनीला माहिती होतं, तिनं जन्मतारीख सांगून टाकली.

बाईंनी सर्व माहिती लिहून घेतली.

''नारळ आणला का?'' बाईंनी वहिनीला विचारलं.

वहिनी बाईंच्या तोंडाकडे बघू लागली.

बाई थोडा वेळ थांबून पुन्हा म्हणाल्या, ''शाळेत नाव घातलं म्हणजे नारळ किंवा सव्वा रुपया द्यावा लागतो. तुम्हांला माहीत नाही का?''

वहिनी म्हणाली, ''मी नारळ नाही आणला. पैसे तर माझ्याजवळ नाहीत. नंतर आणून देईन.''

वहिनी घरी गेली. मी शाळेत बसले.

बाई वर्गात शिकवू लागल्या. थोड्या वेळानं बाईंनी मला जवळ बोलावलं. माझी पाटी घेतली. 'ग, म, भ, न' ही चार मुळाक्षरं लिहून दिली आणि ती गिरवायला सांगितलं.

मी माझ्या जागेवर येऊन बसले. दुपारी जेवणाच्या सुट्टीत घरी आले. माझे सगळे भाऊही जेवणासाठी घरी आले होते. आम्ही जेवण करतो न करतो, तोपर्यंत शाळेची घंटा झाली.

वहिनीनं पैशासाठी दोन-तीन डबे उघडून बघितले. त्यांत काहीच नव्हतं.

आमच्या शेजारी पाटलांची मुलगी लता राहत होती. आम्ही तिला 'लताक्का' म्हणायचो. वहिनी लताक्काच्या घरात गेली. मीपण तिच्या मागोमाग गेले. वहिनी लताक्काला म्हणाली, ''लताक्का, तुमच्याजवळ सव्वा रुपया आहे का? इमीच्या शाळेत द्यायचाय. मी 'ते' आल्यावर परत करीन.''

लताक्कानं घरात सगळी शोधाशोध केली आणि माझ्या हातावर सव्वा रुपया ठेवला. मी तो घेऊन शाळेत गेले आणि माझं शाळेचं नक्की झालं!

**- विमल मोरे**

**शब्दार्थ :** **कारागृह** - तुरुंग. **कुबट वास** - कुजलेला वास. **आन** - अन्न.

## स्वाध्याय

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) लेखिका कोठे राहत होती?

(आ) झोपडीत नेहमी कुबट वास का यायचा?

(इ) लेखिकेचे आईबाबा कुठे जायची तयारी करत होते?

(ई) दादा इमीला आईबाबांबरोबर पाठवायला का तयार नव्हता?

(उ) वहिनीने लताक्काकडे पैसे का मागितले?

### प्र. २. कोण, कोणास म्हणाले ते लिहा.

(अ) ''किती दीस हितं बसून खायाचं?''

(आ) ''चांगली शिकली तर कुठंतरी नोकरी करील.''

(इ) ''पोरांना जेवायला घालून शाळेत पाठव.''

(ई) ''मुलीचं पूर्ण नाव काय?''

(उ) ''तुमच्याजवळ सव्वा रुपया आहे का?''

### प्र. ३. खालील शब्दांमध्ये लपलेले शब्द शोधा.

उदा., **झोपायला** - झोपा, पाय, पाला, झोला.

१. आजकाल

२. घालताना

३. माम्याजवळ

४. आठवण

**प्र. ४. 'फुटकीतुटकी' यासारखे पाठात आलेले जोडशब्द लिहा.**

**प्र. ५. धाड्कन यांसारखे आणखी शब्द लिहा.**

## खेळ खेळूया.

भाजी विकणाऱ्या सुबामावशीविषयीचा खालील परिच्छेद वाचा. यातील रंगीत शब्द स्वतःची जागा चुकलेत. ते विशेष माहिती देणारे शब्द योग्य ठिकाणी घालून उतारा पुन्हा लिहा.

डोक्यावर भाजीची पाटी घेऊन दिवसभर गर्द उन्हातून चालून सुबामावशी वैतागली होती. पाटीतली पिवळी मेथी उन्हाने कोमेजून हिरवीगार पडू लागली होती. सकाळी निघतानाची सुकलेली वांगी उन्हाच्या तडाक्यानं रसरशीत दिसू लागली होती. कधी एकदा घरी पोहचतो, असे सुबामावशीला झाले होते. एसटी संध्याकाळी दोन वाजता होती अन् आता भर दुपारचे फक्त सहा वाजले होते. कसेबसे चालत येऊन मावशीने स्टँडजवळचे आंब्याचे झाड गाठले. आंब्याच्या टळटळीत सावलीत आल्यावर तिला हायसे वाटले.

## हे करून पाहा.

आपल्या शाळेत असलेल्या 'राजू मंच' किंवा 'मीना मंच'ची सभा खालील विषयांच्या संदर्भात होणार आहे.

१. शाळेत कचरा होऊ नये म्हणून उपाय सुचवणे.

२. शाळेच्या बागेतील कुंड्यांची देखभाल करणे.

३. या महिन्यात सर्वांत जास्त वेळा उपस्थिती-ध्वज मिळवलेल्या वर्गाचे अभिनंदन करणे.

खालील मुद्द्यांच्या आधारे सभेची तयारी करून कोण काय काम करणार याचे नियोजन करणे.

- सभेचे संयोजक - इयत्ता पाचवीचा संपूर्ण वर्ग.
- सभेचे अध्यक्ष - ..............
- सभेचे प्रमुख पाहुणे - ..............
- सभेची बैठक व्यवस्था करणारे विद्यार्थी/करणाऱ्या विद्यार्थिनी - ..............
- सभेचे सूत्रसंचालन करणारा विद्यार्थी/करणारी विद्यार्थिनी - ..............
- सभेचे अध्यक्ष व पाहुण्यांची ओळख करून देणारा विद्यार्थी/देणारी विद्यार्थिनी - ..............
- आलेल्या मान्यवरांचे स्वागत करणारा विद्यार्थी/करणारी विद्यार्थिनी - ..............
- सभेतील विषय मांडणारे विद्यार्थी/मांडणाऱ्या विद्यार्थिनी - ..............
- सभेचे आभार प्रदर्शन करणारा विद्यार्थी/करणारी विद्यार्थिनी - ..............

## • वाचूया, समजून घेऊया.

• सूचना फलक व जाहिरात यांचे काही नमुने दिलेले आहेत, ते वाचा. यासारखे आणखी नमुने तयार करा.

### सूचना फलक

दि. २३-९-२०२२

कपोत परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे उद्या दि.२४-९-२०२२ रोजी आपल्या परिसराचा पाणीपुरवठा बंद राहील.

कपोत परिसरवासीयांनी याची नोंद घ्यावी व शक्य तेवढी पाण्याची काटकसर करून सहकार्य करावे.

- सेक्रेटरी

### वाचाल, तर वाचाल!

खुशखबर ! खुशखबर !! खुशखबर !!!

### पुस्तकांचे भव्य प्रदर्शन

अक्षरगंगा या संस्थेने साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. त्या अनुषंगाने पुस्तकांचे भव्य प्रदर्शन भरणार आहे. त्यात नामवंत लेखकांच्या साहित्यकृती विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत.


पुस्तक खरेदीवर २०% सूट देण्यात येणार आहे. तसेच रु.५००/- च्या खरेदीवर रु.५०/- किमतीचे एक पुस्तक मोफत मिळणार आहे. वाचकप्रेमींनी याचा अवश्य लाभ घ्यावा.



**स्थळ : सोनवडी क्रीडांगण**
१० ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर २०२२
सकाळी १० ते सायं. ७ पर्यंत.

**त्वरा करा. आपला पुस्तकसंग्रह समृद्ध करा.**

- वाचा.




- खालील जाहिरात काळजीपूर्वक वाचा व संबंधित प्रश्नांची उत्तरे द्या.

## पेरूची फोड, लागते गोड!

**बागेतले पेरू तुमच्या भेटीला!**



प्रसिद्ध, प्रगतशील शेतकरी श्रीमती वत्सलाबाई पानमळे यांच्या बागेतले ताजे आणि गोड पेरू यावर्षी पहिल्यांदाच थेट तुमच्या भेटीला.

गल्लीपासून दिल्लीपर्यंत प्रसिद्ध असणारे ताजे, गोड पेरू अल्पदरात उपलब्ध. राहता परिसरातील नागरिकांच्या खास आग्रहास्तव!

**विक्री १० जानेवारीपासून**
**निमगाव बसस्टँडच्या शेजारी सुरू होईल.**
**त्वरा करा.**

**बाजारभावापेक्षा निम्म्या दरात पेरू खरेदी करण्याची संधी फक्त संक्रांतीपर्यंतच! त्यानंतर बाजारभावाने पेरू मिळतील.**

(अ) पेरूची विक्री कुठे होणार आहे?
(आ) 'गल्लीपासून दिल्लीपर्यंत' प्रसिद्ध म्हणजे काय?
(इ) १० जानेवारीपासून संक्रांतीपर्यंत म्हणजे जास्तीत जास्त किती दिवस पेरू अल्पदरात मिळतील?
(ई) अशा पद्धतीने पेरू गेल्या वर्षी विकले गेले होते का? ते तुम्हांला कशावरून कळले?
(उ) वत्सलाबाईंच्या मळ्यातले पेरू संपणार, म्हणून चित्रातले पोपट उदास होत असतील का? पोपट खरोखरच पेरू खातात का? शोधण्याचा प्रयत्न करा.
(ऊ) पेरूचा बाजारभाव ३० रुपये प्रतिकिलो होता. सुमाच्या आईने संक्रांतीच्या आदल्या दिवशी ४५ रुपयांचे पेरू आणले. तिला किती किलो पेरू मिळाले असतील?
(ए) बाजारापेक्षा निम्म्या भावात पेरू विकण्याचे कारण काय असेल? चर्चा करून उत्तर लिहा.
(ऐ) गाताची वाडी, ता. बार्शी इथले शेतकरी श्री. उस्मान मुलाणी त्यांच्या स्वतःच्या शेतातली दगडी आणि मालदांडी ज्वारी बाजारभावापेक्षा कमी किमतीत विकणार आहेत. त्यांच्यासाठी सोबतच्या नमुन्याप्रमाणे जाहिरात तयार करा.



- **विजेबाबत दिलेले निवेदन वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**महावितरण**
**वीज बंद निवेदन**

महावितरण कंपनीच्या हसेनगर विभागात महत्त्वाच्या दुरुस्तीच्या कामासाठी गुरुवार दिनांक २३/०२/२३ रोजी हसेनगर परिसरातील वीजपुरवठा बंद राहील. सकाळी १०.०० ते ४.०० मु.पो. हसेवाडी, ता. हसेगाव, जि. हसेनगर.

**पीआरओ नं. पीझेड ४२५/१५**
**कार्यकारी अभियंता, हसेनगर विभाग**

(अ) वीज बंद-निवेदन कोणी दिलेले आहे?
(आ) वीज बंद-निवेदन कशासाठी देण्यात आलेले आहे?
(इ) कोणत्या दिवशी वीजपुरवठा बंद करण्यात येणार आहे?
(ई) कोणत्या भागातील वीजपुरवठा बंद ठेवला जाणार आहे?
(उ) तुमच्या परिसरात एखाद्या दिवशी वीजपुरवठा बंद राहणार आहे, हे तुम्हांला कशावरून कळते?
(ऊ) कोणकोणत्या कारणांसाठी वीजपुरवठा बंद केला जातो? चर्चा करा व लिहा.
(ए) तुमच्या घरात विजेवर चालणारी कोणकोणती उपकरणे आहेत?
(ऐ) तुमच्या घरामध्ये वीज वाचवण्यासाठी तुम्ही कोणती काळजी घ्याल?
(ओ) तुमच्या घरी दरमहा विजेचे बिल किती येते? ते कमी येण्यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न कराल?

- **दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे ‘प्रदर्शन’ या विषयावर आठ ते दहा वाक्ये लिहा.**

कोणत्या महिन्यात, किती दिवस, स्थळ, कोणाबरोबर पाहिले, पाहण्याचा उद्देश, पाहिलेल्या वस्तू, आवडलेल्या गोष्टी, संपूर्ण प्रदर्शनाविषयीचे मत.

- **प्रकल्प :**

१. वृत्तपत्रांतील वेगवेगळ्या जाहिराती, सूचना, निवेदने यांचे नमुने गोळा करा. त्यांचे निरीक्षण करा. ते काळजीपूर्वक वाचा. घरातील वडीलधाऱ्यांशी त्यावर चर्चा करा.

२. आपल्या परिसरात अनेक घटना घडत असतात. त्या घटना लिहून काढा. त्यांना नाव द्या. परिसरातील एखाद्या व्यक्तीची मुलाखत घ्या. ती लिहून काढा. तसेच एखादी जाहिरात तयार करा. या सर्व गोष्टी एका मोठ्या कागदावर चिकटवा आणि शाळेच्या सूचना फलकावर ‘आपले वृत्तपत्र’ म्हणून लावा. त्या वृत्तपत्रास नाव द्या.

**हे करून पाहा.**

‘टाकाऊतून टिकाऊ’ ह्या दोन शब्दांतील संदेश आपल्याला पर्यावरणाच्या रक्षणाकडे घेऊन जातो. कसे ते पाहा.

पुढच्या वर्षी तुम्ही पाचवीतून सहावीमध्ये जाणार. नवा गणवेश, नवे दप्तर, नवी पुस्तके, नव्या वह्या, सगळेच कसे नवे नवे! नवे ते हवे, असे तुम्हांला वाटते; पण जुन्यातून नवे तयार करण्याचा प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे! पाचवीचे वर्ष संपल्यानंतर तुमच्या वह्यांतील कोरी पाने वहीतून काढा. त्या कोऱ्या कागदांपासून वेगवेगळ्या आकारांच्या वह्या बनवा. काही लहान, काही मोठ्या मापांमध्ये वह्या तयार झाल्या, की अर्धे काम संपले. नंतर वहीच्या प्रत्येक पानावर योग्य ती सजावट करा.

त्या वह्यांमध्ये छान छान सुविचार, सुवचने, गोष्टी, विनोद यांची कात्रणे चिकटवा. रंगीबेरंगी चित्रे काढा. तुमच्या आवडत्या व्यक्तींचे फोटो घेऊन ते वहीत चिकटवा. फोटोंचा अल्बम तयार करा. बघा बरं करून किती गंमत येते ते!

एवढेच नाही, तर त्यातल्या काही वह्या इयत्ता सहावीतील गणितांचा सराव करण्यासाठी ठेवा. त्यातील एका वहीत ‘माझा शब्दसंग्रह’ बनवा, तर दुसऱ्या वहीत दररोज अनुलेखन करून तुमचे अक्षर सुधारा. आहेत की नाही उपयोगच उपयोग! ते पण टाकाऊ वह्यांतील कोऱ्या पानांपासून बनवलेल्या टिकाऊ वह्यांचे. ह्या वह्या तुम्ही मित्रांना, पाहुण्यांना वाचायला देऊ शकता. एखाद्या जवळच्या मित्र-मैत्रिणींला वाढदिवसाला भेटवस्तू म्हणूनही एखादी ‘खास’ वही देऊ शकता.

अशा वह्या तुम्ही तयार केल्या, तर कागदाची बचत होईल. या सगळ्यांसाठी नवीन वह्या आणण्याची गरज भासणार नाही आणि कागद तयार करण्यासाठी तुटणारी झाडे कमी होतील. झाडे वाचतील. पर्यावरणाचे रक्षण होईल.

# २१. प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा

AF3JYF

● ऐका. म्हणा. वाचा.



प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा, असेच का अन् तसेच का?
शिकणे कधी संपत नाही, होऊ द्यात लाख चुका.

कुत्र्याची शेपूट वाकडी का?
पेंग्विनची मान तोकडी का?
क्रिकेटची बॅट लाकडी का?
सापाची चाल वाकडी का?
प्रश्न विचारा....

वटवाघळं रात्री फिरतात का?
मासे पाण्यात तरतात का?
पतंग दिव्यावर मरतात का?
काजवे चमचम करतात का?
प्रश्न विचारा....

खोकल्याची उबळ येते का?
सर्दीत नाक गळते का?
मेंदूला वास कळतो का?
आठवणीने उचकी लागते का?
प्रश्न विचारा....

रंगीत तारे असतात का?
दिवसा तारे दिसतात का?
जीवसृष्टी आणखी कुठे असेल का?
माणसासारखा माणूस होईल का?
प्रश्न विचारा.

**– गौरीशंकर गंगा**

## स्वाध्याय

**प्र. १. कवितेच्या आधारे ओळी पूर्ण करा.**

१. शिकणे कधी ··········· चुका.
२. क्रिकेटची ··········· ?
३. खोकल्याची ··········· ?
४. सर्दीत ··········· ?
५. मेंदूला ··········· ?
६. रंगीत तारे ··········· ?
७. दिवसा तारे ··········· ?
८. माणसासारखा ··········· ?

**प्र. २. कवितेतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) कुत्रा | (अ) चमचम करणे |
| (२) पेंग्विन | (आ) वाकडी चाल |
| (३) साप | (इ) तोकडी मान |
| (४) वटवाघूळ | (ई) पाण्यात तरणे |
| (५) मासे | (उ) दिव्यावर मरणे |
| (६) पतंग | (ऊ) रात्रीचे फिरणे |
| (७) काजवा | (ए) वाकडी शेपूट |

**प्र. ३. तुमच्या मनाने उत्तरे लिहा.**

(अ) तुमचा मित्र लिहिताना अनेक चुका करतो. तुम्ही काय कराल?

(आ) वाचन करताना तुमच्या कोणकोणत्या चुका पुन:पुन्हा होतात? त्या टाळण्यासाठी काय कराल?

**प्र. ४. या कवितेतील प्रश्नांसारखे प्रश्न कधी तुम्हांला पडतात का? याशिवाय कोणते वेगळे प्रश्न तुम्हांला पडतात? त्या प्रश्नांची यादी तयार करून पालक, शिक्षक, मित्रमैत्रिणींना दाखवा. चर्चा करून उत्तरे मिळवा. वर्गात सांगा.**

**प्र. ५. शिकणे कधी संपत नाही, असे तुम्हांला वाटते का? खालील व्यक्तींकडून, प्राण्यांकडून, निसर्गातील विविध गोष्टींतून तुम्ही काय काय शिकाल ते लिहा.**

(१) आई (२) वडील (३) झाडे (४) पर्वत (५) नदी (६) गाढव (७) कुत्रा.

**उपक्रम :** इयत्ता चौथीतील 'हें कोण गे आई?' ही कविता वाचा.

## खेळूया प्रश्नांशी.

'सतीश आज रात्री सिनेमाला जाणार आहे.' असा निरोप होता. फोनला रेंज नीट नसल्यामुळे निरोप पूर्ण कळला नाही, म्हणून मामाने प्रश्न विचारला, ''कोण जाणार आहे?'' उत्तर मिळाले - 'सतीश.' मामा म्हणाला, ''कुठे जाणार आहे?'' उत्तर आलं- 'सिनेमाला.' मामाने पुन्हा विचारले, ''कधी जाणार आहे?'' उत्तर आले - 'आज रात्री.'

आपण प्रश्न कसा विचारतो त्यावरून उत्तर काय मिळेल ते ठरते. मामाने जर 'कोण, कुठे आणि कधी जाणार आहे?' असे विचारले असते, तर एकदम सगळी उत्तरे मिळाली असती.

खालील वाक्यांमधली सगळी माहिती एकदम मिळेल, असे प्रश्न विचारा. एकाच उत्तरासाठी अनेक प्रश्न असू शकतात.

**उदा.,** (१) रात्री अंधार पडला.

प्रश्न : रात्री काय पडला? अंधार कधी पडला?

(२) रस्त्याच्या कडेला बेवारस दप्तर पडलेले शकिलाने पाहिले.

प्रश्न : शकिलाने काय आणि कुठे पाहिले?

आता तुम्ही एखादे वाक्य लिहून त्यावर प्रश्न तयार करा.

## माहिती मिळवूया.

वटवाघूळ हा एक निशाचर प्राणी आहे. त्याचे शरीर मऊ केसांनी आच्छादलेले असते. त्याचा रंग पांढरा, लाल, तपकिरी, करडा किंवा काळा असतो. वटवाघळाचे पंख खूप मोठे असतात. पाठीच्या व पोटाच्या कातडीचा विस्तार होऊन त्याचे पंख तयार झालेले असतात. वटवाघळे संधिप्रकाशात व रात्रीच्या वेळी क्रियाशील असतात व दिवसा झोपतात. खाली डोके वर पाय अशा अवस्थेत ती फांद्यांना टांगून घेतात. फांद्यांना चिकटून राहण्यासाठी त्यांच्या मागच्या पायांची रचना वेगळी असते. त्यांच्या पायांची बोटे आतल्या बाजूला वाकलेली असतात व नखे इतकी वाकडी असतात, की झोपेतही ती झाडावरून खाली पडत नाहीत. वटवाघळे कीटकभक्षक असतात. शेतातील पिकांवरील कीड खाऊन पिकांचे होणारे नुकसान टाळतात.

- **सुवाच्य अक्षरांत लिहा.**

कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक म्हणजे ध्यास आणि दुसरी म्हणजे अभ्यास. शक्ती आणि युक्ती यांचा योग्य वापर केल्यास कोणत्याही कामातील अडचणी दूर होतात. इच्छित ध्येय साध्य झाल्याशिवाय प्रयत्न अर्धवट सोडून देणे म्हणजे माघार घेणे होय, म्हणून यश मिळवण्यासाठी प्रत्येकाच्या अंगी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास आवश्यक असतो.

## आपण समजून घेऊया.

### क्रियापद

- **खालील शब्दसमूह वाचा.**

१. मुले क्रीडांगणावर.

२. आमचा कबड्डीचा संघ.

वरील शब्दसमूह वाचताना नेमकी कोणती क्रिया झाली हे समजत नाही. त्यांचा नेमका अर्थ कळत नाही. ते अपूर्ण आहेत असे वाटते.

१. मुले क्रीडांगणावर <u>खेळतात</u>.

२. आमचा कबड्डीचा संघ <u>जिंकला</u>.

असे लिहिले, की <u>खेळतात</u> व <u>जिंकला</u> या शब्दांमुळे नेमकी कोणती क्रिया झाली आहे हे समजते, अर्थ कळतो. अशा शब्दसमूहांना वाक्ये म्हणतात. वरील वाक्यांत अधोरेखित केलेले शब्द क्रियापदे आहेत.

**शिक्षकांसाठी :** वर्गात एक विज्ञानपेटी लावावी. विद्यार्थ्यांना पडणारे प्रश्न कागदावर लिहून त्या पेटीत टाकण्यास सांगावे. परिपाठाच्या वेळी शिक्षकांनी त्या प्रश्नांची उत्तरे द्यावी.

# २२. अति तिथं माती





(चक्रमादित्य महाराजांचा दरबार. महाराज प्रवेश करतात.)

**सेवक** : समशेरबहाद्दूर, श्रीमंत चक्रमादित्य महाराजांचा जयजयकार असो! (सर्वजण जयजयकार करतात.) आस्ते कदम महाराज... आस्ते कदम...

**महाराज** : (सिंहासनावर बसून) बसा मंडळी, बसा. (प्रधानास) काय प्रधानजी, कशी काय आहे राज्याची हालहवाल?

**प्रधानजी** : (हात जोडून) आपल्या कृपेने उत्तम आहे. गोरगरीब भरपूर कष्ट करत आहेत. श्रीमंत लोक सुखात आहेत.

**महाराज** : छान ! उत्कृष्ट ! बरं, चोरीमारी वगैरे?

**प्रधानजी** : छे ! कोणी चोरी करत नाही. फक्त चोर तेवढे चोऱ्या करत आहेत.

**महाराज** : फारच छान. बरं, रोगराई वगैरे?

**प्रधानजी** : बिलकुल नाही! चार-दोन साथीचे रोग आले. त्यांत शे-पाचशे माणसं गेली. बाकी सगळे जिवंत आहेत.

**महाराज** : वा! वा! प्रधानजी, आमच्या राज्याची हालहवाल एकूण उत्तम आहे म्हणायची! बरं, आज करमणुकीचा कार्यक्रम कोणता?

**प्रधानजी** : एक उत्तम गाणारे बुवा आलेले आहेत. त्यांचं गाणं ऐकावं सरकार.

**महाराज** : त्यांचं नाव काय म्हणालात?

**प्रधानजी** : गानसेन.

**महाराज** : बरं बरं, बोलवा त्यांना.

(गवईबुवा येतात. नमस्कार करतात.)

**गवई** : महाराजांचा विजय असो!

**महाराज** : गवईबुवा, तुम्हांला काय येतं? तबल्यावर पेटी वाजवून दाखवता? नाहीतर असं करा, पेटीवर तबला वाजवा.

**गवई** : महाराज, मी वादक नाही. गवई आहे. संगीत गातो.

**महाराज** : बरं बरं, म्हणा काहीतरी.

(गवईबुवा मांडी घालून बसतात. हातवारे करून बेसूर आवाजात एक गाणे म्हणतात. महाराज खूश होतात.)

**महाराज** : वा! गवईबुवा, तुमचा आवाज साखरेसारखा गोड आहे. बोला, तुम्हांला काय बक्षीस पाहिजे?



**शिक्षकांसाठी :** या नाटिकेतील घटना, वाक्यांचे अर्थ व आवाजातील योग्य ते चढउतार लक्षात घेऊन विद्यार्थ्यांकडून अभिवाचन करून घ्यावे. विद्यार्थ्यांकडून वर्गात सादरीकरण करून घ्यावे.

**गवई :** महाराज, मला स्वतःला काही एक नको. सध्या संगीताला वाईट दिवस आले आहेत. संगीतकलेसाठी काहीतरी करा.

**महाराज :** अवश्य, अवश्य! काय बरं करावं? (विचार करतात. मग टाळी वाजवून) हां, छान कल्पना सुचली, प्रधानजी-

**प्रधानजी :** आज्ञा महाराज.

**महाराज :** संगीताला उत्तेजन दिलं पाहिजे. आत्ताच्या आत्ता दवंडी पिटवा- आजपासून आमच्या राज्यात सगळ्यांनी गाण्यात बोलायचं. कुणीही साधं बोलायचं नाही. सगळं गातगातच बोललं पाहिजे.

**प्रधानजी :** ठीक आहे, सरकार.

**महाराज :** जो कुणी गाण्यात बोलणार नाही त्याला शिक्षा करा. पहिल्यांदा त्याला सुळावर चढवा. मग हत्तीच्या पायी देऊन नंतर त्याचा कडेलोट करा आणि पुन्हा असं करणार नाही हे त्याच्याकडून लिहून घ्या.

**प्रधानजी :** आत्ताच दवंडी द्यायची व्यवस्था करतो.

(हळूहळू रंगमंचावर अंधार होतो. त्या अंधारातच प्रथम दवंडीचा आवाज व नंतर दवंडीवाल्याचे गाण्यात ओरडणे ऐकू येऊ लागते.)



**दवंडीवाला :** (गाण्याच्या चालीवर)

ऐका हो तुम्हि ऐका!
ऐका हो ऐका !!
आजपासुनी सर्व बोलणे,
व्हावे केवळ गाणे गाणे.
केवळ गाणे आणि तराणे,
चालणार नच इतर फलाणे.
राजाज्ञा जो मोडिल कोणी,
देउ सुळावर त्यास तत्क्षणी.
ऐका हो तुम्हि ऐका!!

(दवंडी संपते. रंगमंचावरील प्रकाशात दोन पहारेकरी हातांत भाले घेऊन एकमेकांशी बोलत येतात.)



**पहिला :** (हसत) छे छे ! हसून हसून आपलं तर पोट दुखायची वेळ आली बुवा ! जिकडे बघावं तिकडे लोक नुसतं गाताहेत. साधं बोलणं नाहीच कुठे.

**दुसरा :** महाराजांची आज्ञा आहे ना! कोण मोडणार?

**पहिला :** काय एकेकाचे आवाज भसाडे आहेत रे! त्यांनीसुद्धा गायचं म्हणजे काय हे!

**दुसरा :** लोक अगदी त्रासून गेले आहेत.

**पहिला :** शूऽ! कुणी गद्य बोललं, तर त्याला पकडायचं हे आपलं काम. आपणसुद्धा नाही बोलायचं. (गात)

गद्य कोण बोलतो,
त्यास मी पकडतो
अन् सुळावरी चढवतो.

**दुसरा** : ए, ते बघ, ती दोघं नवरा-बायको भांडत इकडेच येत आहेत. बाजूला उभं राहून ऐकूया. साधी भांडताहेत की गाण्यातच?

**पहिला** : चल तर लवकर.

(दोघे बाजूला उभे राहतात. नवरा घाईघाईने येतो. मागून बायको येऊन त्याचा हात धरते. दोघेही गाण्यातच बोलतात.)

**बायको** : तेल संपले, तूप संपले, मीठ संपले;
स्वयंपाक आता मी करू कशाचा?

**नवरा** : (रागावून) ए माझे आई, नकोस खिंकाळू!
हा चालतो बाजाराला,
आणून देतो माल तुला.

**बायको** : (हातात पिशवी देत) अन् येताना शेर-दोन शेर,
तुम्ही वांगी आणा छान सुरेख.



**नवरा** : (बायको गेल्यावर स्वतःशीच गुणगुणत)
आणितो मी तेल, तूप, मीठ, वांगी.
आणखी ती काय सांगी?

(आठवत आठवत नवरा जातो. दोघेही पहारेकरी हसत हसत पुढे येतात.)

**पहिला** : कमाल आहे बुवा ! भांडणसुद्धा गाण्यात करायचं!

**दुसरा** : आता हे नवरोजी गेले बाजारात. तिथे ही गर्दी माणसांची ! प्रत्येकजण गाण्यातच बोलतोय!

**पहिला** : खरंच, बाजारात तर मोठी गंमत उडाली असेल नाही?

**दुसरा** : अरे, गंमत म्हणजे काय? नुसती मजा चाललीय मजा ! समज, तू दुकानदार अन् मी गिऱ्हाईक. मग मी विचारायचं –
(गात) दुकानदारदादा, अहो दुकानदारदादा,
तुम्ही कसा दिला कांदा?

**पहिला** : (दुकानदाराची नक्कल करत, गात)
रुपयास चार शेर रावसाहेब,
रुपयास चार शेर.

**दुसरा** : (गात) द्या तर आम्हां एकच शेर,
घालू नका हो कचराकेर.

**पहिला** : (गात) माल अमुचा पांढराफेक,
कांदे किती हे स्वच्छ सुरेख!

**दुसरा** : (गात) चार आणे नाहीत फार,
मांडून ठेवा आज उधार.

**पहिला** : (गात) नाही नाही, नाही चालणार,
आज रोख उद्या उधार.

(दोघेही खूप हसतात. मग नेहमीच्या आवाजात बोलतात.)

**पहिला** : का रे, बाजारात ही गंमत! मग राजवाड्यात किती मौज उडाली असेल?

**दुसरा** : राजवाड्यात? अरे, तिथे तर साधं गाणं नाही, शास्त्रीय संगीत! सगळं रागदारीत चाललंय.

**पहिला** : चल, तिथली गंमत प्रत्यक्षच बघितली पाहिजे. चल, चल लवकर.

('गद्य कोण बोलतो' हे गाणे म्हणत दोघेही जातात. रंगभूमीवर थोडा वेळ अंधार. मग राजवाडा दिसतो. लोक महाराजांचा गाण्यात जयजयकार करत आहेत– जयजयकार महान, आपुला जयजयकार महान.)

**महाराज** : (गाणे म्हणत प्रवेश करतात.)
आलो, आलो मी. राणी कुठे आमची?

**राणी** : (गात) ही इथे महाराज मी.

**महाराज** : (गात) आज तुझे तोंड सुकले कशाने?

**राणी** : (गात) या पडशाने मज गांजियले.
(सटासट शिंकते.)

**महाराज** : (गात गात आज्ञा करतात.)
जा जा जा झणी घेऊन या वैद्या.

(एक सेवक जातो. तेवढ्यात आत आरडाओरड. 'महाराज...महाराज' अशा गाण्यातील हाका ऐकू येतात.)

**महाराज** : (घाबरून गातात) अरेऽऽ काय झालेऽऽ?

**सेवक** : (गडबडीने प्रवेश करून गातो.) महाराजऽऽऽ

**महाराज** : (गात) अरेऽऽ, काय झालं? बोल लवकरी.

**सेवक** : (गात व ताना घेत) महाराजऽऽऽ

**महाराज** : (गात) अरे बोल ना झडकरी!

**सेवक** : (गात) महाराज, आपुला प्रिय राजवाडाऽऽ

**महाराज** : (गात) पुढे बोल गद्ध्याऽऽ

**सेवक** : (ताना घेत तीच ती ओळ घोळून घोळून म्हणतो.) महाराज, आपुला प्रिय राजवाडाऽऽ

**महाराज** : (चिडून नेहमीच्या सुरात) आता बोलतोस लवकर का मुंडकं उडवू तुझं?

**सेवक** : (गातगातच) आपुला प्रिय राजवाडा,
जळुनि खाक झाला.

**महाराज** : (घाबरून) काय? माझा राजवाडा जळला? मेलो, ठार मेलो मी, अन् मूर्खा, तू हे आता सांगतोस?

**सेवक** : (नेहमीच्या आवाजात) क्षमा करावी महाराज, पण आपलीच आज्ञा होती ना सगळं गाण्यात सांगायचं म्हणून.

**महाराज** : खड्ड्यात गेली ती आज्ञा. प्रधानजी– (प्रधानजी समोर येतात.) प्रधानजी, लोकांना म्हणावं नेहमीप्रमाणे बोला.

**प्रधानजी** : जशी आज्ञा सरकार. राजवाडा सुखरूप आहे आपला. थोडक्यात वाचला. आग विझवली.

**महाराज** : फारच छान, उत्कृष्ट! आमच्या आज्ञेनं हा सगळा घोटाळा झाला. हे पाहा, आता जो कोणी गाईल त्याला सुळावर चढवण्यात येईल, अशी दवंडी लगेच पिटवा.

**प्रधानजी** : हां हां महाराज, मी लहान तोंडी मोठा घास घेतोय खरा! क्षमा असावी. महाराज, आपण ही आज्ञा परत घेतलीत तर उपकार होतील. नाहीतर अति तिथं माती होईल.

**महाराज** : शाबास प्रधानजी, पटलं आम्हांला. रद्द केली आम्ही आमची आज्ञा. खरं आहे तुमचं. अति तिथं माती — असं म्हटलंच आहे ... कुणी बरं म्हटलंय?

**प्रधानजी** : पण आज्ञा रद्द झाली ना?

**महाराज** : झाली म्हणजे काय? झालीच!

**– द. मा. मिरासदार**

---

**शब्दार्थ : आस्ते कदम** – पूर्वीच्या काळी राजा दरबारात प्रवेश करत असे, त्या वेळी महाराजांनी सावकाश व हळुवारपणे यावे यासाठी सेवक हा शब्द वापरत. **हालहवाल** – वर्तमान, सद्य:स्थिती. **कृपा** – दया, मेहेरबानी. **उत्तेजन देणे** – प्रोत्साहन देणे. **दवंडी पिटणे** – राजाची, सरकारची आज्ञा, सूचना, सार्वजनिक कार्यक्रमाचे जाहीर निमंत्रण सर्वांना ऐकू जाईल अशा मोठ्या आवाजात सांगणे. यावेळी सुरुवातीला वाद्य वाजवून सर्वांचे लक्ष वेधले जाते. **खिंकाळणे** – गाढवासारखा/घोड्यासारखा मोठा आवाज काढणे. **तोंड सुकणे** – चेहरा निस्तेज होणे. **झणी, झडकरी** – लवकर.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संगीताला उत्तेजन देण्यासाठी राजाने कोणती आज्ञा केली?

(आ) जळणाऱ्या राजवाड्याची बातमी सेवक राजाला पटकन का सांगू शकला नाही?

(इ) ही नाटिका तुम्हांला वर्गात सादर करायची आहे. त्यासाठी किती मुले लागतील?

**प्र. २. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) चक्रमादित्य महाराजांच्या राज्यातील सर्व लोक सुखी नव्हते, हे पाठातील कोणकोणत्या वाक्यांवरून कळते?

(आ) या पाठातील कोणती वाक्ये वाचून तुम्हांला हसू येते?

(इ) चक्रमादित्य राजाला संगीताचे अजिबात ज्ञान नव्हते, हे कोणत्या वाक्यांवरून कळते?

(ई) महाराजांची कोणती आज्ञा अमलात आणणे शक्य नाही, असे तुम्हांला वाटते ? असे का वाटते ?

(उ) या पाठाला 'अति तिथं माती' हे नाव का दिले असावे?

**प्र. ३. या पाठात महाराज, प्रधानजी, राणीसाहेब, सेवक, पहारेकरी यांच्या तोंडी संवाद आहेत. त्यांच्या आवाजातील चढउतार लक्षात घेऊन त्यांच्याऐवजी तुम्ही कसे बोलाल ते वर्गात सादर करा.**

**प्र. ४. वाक्यात उपयोग करा.**

(अ) साखरेसारखा गोड. (आ) उत्तेजन देणे. (इ) हसून हसून पोट दुखणे.

**प्र. ५. खालील प्रसंग तुम्ही गाण्यातून कसे सादर कराल ते लिहा.**

(अ) तुम्हांला करमत नाही, हे तुम्ही तुमच्या मित्राला सांगत आहात.

(आ) शिक्षक शिकवलेल्या पाठावर मुलांना गृहपाठ करायला सांगत आहेत.

(इ) रस्त्यावर फिरून माल विकणारी व्यक्ती मालाची जाहिरात करत आहे.

**प्र. ६. वांग्यांसाठी, कांद्यांसाठी कोणकोणती विशेषणे या पाठात आलेली आहेत ? वांगी, कांदे यांसाठी तुम्ही आणखी कोणती विशेषणे वापराल?**

**प्र. ७. तुमच्या आवडीच्या कोणत्याही पाच वस्तूंची नावे घेऊन त्यांच्यासाठी विशेषणे लिहा.**

**प्र. ८. चोरीमारी, गोरगरीब यांसारखे पाठातील व इतर जोडशब्द शोधा. लिहा.**

**प्र. ९. खालील शब्द असेच लिहा.**

उत्कृष्ट, उत्तम, कार्यक्रम, स्वतःला, उत्तेजन, पुन्हा, प्रिय.

**प्र. १०. अ आणि ब या चौकटींत परस्परांचे विरुद्धार्थी शब्द दिलेले आहेत. त्यांच्या जोड्या जुळवून लिहा.**

**प्रत्येक जोडीसाठी एक-एक वाक्य लिहा.**

**उदा.**, जवळ X दूर.

शाळा माझ्या घरापासून जवळ आहे आणि दवाखाना माझ्या घरापासून दूर आहे.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| रुंद, गोरगरीब, रोख, सुंदर, हजर, मान, भरभर, उद्योगी. | अरुंद, श्रीमंत, उधार, कुरूप, गैरहजर, अपमान, सावकाश, आळशी. |

**उपक्रम :** १. कोणताही एक विनोदी विषय घेऊन शिक्षकांच्या मदतीने नाट्यीकरण सादर करा.

२. शिक्षकांच्या मदतीने मराठीतील विनोदी लेखन करणाऱ्या लेखकांची माहिती मिळवा.

# २३. छत्रपती राजर्षी शाहूमहाराज



AFLC20

१८९६ चा पावसाळा कोरडाच गेला. नंतरच्या वर्षीही उन्हाची तल्खली वाढू लागली होती. आभाळात कोरड ढग जमायचे, निघून जायचे. प्रजेच्या डोळ्यांतील पाणीसुद्धा आटलं. कोल्हापूरच्या सुपीक मातीला भेगा पडू लागल्या. शेतकरी आभाळाकडं डोळं लावून बसला.



छत्रपती राजर्षी शाहूमहाराजांविषयी लोक बोलायला लागले, 'इतका चांगला राजा मिळाला आणि आता अस्मानी संकट आलं. काय रं बाबा, आबाळाची कुऱ्हाड पडली रं मानंवर!'

सर्वत्र दुष्काळानं थैमान घातलं. हलकल्लोळ उडाला. जनावरं उपाशी पडली. बळीराजाचं काळीज दगडाचं झालं. गावपांढरी सोडून माणसं जगायला दूर चालली. गोरगरीब करपून जायला लागले. गावंच्या गावं ओस पडायला लागली.

शाहूमहाराजांचा जीव वरखाली व्हायला लागला. त्यांनी दिवाण बहाद्दूर रघुनाथराव सबनीसांना व निवडक अधिकाऱ्यांना बोलावलं. घोड्यावरून दौरा सुरू झाला. थंडीचे दिवस. बोचऱ्या थंडीची जाणीव घोड्यावरून काही होत नव्हती; पण फाटकंतुटकं पांघरून रानोमाळ फिरणाऱ्या गरीब रयतेची अवस्था महाराजांना कळत होती. गडहिंग्लज, रायबाग, कटकोळ भागांत दुष्काळानं झोडपलेल्या रयतेला धीर देत महाराज फिरत होते. भर दुपारी उन्हातान्हाचा मारा न जुमानता महाराज स्वतः भेटायला येत असल्याचं प्रजेला अप्रूप होतं.

नव्या वर्षाच्या सुरुवातीला भुदरगड, पन्हाळा, शाहूवाडी या तालुक्यांचा दौरा सुरू झाला. हिरवीगार रानं उन्हानं करपून गेली होती. महाराज रानामाळानं पायी जात होते. झोपडी-झोपडीत जाऊन विचारपूस करत होते. महाराजांच्या कानावर प्रजेचं गाऱ्हाणं येत होतं.

महाराजांनी व्यापाऱ्यांची बैठक बोलावली. 'बंधूनो, दुष्काळानं हाहाकार माजवलेला तुम्ही बघतच आहात. मी स्वतः संस्थानात दौरा काढून प्रजेची दयनीय अवस्था पाहिलेली आहे. तुम्ही जशी माझी प्रजा, तशीच शेतकरी आणि गोरगरीब मजूरही माझीच प्रजा. तुम्ही धान्याच्या किमती कमी केल्या, तर दोन वेळेला चार घास त्यांच्या पोटात जातील. तुम्ही धान्याची विक्री खरेदीच्या किंमतीला करा. खरेदीच्या दरात प्रजेला धान्य मिळायला लागलं, तर प्रजा तुम्हांला दुवा देईल आणि आम्ही नुकसान होऊ देणार नाही. तुमचा तोटा आम्ही दरबारातून भरून देऊ.'

त्यामुळे धान्याच्या किमती उतरल्या. प्रजेला रास्त दरात धान्य घ्यायला थोडंतरी परवडायला लागलं. महाराजांच्या मार्गदर्शनाखाली काही व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन थोडी पुंजी जमा केली. त्या रकमेमधून एक स्वस्त धान्य दुकान सुरू झालं. तिथून प्रजेला स्वस्त धान्य योग्य प्रमाणावर मिळायला लागलं.

शहरातल्या बाकीच्या व्यापाऱ्यांवर या गोष्टीचा चांगला परिणाम झाला. त्यांनीही फायदा न घेता 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर धान्य विकायला सुरुवात केली. महाराजांनी दरबारातून बिनव्याजी कर्ज वाटायचा हुकूम दिला. व्यापारी कर्ज घेत, त्यातून धान्याची खरेदी करत. ते धान्य विकत आणि रक्कम दरबारी जमा करत. अशी एक व्यवस्था तयार केली.

पाण्याचा प्रश्नही ज्वलंतच होता. महाराजांनी

युद्धपातळीवर हालचाली सुरू केल्या. 'विहिरीतला गाळ काढा. नदीकाठी विहिरी खोदा. दरबारातून लागेल तेवढा खर्च करा.' महाराजांनी आदेश दिले.

त्यांनी राज्यातल्या नदीनाल्यांची पाहणी सुरू केली आणि बांधकाम खात्यातल्या इंजिनिअर्सना घेऊन आखणी करायच्या तयारीला लागले. जिथं शक्य होतं, तिथं नदी-नाल्यांवर बंधारे घालून वाया जाणारं पाणी अडवायची योजना राबवण्यात आली. नवे तलाव कुठे कुठे बांधता येतील, याचीही पाहणी झाली. वडगाव, शिरोळ, रुकडी या गावांत नवे तलाव बांधून लोकांना पाणी द्यायला सुरुवात केली.

विहिरींचा गाळ काढून त्यांची खोली-रुंदी वाढवल्यामुळे तिथं पाणी साठायला लागलं. प्रजेची गरजेपुरत्या पाण्याची सोय झाली. शेतकऱ्यांची जित्राबं उपासपोटी मरू लागली. महाराजांनी जनावरांच्या छावण्या उभ्या करून जनावरं आणली. त्यांना वैरण, दाणागोटा देऊ लागले. राज्यानं उभारलेल्या सरकारी थट्टीत गरिबांची, शेतकऱ्यांची जित्राबं जगली. संस्थानच्या मालकीच्या जंगलात गुरं चारायला मोकळीक देण्यात आली.

महाराजांनी हुकूम दिला, ''सगळा खजिना रिकामा करा, पण शेतकऱ्यांना जगवा, जनावरांना जगवा, प्रजेला जगवा... कुणाची हेळसांड होऊ देऊ नका.''

महाराजांनी दरबारात सांगितलं, ''प्रजेला धान्य आणून दिलं, जनावरांना चारापाणी आणून दिलं म्हणजे तेवढ्यावर भागत नाही. बाकी सगळं विकत घ्यायला त्यांच्याकडे पैसा नाही. त्यांना पैसा देण्यासाठी कामं काढायची. रोजगार हमी योजना राबवायची. आपल्याकडं रस्ते चांगले नाहीत, ते करून घ्या. ब्रिटिश हद्दीतसुद्धा रस्त्याची कामं काढा.''

भराभर चक्रं फिरली. महाराज स्वतः फिरत होते. रस्त्याची कामं होऊ लागली. गरीब रयतेच्या हातात चार पैसे पडू लागले.

महाराजांनी आणखीन एक गोष्ट हेरली होती. रस्त्याच्या कामावर बायका येतात. त्या कामात असतात, तेव्हा त्यांची चिल्लीपिल्ली झाडाखाली आणि इकडं तिकडं फिरतात, उपाशी राहतात, रडतात. त्यांच्याकडे कोण बघत नाही, म्हणून त्यांनी दरबारला हुकूम दिला, 'आजच्या आज छावण्या उघडा. आया नेमा आणि त्या पोराबाळांची व्यवस्था करा. प्रत्येक कामावर ही व्यवस्था करा.'

महाराजांच्या हुकमानं रोजगार हमीच्या प्रत्येक ठिकाणी शिशु संगोपनगृहं चालू झाली. बाया-बापड्यांची करपणारी माया सावलीत विसावली.

**- श्रीराम पचिंद्रे**

**शब्दार्थ :** **तल्खली** - तडाखा. **आबाळाची कुऱ्हाड पडणे** - संकट येणे. **बळीराजा** - शेतकरी. **गावपांढरी** - मूळ गाव. **प्रजा** - जनता. **जित्राबं** - जनावरे. **थट्टी** - गुरे बांधण्याची जागा. **छावण्या** - तात्पुरते बांधलेले छप्पर. **हेळसांड** - दुर्लक्ष.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोल्हापूरच्या सुपीक जमिनीला भेगा का पडू लागल्या?

(आ) लोक शाहूमहाराजांविषयी काय बोलू लागले?

(इ) पाण्याच्या प्रश्नासंबंधी महाराजांनी कोणता आदेश दिला?

(ई) रोजगार हमीच्या प्रत्येक ठिकाणी महाराजांनी मुलांसाठी कोणती योजना सुरू केली?

**प्र. २. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शाहूमहाराजांचा जीव वरखाली का होऊ लागला?

(आ) नव्या वर्षाच्या सुरुवातीला महाराजांनी कोणकोणत्या तालुक्यांचा दौरा केला? त्याठिकाणची परिस्थिती कशी होती?

(इ) महाराजांनी व्यापाऱ्यांना बैठकीत काय सुचवले?

(ई) जित्राबांसाठी महाराजांनी कोणकोणत्या सोई केल्या?

(उ) महाराजांनी रोजगार हमी योजना राबवण्याचे का ठरवले?

(ऊ) महाराजांनी शिशु संगोपनगृहं चालू करण्याचा हुकूम का दिला?

**प्र. ३. खाली दिलेले शब्द वाचा व पुन्हा लिहा.**

तल्खली, अस्मानी, हाहाकार, संस्थान, जित्राबं, हद्द, चिल्लीपिल्ली, छावण्या, हुकूम.

**प्र. ४. या पाठामध्ये 'बिनव्याजी' हा शब्द आला आहे. तुम्हांला माहीत असलेले असे उपसर्गयुक्त शब्द लिहा.**

**प्र. ५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) दुष्काळ x

(आ) सुपीक x

(इ) लक्ष x

(ई) तोटा x

(उ) स्वस्त x

- **खालील वाक्यांतील क्रियापदे अधोरेखित करा.**

१. समीरने पुरणपोळी खाल्ली.

२. शाळा सुरू झाली.

३. मुलींनी टाळ्या वाजवल्या.

४. शिक्षकांनी मुलांना प्रश्न विचारले.

५. रमेशने अभ्यास केला.

६. वैष्णवी सुंदर गाते.

- **कंसातील क्रियापदे योजून पुढील वाक्ये पूर्ण करा.**

(लागला, गेले, सोडले, करतात.)

१. तिचे बालपण निसर्गाच्या सान्निध्यात ........... .

२. एखादे संकट आल्यावर मुंग्या एकमेकींना सावध ........... .

३. त्याने घर ........... व तो रामटेकच्या जंगलात भटकू ........... .

# २४. कापणी

- ऐका. म्हणा. वाचा.

आता लागे मार्गेसर,
आली कापनी कापनी.
आज करे खालेवऱ्हे,
डाव्या डोयाची पापनी!

पडे जमीनीले तढे,
आली कापनी कापनी.
तशी माझ्या डोयापुढे,
उभी दान्याची मापनी.



शेत पिवये धम्मक,
आली कापनी कापनी.
आता धरा रे हिंमत,
इय्ये ठेवा पाजवुनी.



पीक पिवये पिवये,
आली कापनी कापनी.
हातामधी धरा इय्ये,
खाले ठेवा रे गोफनी.

काप काप माझ्या इय्या,
आली कापनी कापनी.
थाप लागली पिकाची
आली डोयाले झापनी!

आली पुढे रगडनी,
आता कापनी कापनी.
खये करा रे तय्यार,
हाती घीसन चोपनी.

**– बहिणाबाई चौधरी**

**शब्दार्थ :** **लागे** – सुरुवात होत आहे. **मार्गेसर** – मार्गशीर्ष महिना. **खालेवऱ्हे** – खालीवर. **डोयाची** – डोळ्याची. **जमीनीले** – जमिनीला. **तढे** – भेगा, फटी. **मापनी** – मोजणी. **पिवये** – पिवळे. **इय्ये** – विळे (ज्वारीची धाटे, गवत कापण्याचे हत्यार.) **पाजवुनी** – धार लावून. (विळ्याची कापण्याची बाजू तीक्ष्ण करणे.) **गोफनी** – गोफण, दगड फेकण्याचे साधन. **पिकाची थाप लागणे** – पिकाचा ढीग लागणे. **डोयाला झापनी येणे** – दमल्यामुळे खूप झोप येणे, श्रमाने डोळे मिटायला लागणे. **खये** – खळे. (कणसातून दाणे बाहेर काढण्यासाठी, मळणी करण्यासाठी तयार केलेली जागा.) **घीसन** – घेऊन. **चोपनी** – कणसे, जमीन बडवण्यासाठी वापरायचे जाड लाकूड.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कापणी कोणत्या महिन्यात सुरू होते?
(आ) पिके कापायला आल्यानंतर कवयित्रीच्या डोळ्यांपुढे काय उभे राहते?
(इ) पिके कापणीच्या वेळी शेत कसे दिसते?
(ई) कवयित्रीने 'हिंमत धरा' असे का म्हटले आहे?
(उ) कवयित्रीने विळ्यांना धार लावून ठेवायला का सांगितले आहे?

**प्र. २. खालील अर्थ असलेल्या कवितेतील ओळी शोधा व लिहा.**

(अ) आता कापणीला तयार व्हा व विळ्यांना धार लावून ठेवा.
(आ) हातातली गोफण खाली ठेवा व हातात विळे घ्या.
(इ) कापलेल्या पिकाची रास लागलेली आहे.
(ई) कापणी झाल्यावर रगडणी येते.

**प्र. ३. पिके कापायला आली तेव्हापासून धान्याची रास होईपर्यंत कोणकोणती कामे करावी लागतात, ते क्रमाने लिहा.**

**प्र. ४. तंत्रज्ञानात बदल होत असल्यामुळे शेतीच्या कामांमध्ये कसे कसे बदल होत गेले, याची माहिती मिळवा व खालीलप्रमाणे रकाने बनवून वहीत लिहा.**

| कामे | पूर्वीची स्थिती | सध्याची स्थिती |
|---|---|---|
| शेताला पाणी देणे. | बैलांच्या साह्याने विहिरीतील पाणी मोटेने उपसणे, काढणे. शेताला पाटाने पाणी देणे. | बोअरला मोटर लावून पाणी उपसणे. तुषार सिंचन, ठिबक सिंचन करणे. |
| | | |

**प्र. ५. 'डाव्या डोळ्याची पापणी खालीवर होते' असा उल्लेख या कवितेत आलेला आहे. काहीतरी शुभ घडणार असेल, तर असे म्हणतात. अशा अनेक समजुती समाजात रूढ आहेत. तुमचे आजी–आजोबा, आई–वडील, शेजारी, आसपासचे लोक यांच्याकडून अशा समजुतींची माहिती घ्या. त्यांची कारणे शिक्षकांकडून समजून घ्या. त्या मागील वैज्ञानिक कारणे शोधा.**

**प्र. ६. ही कविता तुम्हांला आवडली का? या कवितेतील तुम्हांला आवडलेल्या ओळी लिहा.**

**प्र. ७. इया म्हणजे विळा. बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेत 'व' ऐवजी 'इ' आणि 'ळ' ऐवजी 'य' चा उपयोग करतात. कवितेत आलेले असे शब्द लिहा.**

**प्र. ८. खालील वाक्ये वाचा. त्यांतील समानार्थी शब्द शोधा व लिहा.**

**उदा.**, शाळेचा संघ जिंकलेला पाहून संतोषचा आनंद गगनात मावेना.

(१) पंकज आणि सरोजला कमळाचे फूल खूप आवडते.

(२) सौदामिनीने आकाशात वीज कडाडताना पाहिली.

(३) रजनी, यामिनी या निशाच्या घरी रात्री गेल्या.

(४) संग्राम आणि समर पानिपतच्या युद्‌धाची कथा वाचत होते.

(५) सुमन, कुमुद आणि कुसुम यांनी शाळेतील कार्यक्रमासाठी फुले गोळा केली.

(६) रवी, भास्कर, आदित्य, सविता व भानू हे सर्व मित्र दररोज सकाळी सूर्याला नमस्कार करतात.

**प्र. ९. वाचा. लक्षात ठेवा.**

कवितेत आलेले खालील शब्द, त्या शब्दापुढे दाखवल्याप्रमाणे नेहमी लिहितात.

कापनी – कापणी, पापनी – पापणी, मापनी – मापणी, गोफनी – गोफणी, झापनी – झापणी, रगडनी – रगडणी, चोपनी – चोपणी.

**उपक्रम :** १. शेतीकामासाठी कोणकोणती अवजारे लागतात, ते शेतात जाऊन पाहा. त्यांची नावे माहीत करून घ्या. ती वापरून कोणकोणती कामे केली जातात याची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

२. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांचा संग्रह करा.

- **कंसांत काही क्रियापदे दिली आहेत. त्यांची योग्य रूपे तयार करून खालील वाक्यांतील रिकाम्या जागी लिहा.**

**उदा.**, राधाने टाळ्या ........... (वाजवणे)

राधाने टाळ्या वाजवल्या.

१. शिक्षकांनी मुलींचे अभिनंदन ............ (करणे)

२. चंदूने झाडांना पाणी ............ (घालणे)

३. आईने नीताला प्रश्न ............ (विचारणे)

४. मंदा गाणी छान ............ (म्हणणे)

- **कंसातील सूचनेनुसार वाक्ये बदलून पुन्हा लिहा.**

१. आकाशात ढग येताच मोर नाचू लागला.

(‘मोर’ ऐवजी ‘मुले’ हा शब्द घ्या.)

२. साप दिसताच तो घाबरला.

(‘तो’ ऐवजी ‘त्या’ हा शब्द घ्या.)

३. अभयने दप्तर जागेवर ठेवले.

(‘अभय’ ऐवजी ‘शारदा’ हा शब्द घ्या.)

AG5461

# २५. ढोल





सातपुड्याच्या परिसरातील कंदमुळे, फळे, पानाफुलांनी बहरलेले घनदाट जंगल. त्या जंगलात आदिवासी लोक राहायचे. निसर्गाच्या सान्निध्यात राहून, निसर्गाचे नियम पाळून आदिवासी आपले जीवन जगत होते. अशा या आदिवासींच्या होळीला सुमारे आठशे वर्षांचा इतिहास आहे.

सातपुडा डोंगराच्या परिसरातील होळी महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर प्रसिद्ध आहे. होलिकोत्सवाची सुरुवात माघ पौर्णिमेला दांडापूजनाने होते. आदिवासींच्या संस्कृतीत परंपरेने आलेल्या दांडापूजनाला विशेष महत्त्व आहे.

होळी पौर्णिमेला दांडापूजन झाले, की सातपुड्यातील वाड्यापाड्यांतून ढोलांचा आवाज घुमू लागतो. कुडाच्या घरांच्या सांदीकोपऱ्यांत, खुंटीला, आढ्याला बांधून ठेवलेले ढोल बाहेर निघू लागतात. मुख्य होळीच्या पंधरा दिवस अगोदर लहान मुलांची होळी सुरू होते. लहान मुले छोटी होळी पेटवून तिच्याभोवती फेर धरून नाचतात. मुले होळीनृत्याचा सराव करतात आणि त्याच दिवसापासून ढोलांचा आवाज साऱ्या गावात, आसमंतात घुमू लागतो.

अख्ख्या सातपुड्यात ढोलांवर थाप पडू लागते. फाल्गुन पौर्णिमेच्या होळीची जय्यत तयारी चालू होते. पोटापाण्यासाठी गाव सोडून गेलेले मजूर या सणासाठी हळूहळू गावाकडे येतात.

आमच्या गावातील आमश्या डोहल्या आपल्या चिल्यापिल्यांना घेऊन सणासाठी गावात यायचा. अख्ख्या सातपुड्यात आमश्या डोहल्या प्रसिद्ध होता. आमश्या ढोल वाजवू लागला, की वाड्या-पाड्यांवरची माणसे ढोलाच्या दिशेने नाचत नाचत येत असत. न थकता रात्र-रात्र ढोल वाजवण्यात आमश्या पटाईत होता.

ढोलाचा सांगाडा आंब्याच्या किंवा सागाच्या लाकडापासून तयार केलेला असतो. त्यावर कातडी चढवतात. कुणी ढोलाची पाने बसवतात. कुणी दोऱ्या आवळतात. ढोलासाठी लाकूड कोणते वापरायचे? तो तासायचा कसा? त्याला कोणत्या प्राण्याच्या कातड्याचे पान लावायचे? तो आवळायचा कसा? ढोलाचा नाद अख्ख्या सातपुड्यात घुमवायचा कसा? ही सगळी माहिती आमश्या डोहल्याला होती. जणूकाही या निसर्गाने त्याला ढोल बनवण्यासाठीच जन्माला घातले होते, म्हणून अख्खा सातपुडाच त्याला 'आमश्या डोहला' म्हणत होता.

होळीचा दिवस जवळ आला तसतसे पाड्यांवरचे ढोल डोंगरदऱ्यांत आणि साऱ्या आसमंतात घुमू लागले. आमश्याची ढोलावरची थाप मजबूत झाली. 'यंदाच्या होळीत खूप ढोल वाजवू. अख्खा सातपुडा दणाणून सोडू', अशी जणू त्याने शपथ घेतली होती.

होळीचा दिवस उजाडला. आमश्या सकाळपासूनच होळीजवळ ढोल घेऊन बसला होता. हळूहळू त्याने

**शिक्षकांसाठी :** १. इंटरनेटचा (आंतरजाल) वापर करून आदिवासी जीवनाविषयीची माहिती मिळवावी. विद्यार्थ्यांना वाचनासाठी द्यावी.

ढोलावर थाप मारायला सुरुवात केली. गावातील स्त्री-पुरुष, पोरेबाळे ढोलाच्या दिशेने येऊ लागली. नकळत नाचाला सुरुवात झाली. सर्वजण एकमेकांचा हात धरून बेधुंदपणे नाचत होते. आमश्या मोठ्या रंगात येऊन ढोल वाजवत होता. बघता बघता लहान-सहान, थोरामोठ्यांनीही आमश्याच्या भोवती रिंगण धरले. नाचाच्या चाली बदलत, तहानभूक विसरून सर्वजण ढोलाभोवती नाचू लागले. नाच रंगात येता येता रात्र केव्हा झाली ते समजलेही नाही. पेटत्या होळीच्या भोवती पुन्हा नाच सुरू झाला. ढोलाचा वेग वाढला तसे नाचणारेही बेधुंद झाले आणि होळी जसजशी विझू लागली तसतसा ढोलाचा वेगही मंदावू लागला. आमश्याची ढोलावरची थाप एकदम मंदावली, तसा नाच एकदम थांबला. कधीही न थांबणारा आमश्याचा हात कसा काय थांबला, म्हणून सर्वजण त्याच्याकडे पाहू लागले आणि एकदम आरडाओरड झाली. आमश्या डोहला ढोलाला सावरत धरतीवर कोसळला होता! ढोलाच्या नादाबरोबर आमश्याचा श्वास अचानक बंद झाला.

रानावनांतील पानाफुलांनी, पळसफुलांनी आमश्याची डोली सजू लागली. सजवलेल्या डोलीत आमश्या निवांत झोपला होता; पण त्याच्या ढोलाच्या आवाजाचे प्रतिध्वनी सातपुड्याच्या रांगारांगांतून घुमत होते. अख्खा गाव डोलीभोवती दुःख गिळत बसला होता.

जंगल्या भगत डोलीजवळ आला. त्याने कथा लावली. ''आपण या निसर्गातील एक जीव. प्रत्येकाला जन्म आणि मरण निसर्गच देतो. झाड जन्माला येते आणि एक दिवस मरते, म्हणून इतर झाडे दुःख करत बसत नाहीत. निसर्गचक्र थांबत नाही. प्राणी-पक्ष्यांचेही तसेच. माणूस निसर्गातला एक क्षुल्लक जीव.''

जंगल्या भगत पुढे बोलू लागला, ''आमश्या जन्माला आला होता तर त्याला मरण अटळ. आता उद्या त्याला सागाच्या झाडाखाली खोल खड्ड्यात गाडले जाईल. त्याचा देह मातीचा, त्याची मातीच होईल. तिथेच एखादी सागाची बी त्या मातीत रुजेल. त्याचं झाड होईल - मोठं सागाचं झाड - त्याचा कुणीतरी ढोल बनवेल. तो ढोल पुन्हा वाजू लागेल. ढोलाच्या रूपाने आमश्या आपल्यातच राहील. डोंगरदऱ्यांतून नाद, लय आणि स्वर घुमू लागतील. आमश्याचा ढोल पुन्हा वाजू लागेल.''

सकाळ झाली होती व सूर्यानेही आमश्याचे अखेरचे दर्शन घेतले होते.

**- संजय लोहकरे**

**शब्दार्थ :** **दांडापूजन** - होळीच्या सणाला दांडा पुरतात व त्याची पूजा करतात. **आसमंतात** - सभोवताली, चोहोबाजूंना. **बेधुंदपणे** - भान हरपून.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आदिवासींच्या होळीला किती वर्षांचा इतिहास आहे?

(आ) अख्ख्या सातपुड्यात ढोल वाजवण्यात कोण प्रसिद्ध होता?

(इ) 'आमश्या डोहल्या' ने कोणती शपथ घेतली होती?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सातपुड्याच्या परिसरातील निसर्गाचे वर्णन करा.

(आ) आमश्याच्या ढोल वाजवण्याचे वैशिष्ट्य काय होते?

(इ) ढोल कसा तयार करतात?

(ई) 'ढोलाच्या रूपाने आमश्या आपल्यातच राहील,' हे पटवून देण्यासाठी भगताने काय सांगितले?

प्र. ३. वाक्यात उपयोग करा.

आसमंतात घुमणे, पटाईत असणे, दणाणून सोडणे, शपथ घेणे, रिंगण धरणे.

प्र. ४. तुम्ही 'होळी' हा सण कसा साजरा करता, त्याचे वर्णन करा.

प्र. ५. लोकसाहित्यातील 'होळी' या सणासंबंधीच्या कविता शिक्षकांच्या मदतीने मिळवा. गाऊन दाखवा.


आदिवासींचे होळी नृत्य

## आपण समजून घेऊया.

### काळ

- खालील वाक्ये वाचा.

(१) इरफान वेगाने धावतो.
(२) इरफान वेगाने धावला.
(३) इरफान वेगाने धावेल.

पहिल्या वाक्यात इरफान धावतो, म्हणजे क्रिया आता घडत आहे; म्हणून हे वाक्य वर्तमानकाळातील आहे.

दुसऱ्या वाक्यात इरफानची धावण्याची क्रिया होऊन गेली आहे, म्हणजे क्रिया पूर्वी घडली आहे; म्हणून हे वाक्य भूतकाळातील आहे.

तिसऱ्या वाक्यात इरफान धावणार आहे, म्हणजे अजून धावण्याची क्रिया झालेली नाही. क्रिया पुढे घडणार आहे, म्हणून हे वाक्य भविष्यकाळातील आहे.

क्रियापदाच्या रूपावरून वाक्यातील काळ ओळखता येतो. वाक्यातील क्रियापद काळानुरूप वापरलेले असते. वर्तमाकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ हे काळाचे मुख्य तीन प्रकार आहेत.

### वर्तमानकाळ

- खालील परिच्छेद वाचा.

रोज सकाळी हत्तीचा कळप नदीवर येतो. काही हत्ती थोडा वेळ नदीकिनाऱ्यावर फिरतात. किनाऱ्यावरच्या मातीत, वाळूत खेळतात; तर काही हत्ती नदीच्या पाण्यात जातात. सोंडेत पाणी भरून एकमेकांच्या अंगावर उडवतात. हत्ती बराचसा वेळ नदीवर घालवतात. नंतर जंगलाच्या दिशेने चालू लागतात.

अधोरेखित केलेले शब्द वाक्यातील क्रियापदे आहेत. या क्रियापदांनी हत्ती रोज सकाळी काय करतात, कोठे जातात, तेथे काय करतात हे आपल्याला समजते. क्रियापदांवरून क्रिया नेहमी होते, आताही होते हे जाणवते. ज्या क्रिया सातत्याने केल्या जातात, त्यांची क्रियापदे वर्तमानकाळी असतात. तसेच जी सत्ये बदलत नाहीत ती दर्शवतानाही वर्तमानकाळी क्रियापदे योजतात.

**उदा.**, (१) सूर्य पूर्व दिशेला उगवतो.
(२) सूर्य पश्चिमेला मावळतो.

# २६. पाण्याची गोष्ट



ASICLK

**(प्रसंग १ : रत्नाच्या घरी)**

(मुले शाळेत जायला निघाली. जाताना रत्नाला बोलवायला तिच्या घरी आली.)

**मीना** : (दारात उभी राहून) रत्ना, ए रत्ना, अगं चल की, उशीर झालाय. आज परिपाठाच्या तासभर आधी बोलवलंय ना, पाहुणे यायचेत शाळेत. चल पटकन.

**रत्ना** : (धावत येते) आले ऽऽऽ

**मीना** : लवकर नीघ बाई. अजून जाताना सकीनाला बोलवायचंय.

**रत्ना** : तुम्ही निघा गं. मला काय लवकर यायला होत नाही. आज मंगळवार, आमच्याकडचा पाण्याचा दिवस. सकीनापण पाणीच भरत असेल. तिच्याकडे जाऊन बघा ती येते का.

**रवी** : तुमच्याकडे पाणी मंगळवारी येतं? आमच्याकडे रविवारी येतं, म्हणून मी अन् कौशा रोज लवकर येऊ शकतो.

**कौशा** : (तक्रारीच्या सुरात) गेल्याच्या गेल्या रविवारी शिवारफेरी बुडली की आपली. तरी मी सरांना म्हणाले होते, शिवारफेरी रविवारी ठेवू नका म्हणून, पण ते म्हणाले, बाकी दिवशी शाळा सोडून कसं जाणार?

**मोहन** : (ऐटीत) आमच्याकडे पाणी सोमवारी येतं, पण मला काही फरक पडत नाही. माझ्या बाबांनी नळाच्या पाइपाला डायरेक्ट मोटर बसवलीय. पाणी आलं, की नुसतं बटण चालू करायचं. लगेच पाणी घरात.

**कौशा** : (वैतागून) आम्हांला तर रविवारची तयारी शनिवारीच करावी लागते. सगळे हंडे, कळश्या, तपेल्या, बादल्या, डबे नेऊन आम्ही रात्रीच रांगेत ठेवतो. सकाळपासून नळाजवळ थांबायचं. नळ फुसफुसायला लागला, की सगळ्यांची धावपळ सुरू होते. कधीकधी तर एखाद्या दम लागलेल्या म्हाताऱ्यासारखा अर्धा-अर्धा तास नळ फुसफुसत राहतो. पाण्याऐवजी नुसती हवा येत राहते.

**दीपकदादा** : रत्नाऽऽऽ, कुठे गेली होतीस ? (मागे बादली भरून वाहिल्याचा आवाज येतो.)

**रत्ना** : शीऽऽ, ही पाण्याची कटकट कधी संपणार कुणास ठाऊक!

**मोहन** : आम्ही पुढे जाऊ का?

**दीपकदादा** : एऽऽ, पाच मिनिटं थांबा. आता पाणी जाईलच. मग सगळे सोबत जा. तुम्हांला सगळ्यांना पाण्याची कटकट वाटतीय. माझं तर दहावीचं वर्ष आहे. दर मंगळवारची सकाळ पाण्यात जाते. आईची दिवसपाळी असली, की आम्हांला दोघांनाच पाणी भरावं लागतं.

**कौशा** : आणि शाळेत सर सांगतात, पाण्याची बचत करा. पाणी अडवा-पाणी जिरवा. पाण्याची बचत करायला पाणी आलं तर पाहिजे. पाणी अडवा, म्हणजे या मोहनच्या घरच्यांसारखं अडवायचं का?

**दीपकदादा** : तुम्हांला मी एक गंमत दाखवतो. थांबा जरा. (घरात जाऊन आणतो.) मी आमच्या पर्यावरण अभ्यासाच्या प्रकल्पासाठी एक चिकटवही बनवली. ती वाचा, म्हणजे तुम्हांला पाण्याबद्दलच्या बऱ्याच गोष्टी समजतील.

(दीपकदादा कौशाच्या हातात चिकटवही देऊन शाळेला जायला निघतो. बाकीचे सर्वजण सकीनाकडे जाऊन सोबत शाळेत जातात.)

(प्रसंग २ : शाळेची मधली सुट्टी)

**सकीना** : ए ऽऽ सगळ्यांनी पटकन जेवण आटपा. दीपकदादाची वही वाचायचीय.

**मोहन** : हो, ना! शाळेत आलो तेव्हा परिपाठ, मग पाहुण्यांचं भाषण, वेळच मिळाला नाही.

(सगळे जेवण आटपून हात, तोंड पुसत येतात.)

**सकीना चिकटवही वाचू लागते.**



एखाद्या वर्षी खूप पाऊस पडतो तर कधी अगदीच कमी. जेव्हा कमी पाऊस पडतो, तेव्हा कोरडा दुष्काळ पडतो. पाण्यासाठी वणवण करावी लागते. शेतीसाठी तर राहूच द्या, पिण्यासाठीसुद्धा पाणी मिळेनासे होते. अन्नधान्य, जनावरांचा चारा, वीज अशा अनेक समस्या निर्माण होतात. गावोगावी टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो.



याउलट जास्त पाऊस पडला, तर अनेक समस्या निर्माण होतात. नद्या-नाले, तलावांना पूर येतो. शेते, घरे, शाळा, रस्ते पाण्याखाली जातात. पिके नष्ट होतात.

**रवी** : आता मी वाचतो.



जमिनीतून पाण्याचा उपसा अफाट वाढलाय. त्यामुळे भूजलपातळी खालावत चालली आहे. वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे पाण्याचा वापर असाच राहिला, तर लवकरच पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होईल. पाण्याची बचत करून पाण्याचा अपव्यय टाळणे हे आपल्या सर्वांचे



महत्त्वाचे कर्तव्य आहे. जमिनीतल्या पाण्याची खालावत चाललेली पातळी अशीच कमी होत राहिली, तर पाणी संपून जाईल नाही का? पावसाळ्यात पडणारे पाणी असेच वाहून जाते आणि उन्हाळ्यात ना नद्या-तलावांत पाणी उरतं, ना विहिरी-कूपनलिकांमध्ये; म्हणूनच आपण सगळ्यांनी पावसाचे पाणी वाया न घालवता जमिनीत मुरवायला हवे. वाहते पाणी अडवून जमिनीखालच्या टाक्या, शेततळी या सर्वांमध्ये साठवायला हवे. जर आपण पाणी अडवून जमिनीत जिरवले नाही, तर जमिनी आपल्याला पाणी कुठून देणार? एक प्रकारे जमीन ही पाण्याची बँक आहे. पाणी ही संपत्ती या बँकेत भरून बचत केली तरच भविष्यात पाण्याचा पुरेसा पुरवठा होईल.







**कौशा** : आता माझा नंबर.

स्वच्छ व निर्धोक पाणी हा आपल्या सगळ्यांचा अधिकार आहे. आजकाल बसस्टँड, रेल्वेस्टेशन अशा ठिकाणी एकतर पिण्याचे पाणी मिळत नाही किंवा अनेकदा ते पिण्यालायक नसते; म्हणून प्रवासामध्ये पाणी विकत घेण्याची पद्धत गेल्या

बारा ते पंधरा वर्षांत रूढ झाली आहे. एक लीटर पाण्यासाठी पंधरा ते वीस रुपये मोजावे लागतात. त्यामुळे पैसे नसणारे कोट्यवधी लोक स्वच्छ पाण्यास मुकतात. सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे पाणी मोफत उपलब्ध व्हायला हवे.

**मीना :** आता मी वाचते.

पाण्यासाठी वणवण करावी लागते, त्यामुळे अनेक मुलींच्या व स्त्रियांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत. देशभरातल्या लाखो मुलामुलींच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. मोठ्या शहरांमध्ये पाण्याचा अखंड पुरवठा होत असताना काही छोट्या शहरांमध्ये आठवड्यातून किंवा दहा दिवसांतून एकदाच पाणी मिळते. ग्रामीण भागात तर अनेक ठिकाणी पाण्याचा तुटवडा असल्याने स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

**रत्ना :** आता माझ्याकडे वही द्या.

अंघोळ करणे, भांडी घासणे, कपडे धुणे, सडा-सारवण करणे या घरगुती कामांत घरातल्या



प्रत्येकाने दररोज एक तांब्या पाणी वाचवले, तरी प्रत्येक कुटुंबात दररोज एक बादली, म्हणजेच जवळपास पंधरा ते वीस लीटर पाणी वाचेल. हजार कुटुंबांच्या एका गावात किंवा वस्तीत दिवसाला पंधरा ते वीस हजार लीटर, म्हणजेच महिन्यात चार ते सहा लाख लीटर, म्हणजेच वर्षभरात पन्नास ते सत्तर लाख लीटर पाणी वाचू शकते.

**(प्रसंग ३ : वर्गात)**

(सुट्टी संपल्याची घंटा होते. बाकीची मुले वर्गात येतात. त्यांच्या पाठोपाठ सरही वर्गात येतात व हातात पर्यावरण अभ्यासाचे पुस्तक घेतात.)


**सकीना :** (सरांना वही देत) सर आम्हीपण पर्यावरण अभ्यासाचं काहीतरी आणलंय.

**सर :** (वही उघडून पाहतात व खूश होतात.)

मुलांनो, पाहा या रत्नाच्या दादानं पाण्याविषयी किती महत्त्वाची माहिती जमवलीय. तुम्ही सगळ्यांनी ती वाचा. नाहीतर आपण असं करूया. या सगळ्या माहितीचा तक्ता बनवून वर्गात लावूया आणि उद्या परिपाठाच्या वेळी शाळेत सगळ्यांना ही माहिती वाचून दाखवूया.

**रत्ना :** हो. पाण्याची बचत कशी करू शकतो, ते आम्ही लिहून आणतो.

**सगळी मुले :** (एकाच सुरात) महत्त्वाचं म्हणजे त्याप्रमाणे प्रत्यक्षात वागूया.



**शिक्षकांसाठी :** इंटरनेटचा (आंतरजाल) वापर करून पाण्याच्या स्रोतांबाबतची अधिक माहिती मिळवावी. वर्गात चर्चा करावी.

## स्वाध्याय

**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) रत्नाला शाळेत यायला उशीर का होणार होता?

(आ) या संवादातील मुलांकडे कोणकोणत्या दिवशी पाणी येते?

(इ) कौशाच्या घरी पाणी भरण्यासाठी कोणती तयारी करतात?

(ई) पाऊस कमी पडल्यामुळे काय होते?

(उ) जमिनीला 'पाण्याची बँक' असे का म्हटले आहे?

**प्र. २. 'दुष्काळ' या विषयावर आठ ते दहा ओळी लिहा.**

**प्र. ३. निरीक्षण करा, सांगा व लिहा.**

(अ) तुमच्या घरी पाणी कसे येते? किती वेळा? पाणी भरण्याचे काम कोण करते?

(आ) तुम्ही अंघोळीसाठी दररोज अंदाजे किती पाणी वापरता? त्यात कशी बचत करता येईल?

(इ) घराखेरीज खालील ठिकाणी पाणी वाया जाऊ नये, म्हणून काय करता येईल, ते चर्चा करून लिहा.

१. शाळा.
२. जलतरण तलाव.
३. शेती.
४. सार्वजनिक नळ.
५. हॉटेल.

(ई) पाण्यासंबंधीच्या खालील शब्दसमूहांचे अर्थ जाणून घ्या. ते वापरून वाक्ये बनवा.

१. पाणी जोखणे.
२. पाणी पाजणे.
३. डोळ्यांत पाणी आणणे.
४. तोंडचे पाणी पळणे.
५. पाणी पडणे.
६. पालथ्या घड्यावर पाणी.

**उपक्रम :** १. 'पाणी' या विषयावरील वर्तमानपत्रांतील बातम्यांची कात्रणे कापून त्यांचा संग्रह करा.
२. 'पाण्याची बचत' या विषयावर घोषवाक्ये तयार करा.

- **गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा. तो शब्द गटात का बसत नाही ते सांगा.**

१) उठतो, बसतो, हसतो, पळतो, मुलगा.
२) तो, तुला, मुलीला, त्याने, आम्ही.
३) सुंदर, फूल, टवटवीत, कोमेजलेले, हिरवेगार.
४) रत्नागिरी, जिल्हा, पुणे, चंद्रपूर, बीड.
५) पालापाचोळा, सगेसोयरे, दिवसरात्र, दगडधोंडे.
६) सौंदर्य, शांतता, शहाणपणा, गोड, श्रीमंती.
७) नद्या, झाड, फुले, पाने, फळे.
८) इमारत, वाडा, खोली, खिडकी, बाग.
९) खाल्ला, खेळते, लिहिले, वाचले, पाहिले.
१०) जाईल, येईल, बोलेल, आला, लिहीन.
११) प्रसिद्ध, प्रतिबिंब, अवकळा, दुकानदार, गैरसमज.

## आपण समजून घेऊया.

### भूतकाळ

- **खालील वाक्ये वाचा.**

१. अकबर नावाचा एक बादशहा होता.

२. मी आनंदाने उड्या मारल्या.

३. चंदाने लाडू खाऊन संपवला.

४. काल मला जॉनचा ई-मेल आला होता.

वरील वाक्यांतील अधोरेखित केलेली क्रियापदे भूतकाळी आहेत, कारण त्यातील क्रिया होऊन गेलेली आहे. क्रिया पूर्ण झालेली आहे. क्रिया पूर्वीच्या काळातील आहे. पूर्वी घडलेली घटना, प्रसंग दर्शवताना आपण भूतकाळी क्रियापदे योजतो.

### भविष्यकाळ

- **खालील परिच्छेद वाचा.**

पुढच्या आठवड्यात परीक्षा संपेल. मी आत्याकडे जाईन. तेथील माझ्या मित्रांना भेटेन. आम्ही मनसोक्त आंबे खाऊ. यावर्षी मामा मला पोहायला शिकवेल. मला सुरपारंब्या खेळायला शिकायचे आहे.


अधोरेखित केलेल्या क्रियापदांवरून क्रिया अजून घडायच्या आहेत असे लक्षात येते. ज्या घटना, गोष्टी भविष्यात घडणार आहेत, त्या दर्शवताना आपण भविष्यकाळी क्रियापदे वापरतो.

- **खालील तक्ता वाचा. समजून घ्या.**


| नाम/सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| ममता | खेळते | खेळली | खेळेल |
| सुभाष | खेळतो | खेळला | खेळेल |
| मी | खेळतो/खेळते | खेळलो/खेळले | खेळेन |
| आम्ही | खेळतो | खेळलो | खेळू |
| तो | खेळतो | खेळला | खेळेल |
| ती | खेळते | खेळली | खेळेल |
| ते | खेळतात | खेळले | खेळतील |
| तू | खेळतोस/खेळतेस | खेळलास/खेळलीस | खेळशील |
| तुम्ही | खेळता | खेळलात | खेळाल |
| त्या | खेळतात | खेळल्या | खेळतील |

- **खालील चित्रांचे निरीक्षण करा. म्हणी ओळखा व लिहा. त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**









- **खाली दिलेला परिच्छेद वाचा. योग्य विरामचिन्हे घालून परिच्छेद पुन्हा लिहा.**

हेमंत रोहनला सांगत होता अरे काल मी सिनेमाला गेलो होतो सिनेमा माझ्या आवडीचा होता पण मला तो नीट पाहता आला नाही का काय झालं होतं रोहनने विचारले अरे एक माणूस सारखा माझ्याशी बोलत होता हेमंत म्हणाला जागा बदलायची होती मग त्याचा मित्र रोहन म्हणाला अरे जागा कशी बदलणार तो माझा मामा होता त्यानेच मला सिनेमा दाखवायला आणलं होतं

# २७. अभंग

- ऐका. म्हणा. वाचा.



आंधळ्याची काठी । अडकली कवणें बेटीं ।। १ ।।
माझिये हरणी । गुंतलीस कोणे रानीं ।। २ ।।
मुकें मी पाडस । चुकलें भोवें पाहें वास ।। ३ ।।
तुजवीण काय करूं । प्राण किती कंठीं धरूं ।। ४ ।।
आतां जीव जाऊं पाहे । धांव घालीं माझे आये । ।। ५ ।।
माझी भेटवा जननी । संतां विनवी दासी जनी ।। ६ ।।

**— संत जनाबाई**

धन कोणा कामा आलें । पहा विचारूनि भले ।। १ ।।
ऐसें सकळ जाणती । कळोनियां आंधळे होती ।। २ ।।
स्त्रिया पुत्र बंधु पाही । त्याचा तुझा संबंधु नाहीं ।। ३ ।।
सखा पांडुरंगावीण । सेना म्हणे दुजा कोण ।। ४ ।।

**— संत सेनामहाराज**



अभ्यासिले वेद झाला शास्त्रबोध ।
साधिल्या विविध नाना कळा ।। १ ।।
प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं ।
तंव कैसा श्रीहरि करील कृपा ।। २ ।।
हित तें आचरा हित तें विचारा ।
नामीं भाव धरा जाणतेनो ।। ३ ।।
नामा म्हणे तरी विठो येऊनि भेटे ।
कायाच पालटे कैवल्य होय ।। ४ ।।

**— संत नामदेव**

# इयत्ता ५ वी, ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शिका





























- मराठी, इंग्रजी, उर्दू, हिंदी माध्यमामध्ये उपलब्ध
- सरावासाठी विविध प्रश्न प्रकारांचा समावेश
- घटकनिहाय प्रश्नांचा समावेश
- नमुन्यादाखल उदाहरणांचे स्पष्टीकरण

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता ५ वी (मराठी) ₹ ४०.००

